७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक **संध्या**
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

मंगळवार, दि. ०२ जून २०२६

www.dainikesandhya.com   www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : १५७ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये


# विधान परिषदेची रणधुमाळी

## १७ जागांसाठी उमेदवारांचे अर्ज दाखल; महायुती आणि मविआत होणार थेट लढत; आमने-सामने कोण?



**मुंबई (दै. संध्या)**

राज्यातील विधान परिषदेच्या १७ जागांसाठी उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी सर्वच राजकीय पक्षांसह काही अपक्ष उमेदवारांनी आपला उमेदवारी अर्ज भरला आहे. महायुती आणि महाविकास आघाडी या दोन्ही प्रमुख आघाड्यांनी आपापले मोहरे मैदानात उतरवले असून, १७ मतदारसंघांतील लढतींचे चित्र आता स्पष्ट झाले आहे. अनेक ठिकाणी अपक्ष आणि बंडखोरांनी अर्ज भरल्याने चुरस वाढली असली, तरी मुख्य मुकाबला हा महायुती विरुद्ध मविआ असाच रंगणार आहे. सत्ताधारी महायुतीमध्ये भारतीय जनता पक्षाने सर्वाधिक ११ जागांवर आपले उमेदवार रिंगणार उतरवले आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची शिवसेना ४ जागांवर, तर उपमुख्यमंत्री अजित पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस २ जागांवर निवडणूक लढवत आहे. विरोधी बाकांवरील महाविकास आघाडीत काँग्रेसने आक्रमक पवित्रा घेत ८ जागांवर आपले उमेदवार दिले आहेत. उद्धव ठाकरेंची शिवसेना (यूबीटी) ६ जागांवर, तर शरद पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस ३ जागांवर नशीब आजमावत आहे. अनेक मतदारसंघांत अपक्ष उमेदवारांनी अर्ज भरल्याने आणि स्थानिक नेत्यांनी नाराजी व्यक्त केल्याने दोन्ही आघाड्यांची डोकेदुखी वाढली आहे. महायुतीमध्ये रायगड, छत्रपती संभाजीनगर-जालना, यवतमाळ, पुणे, नाशिक, परभणी आणि नांदेड या ८ जागांवर नाराजांनी अर्ज दाखल करत बंडाचे निशाण फडकावले आहे. नाशिकसारख्या ठिकाणी मविआचा अधिकृत उमेदवार नसल्याने पेच निर्माण झाला आहे.

अनेक ठिकाणी अपक्ष उमेदवारांनी आणि नाराज नेत्यांनी अर्ज भरल्यामुळे अधिकृत उमेदवारांची डोकेदुखी वाढली आहे. ४ जून ही उमेदवारी अर्ज मागे घेण्याची शेवटची तारीख असल्याने, त्या दिवशी बंडखोरी शमवण्यात नेत्यांना किती यश येते, यावरच विजयाचे समीकरण अवलंबून असेल. खरी लढत पक्षीय चिन्हांवर असली, तरी स्थानिक पातळीवरील गणिते या निवडणुकीत महत्त्वाची ठरणार आहेत.

या बंडखोरीवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे. "अर्ज मागे घेण्याची शेवटची तारीख ४ जून आहे. तोपर्यंत आम्ही सर्व बंडखोरांशी चर्चा करून त्यांची मनधरणी करू. ही निवडणूक महायुती एकदिलानेच लढेल आणि योग्य तोडगा काढला जाईल," असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

४ जूनपर्यंत किती बंडखोर आपले अर्ज मागे घेतात आणि पक्षश्रेष्ठींच्या आदेशाला मान देतात, यावरच अनेक मतदारसंघातील विजयाची गणिते अवलंबून असणार आहेत.

### महाविकास आघाडीतही बंडाचे निशाण

बंडखोरीचे हे वारं केवळ महायुतीपुरते मर्यादित नसून महाविकास आघाडीतही अनेक ठिकाणी बिघाडी झाली आहे.

नांदेड: काँग्रेसचे अधिकृत उमेदवार रामदास सुमठाणकर असले, तरी माधवगाव जवळकर आणि ठाकरे गटाचे कृष्ण आष्टीकर यांनी समांतर अर्ज भरल्याने पेच निर्माण झाला आहे.

भंडारा-गोंदिया: काँग्रेसने प्रफुल्ल अग्रवाल यांना संधी दिली असताना नरेश ईश्वरकर आणि दिलीप बनसोड यांनी अर्ज भरल्याने संभ्रमावस्था निर्माण झाली आहे.

सांगली: शरद पवार गटाने बाळासाहेब पाटलांना मैदानात उतरवले आहे, मात्र काँग्रेसच्या संजय मेंढे आणि मयूर पाटील यांनीही आपले अर्ज दाखल केले आहेत.

### मतदारसंघानुसार प्रमुख उमेदवार

| क्र. | मतदारसंघ | महायुतीचे प्रमुख उमेदवार (पक्ष) | मविआचे उमेदवार (पक्ष) |
|---|---|---|---|
| 1 | सोलापूर | राजेंद्र राऊत (भाजप) | आदित्य फत्तेपूरकर (कॉंग्रेस) |
| 2 | अहिल्यानगर | प्राजक्त तनपूरे (भाजप) | करण ससाणे (कॉंग्रेस) |
| 3 | ठाणे | रविंद्र फाटक (शिवसेना) | अभिजीत पवार (राष्ट्रवादी - शपा) |
| 4 | जळगाव | नंदकिशोर महाजन (भाजप) | शरद तायडे (शिवसेना - ठाकरे) |
| 5 | सांगली-सातारा | धैर्यशील माने (भाजप) | बाळासाहेब पाटील / अभयसिंह जगताप (राष्ट्रवादी) |
| 6 | नांदेड | अमर राजूरकर (भाजप) | रामदास पाटील (कॉंग्रेस) |
| 7 | यवतमाळ | दुष्यंत चतुर्वेदी (शिवसेना) | साहेबराव कांबळे (कॉंग्रेस) |
| 8 | पुणे | विक्रम काकडे (राष्ट्रवादी - आपा) | श्रीकांत पाटील (राष्ट्रवादी - शपा) |
| 9 | भंडारा-गोंदिया | अविनाश ब्राह्मणकर (भाजप) | दिलीप बनसोडे (कॉंग्रेस) |
| 10 | रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग | अनिकेत तटकरे (राष्ट्रवादी - आपा) | अधिकृत उमेदवार (शिवसेना - ठाकरे) |
| 11 | नाशिक | नरेंद्र दराडे (शिवसेना) | मविआचा उमेदवार नाही (अपक्षाला पाठिंबा) |
| 12 | वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली | अरूण लखानी (भाजप) | शैलेश अग्रवाल (कॉंग्रेस) |
| 13 | अमरावती | प्रवीण पोटे (भाजप) | हर्षदीप देशमुख (कॉंग्रेस) |
| 14 | धाराशिव-लातूर-बीड | बसवराज पाटील (भाजप) | महेश देशमुख (कॉंग्रेस) |
| 15 | परभणी-हिंगोली | सईद खान (शिवसेना) | डॉ. विवेक नावंदर (शिवसेना - ठाकरे) |
| 16 | छत्रपती संभाजीनगर-जालना | अधिकृत उमेदवार (भाजप/शिवसेना) | अधिकृत उमेदवार (शिवसेना - ठाकरे) |
| 17 | नागपूर (पोटनिवडणूक) | डॉ. राजीव पोतदार (भाजप) | अतुल लोंढे (कॉंग्रेस) |

# पार्थ पवार राजकारणात सक्रिय झाले चांगली गोष्ट : सुनील तटकरे

**मुंबई (दै. संध्या)**

राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाचे नेते सुनील तटकरे यांचे सुपुत्र अनिकेत तटकरे यांना विधानपरिषदेच्या निवडणुकीसाठी उमेदवारी जाहीर करण्यात आली असून आज त्यांचा अर्ज भरण्यात आला आहे. त्यानंतर सुनील तटकरे यांनी पत्रकार परिषद घेत अनेक विषयांवर भाष्य केले आहे. यावेळी बोलताना त्यांनी राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाची चर्चा अजितदादा असताना झाल्याचेही म्हटले आहे. तसेच अजितदादांच्या विमान अपघातावरही भाष्य केले आहे. सुनील तटकरे म्हणाले, अजितदादांच्या निधनानंतर पार्थ पवार सक्रिय होणे पक्षासाठी महत्त्वाचे होते म्हणून त्यांनी निर्णय घेतला आणि योग्य आहे. शेवटी संघटनेत काम करत असताना वेगवेगळी मते असू शकतात. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाची स्थापना 1999 साली झाली. पवार साहेबांसारखे 6 दशक देशाच्या राजकारणात एक प्रभाव असणारे नेतृत्व मिळाले. तसेच पक्षात लोकशाही पद्धतीने निर्णय घेतले जायचे. त्यामुळे साहेबांची सुद्धा निर्णय घेण्याची प्रक्रिया तशीच होती. अजितदादांनी देखील तीच पद्धत पुढे चालू ठेवली. प्राजक्त तनपुरे



यांनी भाजपमध्ये प्रवेश केल्यानंतर दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्यासाठी बैठका झाल्याचा गौप्यस्फोट केला होता. यावर बोलताना सुनील तटकरे म्हणाले, यात गौप्यस्फोट काही नाही. ही वस्तुस्थिती आहे. अजितदादांच्या निधानापूर्वी दोन्ही राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाच्या चर्चा झाल्या होत्या, ही बाब मी सुद्धा नंतर सांगितली आहे. काही बैठकांना मी नव्हतो, पण बैठकीतले तपशील मला दादा सांगायचे. त्यामुळे फार मोठा गौप्यस्फोट प्राजक्त तनपुरे यांनी केला असे काही नाही. प्रत्येक निवडणुकीला उमेदवारी जाहीर अगदी काही तास शिल्लक असताना केली जाते, असे का होते? यावर बोलताना सुनील तटकरे म्हणाले, जेव्हा तीन पक्ष एकत्र निवडणुका लढवत असतात, तेव्हा जागावाटपावर चर्चा होत असते. काही जागांच्या बाबतीत प्रत्येक राजकीय पक्षाचे एक गणित असते ते मांडले जाते.

# २-३ दिवसांत मान्सून केरळममध्ये

नवी दिल्ली (दै. संध्या) : भारतीय हवामान विभागाने सांगितले आहे की, नैऋत्य मान्सून पुढील 2 ते 3 दिवसांत केरळममध्ये दाखल होऊ शकतो. साधारणपणे मान्सून 1 जूनच्या आसपास केरळममध्ये दाखल होतो, परंतु यावेळी त्याचा वेग थोडा मंद राहिला आहे. हवामान विभागाच्या मते, अरबी समुद्र, लक्षद्वीप, केरळम आणि तामिळनाडूच्या काही भागांमध्ये मान्सूनच्या प्रगतीसाठी हवामान अनुकूल बनले आहे. यासोबतच बंगालच्या उपसागरातील अनेक भागांमध्येही मान्सून पुढे सरकू शकतो. IMD ने यापूर्वी मान्सून 26 मे रोजी केरळममध्ये दाखल होईल असा अंदाज वर्तवला होता, परंतु नंतर त्यात विलंब झाला आणि विभागाने सांगितले की, त्याची सुरुवात जूनच्या पहिल्या आठवड्यात होऊ शकते. हवामान विभागाच्या माहितीनुसार, देशभरात सध्या उष्णतेच्या लाटेची (हीटवेव) स्थिती संपली आहे. राजस्थानमधील अजमेर, नागौर आणि चित्तौडगडमध्ये सोमवारी गारपीट झाली. मध्य प्रदेशातील 4 जिल्ह्यांमध्येही वादळी वाऱ्यासह पावसाचा जोर सुरू आहे. उत्तर प्रदेशातील झाशी आणि ललितपूरमध्ये जोरदार पाऊस झाला. राज्यातील 63 जिल्ह्यांमध्ये वादळी वाऱ्यासह पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

# रिलायन्स कम्युनिकेशन्स प्रकरणात अमिताभ झुनझुनवाला अटकेत

## आर्थर रोड कारागृहात पाठवलं

**मुंबई (दै. संध्या)**

सीबीआयने रिलायन्स कम्युनिकेशन्स समूहाचे माजी ग्रुप मॅनेजिंग डायरेक्टर अमिताभ झुनझुनवाला यांना अटक केली आहे. बँकांकडून मिळालेल्या कर्जाच्या निधीचा गैरवापर झाल्याने सार्वजनिक क्षेत्रातील बँकांना हजारो कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचा आरोप आहे. सीबीआयच्या म्हणण्यानुसार, झुनझुनवाला हे समूहाच्या वित्त, बँकिंग आणि निधी वापराशी संबंधित महत्त्वाच्या कामकाजावर नियंत्रण ठेवत होते. त्यांनी विविध बँकांकडून कर्ज मिळवून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती.

हे प्रकरण रिलायन्स कम्युनिकेशन आणि अनिल अंबानी यांच्याविरोधात स्टेट बँक ऑफ इंडियाच्या तक्रारीवरून नोंदवण्यात आले होते. एसबीआयला 2,929.05 कोटी रुपयांचा तर 11 बँकांच्या कन्सोर्टियमला सुमारे 6,015 कोटी रुपयांचा फटका बसल्याचा आरोप आहे. एकूण 17 सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचे सुमारे 19,694.33 कोटी रुपयांचे एक्स्पोजर या प्रकरणात असल्याचे सीबीआयने म्हटले आहे. ईडीच्या एका प्रकरणात तिहार तुरुंगात न्यायालयीन



कोठडीत असलेल्या झुनझुनवाला यांना उत्पादन वॉरंटवर मुंबईत आणण्यात आले. न्यायालयात हजर केल्यानंतर सीबीआयने त्यांना औपचारिक अटक केली असून त्यांची रवानगी आर्थर रोड कारागृहात करण्यात आली आहे. त्यांच्या पोलीस कोठडीच्या मागणीवर उद्या सुनावणी होणार आहे. दरम्यान, सीबीआयने 29 मे 2026 रोजी या प्रकरणात पहिले आरोपपत्र दाखल केले असून त्यात कंपनीसह 16 आरोपींचा समावेश आहे. त्यामध्ये रिलायन्स कम्युनिकेशन्सचे पाच वरिष्ठ अधिकारी आणि दहा बँक अधिकारी आहेत. दरम्यान, ईडी म्हणजेच अंमलबजावणी संचालनालयाने मार्च 2026 मध्ये अनिल अंबानी यांच्या रिलायन्स कम्युनिकेशन्स लिमिटेड आणि त्यांच्याशी संबंधित कंपन्यांच्या आवारात मोठी छापेमारी केली. ईडीच्या 15 पथकांनी एकाच वेळी मुंबईतील 10 ते 12 ठिकाणी छापे टाकले होते. बँक फसवणूक आणि मनी लॉंड्रिंगशी संबंधित जुन्या प्रकरणांचा तपास पुढे नेण्यासाठी ही कारवाई करण्यात आली होती. ईडीने आरकॉमचे माजी संचालक, सहकारी आणि संबंधित व्यक्तींच्या घरांवर आणि कार्यालयांवरही छापे केले होते. आरकॉमशी संबंधित ₹40,000 कोटींपेक्षा जास्त किमतीच्या बँक फसवणूक आणि मनी लॉंड्रिंग प्रकरणाचा हा एक भाग आहे. अलिकडच्या काही महिन्यांत, ईडीने अनिल अंबानींना चौकशीसाठी अनेक वेळा समन्स बजावले आहेत. ज्यामध्ये फेब्रुवारी 2026 मध्ये 9 तासांपेक्षा जास्त काळ चौकशी करण्यात आली होती.


क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा

SUBSCRIBE

www.sandhyaepaper.com


### ढिंग-टांग




## पी. व्ही. कुलकर्णीच्या बीडमधील अनधिकृत इमारतीवर पालिकेचा हातोडा

# पेपरफुटी घोटाळ्यातील मास्टरमाईंडला दणका

**बीड (दै. संध्या)**

देशभरातील २२ लाख विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळणाऱ्या नीट पेपरफुटी प्रकरणाच्या तपासाची व्याप्ती वाढली असतानाच, या प्रकरणातील मुख्य सूत्रधार आणि सेवानिवृत्त प्राध्यापक पी. व्ही. कुलकर्णी याच्यावर प्रशासनाने आता आपला मोर्चा वळवला आहे. बीड शहरातील शाहू नगर भागात कुलकर्णी याने उभारलेल्या चार मजली कथित अनधिकृत इमारतीवर अखेर पालिकेचा हातोडा चालला आहे. सीबीआयच्या कारवाईनंतर आता प्रशासकीय पातळीवरही या घोटाळेबाजांची नाकेबंदी सुरू झाली आहे. पी. व्ही. कुलकर्णी हा मूळचा बीडचा असून, त्याने शाहू नगर परिसरात एका भव्य इमारतीचे बांधकाम सुरू केले होते. हे बांधकाम अनधिकृत असल्याचे समोर आल्यानंतर बीड नगरपालिकेने संबंधित ठेकेदाराला नोटीस बजावून बांधकाम स्वतःहून पाडून घेण्याचे आदेश दिले होते. या नोटीसीची मुदत आज संपल्यानंतर प्रशासनाने कडक पवित्रा घेतला. अखेर कारवाईच्या भीतीने संबंधित ठेकेदाराकडूनच या अनधिकृत बांधकामावर हातोडा चालवण्यात येत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सध्या



प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली संबंधित ठेकेदाराकडूनच या चार मजली इमारतीचा अनधिकृत भाग हटविण्याची प्रक्रिया सुरू आहे. ज्या वेगाने हे चार मजली बांधकाम उभे राहिले होते, त्याच वेगाने आता त्यावर हातोडा चालवला जात असल्याने परिसरात तणावपूर्ण शांतता पाहायला मिळत आहे. पी. व्ही. कुलकर्णी मूळचा बीड येथील रहिवासी आहे. त्याचे शाहूनगर भागात वडिलोपार्जित घर होते. ते घर पाडून त्याने इथे इमारत उभारणी सुरू केली आहे. कुलकर्णी लातूरच्या एका नामांकित कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणून नोकरीला होता. त्याचा लातूरमध्येही एक मोठा बंगला असल्याचे समजते. निवृत्तीनंतर कुलकर्णीने आपले बस्तान पुण्याला हलवले होते. तिथे सुद्धा त्याचे घर असल्याचे समजते. बीडमध्ये सुरू असलेल्या या बिल्डिंगच्या बांधकामात कुलकर्णीने काळा पैसा वापरल्याची चर्चा आहे. आता सीबीआयकडून नीट पेपरफुटीच्या प्रकरणाची चौकशी सुरू आहे. त्यातून हे सारे गौडबंगाल बाहेर येईलच. NEET परीक्षेतील गैरव्यवहाराच्या चौकशीत केंद्रीय अन्वेषण विभाग (CBI) महाराष्ट्रभर तपास करत आहेत. लातूर, नाशिक, पुणे आणि बीड या ठिकाणी राबवलेल्या तपास मोहिमेदरम्यान प्रा. पी. व्ही. कुलकर्णी यांचे नाव समोर आले होते. CBI ने कुलकर्णी यांचे काही संशयितांशी असलेले धागेदोरे शोधून काढल्यानंतर त्यांना चौकशीसाठी ताब्यात घेतले होते.

तपासात प्रा. पी. व्ही. कुलकर्णी आणि प्रा. शिवराज मोटेगावकर यांच्यातील संबंधांचीही चौकशी सुरू आहे. लातूरमधील खाजगी कोचिंग क्लासेस आणि वैद्यकीय क्षेत्रातील काही व्यक्तींशी त्यांचे असलेले लागेबांधे यंत्रणांच्या रडारवर आहेत. पी. व्ही. कुलकर्णी हे चार वर्षांपूर्वी सेवानिवृत्त झाले होते, मात्र त्यांचे नेटवर्क अत्यंत मोठे होते. पुण्यात ब्युटी पार्लर चालवणाऱ्या मनीषा वाघमारे हिच्याशी त्यांचे संबंध असल्याचे तपासात उघड झाले. याच धाग्यावरून सीबीआयचे पथक लातूरच्या कैलासनगरमध्ये पोहोचले आणि कुलकर्णीला बेड्या ठोकल्या. कुलकर्णीचे कुटुंब पुण्यात राहते, मात्र त्याने गैरमार्गाने मिळवलेल्या पैशांतून बीडमध्ये मालमत्ता उभी करण्याचा घाट घातला होता. नाशिक, पुणे, लातूर आणि बीड या चार जिल्ह्यांत सीबीआयने सध्या अटकेचा धडाका लावला आहे. कुलकर्णीच्या इमारतीवर झालेली ही तोडक-मोडक कारवाई म्हणजे शिक्षण क्षेत्रातील या 'माफिया' राजला दिलेला एक सूचक इशारा मानला जात आहे. या कारवाईमुळे नीट घोटाळ्याशी संबंधित इतर संशयितांचेही धाबे दणाणले आहेत.

# लाडकी बहीण : ६० लाख महिला वगळणार

## जयंत पाटलांचा गंभीर आरोप; विजय वडेट्टीवार, रोहित पवारांचीही टीका

**मुंबई (दै. संध्या)**



मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील लाभार्थी महिलांच्या संख्येत झालेल्या मोठ्या घटीवरून राज्यातील राजकारण तापले आहे. या योजनेतून 80 लाख महिलांना अपात्र ठरवण्यात आल्याची माहिती समोर आल्यानंतर राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते जयंत पाटील यांनी सरकारवर जोरदार टीका केली आहे. सध्या या योजनेतील लाभार्थींची संख्या 1 कोटी 66 लाखांवर आली असून, आगामी काळात आणखी 50 ते 60 लाख महिलांची नावे यादीतून वगळली जाऊ शकतात, असा दावा त्यांनी केला आहे. जयंत पाटील यांनी सरकारच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. विधानसभा निवडणुकीपूर्वी कोणतीही कठोर पडताळणी न करता मोठ्या प्रमाणावर महिलांना या योजनेचा लाभ देण्यात आला. त्यानंतर सत्तेत आल्यानंतर लाभार्थ्यांची तपासणी सुरू करून लाखो महिलांना अपात्र घोषित करण्यात आले. निवडणुकीच्या वेळी सर्वांना लाभ देण्याचा निर्णय घेतला आणि आता त्याच महिलांना योजनेबाहेर काढले जात आहे, अशी टीका त्यांनी केली. जयंत पाटील यांनी सरकारच्या आर्थिक नियोजनावरही निशाणा साधला. त्यांच्या मते, राज्य सरकारला या योजनेसाठी होणारा खर्च कमी करायचा आहे. त्यामुळे टप्प्याटप्प्याने लाभार्थ्यांची संख्या घटवली जात आहे. आज 80 लाख महिलांना अपात्र ठरवण्यात आले असून, पुढील वर्षभरात आणखी 50 ते 60 लाख महिलांची नावे कमी केली जाऊ शकतात. यामागे आर्थिक भार कमी करण्याचा प्रयत्न असल्याचा आरोप त्यांनी केला. लाडकी बहीण योजना सुरू करताना शासनाला संभाव्य गैरप्रकारांची कल्पना नव्हती का, असा सवालही त्यांनी उपस्थित केला. जर काही लाभार्थी खरोखरच अपात्र किंवा बोगस होते, तर त्यांना जवळपास 19 ते 20 महिने अनुदान कसे मिळाले? या काळात संबंधित यंत्रणा काय करत होती? अशा लाभार्थ्यांना निधी वितरित होण्यामागे जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित केली पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली. जयंत पाटील यांनी सामाजिक माध्यमावरील आपल्या पोस्टमधून सरकारवर टीका केली आहे. लोकसभा निवडणुकीतील पराभवानंतर विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महिलांना मोठ्या प्रमाणावर या योजनेचा लाभ देण्यात आला. आता त्याच योजनेतील 80 लाख महिलांना अपात्र ठरवण्यात आले आहे. आज लाखो महिलांची नावे वगळली गेली असून उद्या आणखी काही लाख महिलांना विविध कारणे देत अपात्र ठरवले जाऊ शकते. पुढे ही योजना टप्प्याटप्प्याने बंद करण्याचाही प्रयत्न होऊ शकतो, असे म्हणत त्यांनी सरकारच्या नियोजनावर गंभीर प्रश्न उपस्थित केले. शासनाने सुरुवातीपासूनच योग्य पडताळणी आणि नियोजन केले असते, तर अशी परिस्थिती निर्माण झाली नसती, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## संपादकीय

# दक्षिण आशियातील सत्तापालट

गेल्या काही दिवसांत 'कॉक्रोच जनता पार्टी'च्या चर्चांना उधाण आलं आहे. जरी देशाला उज्ज्वल भविष्याकडे नेणारं हे एक संघटित क्रांतिकारी आंदोलन नसलं तरी ही एक महत्त्वाची घटना आहे. गेल्या काही वर्षांत दक्षिण आशियात झालेल्या 'जेन झी उठावां'च्या किंवा 'एशियन स्प्रिंग'च्या पार्श्वभूमीवर राजकारण आणि 'जेन झी'च्या नात्याचा गांभीर्याने विचार होण्याची गरज आहे. कोविडनंतरच्या जगात ऑनलाईन आणि ऑफलाईन जगाचा चेहरा बदलला, राजकारणाची दिशाही बदलत होती. नव्याने मतदार झालेले जेन झी संपूर्ण राजकीय व्यवस्थेला, तिच्या व्याकरणालाच वैतागले होते. या वैतागाचं संतापात आणि पुढे सामाजिक - राजकीय उठावांमध्ये रूपांतर झालं. श्रीलंका (२०२२), बांगलादेश (२०२४) आणि नेपाळमध्ये (२०२५) 'जेन झीं'च्या नेतृत्वाखाली मोठे उठाव झाले. वरवर या तीनही ठिकाणी आणि भारतातल्या 'कॉक्रोच उठावात' सत्ताधीशांच्या विरोधात, विशिष्ट धोरणांच्या विरोधात उद्रेक दिसत असला, तरी या साऱ्या घटनांमध्ये काही समान दुवे आहेत. या मालिकेतला पहिला उठाव झाला श्रीलंकेत. राष्ट्राध्यक्ष राजपक्षे यांच्या सत्तेत आर्थिक संकट २०२२ मध्ये अधिक गडद झालं. तरूण रस्त्यावर आले आणि राजपक्षे घराण्याच्या राजवटीला मोठं आव्हान उभं राहिलं. सरकारने हा उठाव दडपण्याचा प्रयत्न केला. मात्र राजपक्षेंच्या घरावर लोक चालून गेले आणि जुलै २०२२ मध्ये राजपक्षेंना देश सोडून परागंदा व्हावं लागलं. दोन वर्षांतच बांगलादेशमध्ये लोकसेवा परीक्षांमध्ये आरक्षणाच्या मुद्द्यावर सुरू झालेलं आंदोलन काही काळातच सरकारच्या विरोधात मोठं होऊ लागलं. पंतप्रधान शेख हसीना यांच्यावरच्या असंतोषातून हा उठाव अधिकाधिक आक्रमक होऊ लागला आणि जुलै-ऑगस्ट २०२४ दरम्यान सरकारच्या पुनर्बांधणीची




मागणी अधिकाधिक ताकदीने मांडली जाऊ लागली. अखेर शेख हसीना यांना राजीनामा देऊन भारतात यावं लागलं. गेल्यावर्षीच्या सप्टेंबरमध्ये नेपाळमध्ये उभा राहिलेला उठाव सरकारच्या भ्रष्टाचाराविरोधात सुरू झाला आणि पुढे राजकीय नेत्यांच्या अति-श्रीमंतीवर हल्ला चढवू लागला. सरकारने सोशल मीडियाच्या विविध मंचांवर बंदी घातली. यामुळे आंदोलक आणखी ताकदीने रस्त्यावर उतरले. सैन्याने आंदोलकांवर बेछूट गोळीबार केला. एका शाळकरी मुलासह सत्तरच्या वर तरुण या गोळीबारात मृत्युमुखी पडले. दोन हजारांहून अधिक लोक जखमी झाले. यानंतर तरूणांच्या संतापाचा भडका उडाला आणि त्यांनी चक्क संसदेला आग लावली. पंतप्रधानांनी राजीनामा दिला आणि काही महिन्यांत नव्या सरकारची स्थापना झाली. तरुणांनी सत्ताबदलासाठी रस्त्यावर येणं, प्रसंगी आक्रमक होणं हे इतिहासात अनेकदा होत आलं आहे. मात्र 'जेन झीं'च्या या उठावांमागे राजकीय दृष्टीने कृतिशील व्यक्ती म्हणून त्यांच्याकडे झालेलं दुर्लक्ष हे एक मोठं कारण आहे. दक्षिण आशियातल्या प्रत्येक उठावात तरुणांनी आपल्या आजी-आजोबांच्या वयाच्या सत्ताधीशांना लक्ष्य केलं. बहुसंख्य असलेल्या 'जेन झीं'ना लक्षात घेऊन राजकीय कृती कार्यक्रम ठरवले जात नाहीत, याविरुद्धचा हा तरुण संताप सर्वत्र झपाट्याने पसरला. हुकूमशाही प्रवृत्तीच्या सरकारांच्या काळात दिसणारं बुद्धीविरोधी वातावरण तरुणांना निराश आणि म्हणूनच संतप्त करू लागलं आहे. मात्र कशाचा विरोध करायचा, हे ठरवून कृती करताना, कशासाठी, कोणत्या धोरणांसाठी, मूल्यांसाठी लढायचं हे ठरवल्याशिवाय उठावांना 'आंदोलनं' म्हणता येत नाही.

## संस्कृत सुभाषित

पानीयं प्राणिनां प्राणा विश्वमेव च तन्मयम्। न हि
तोयाद्रिना वृत्तिः स्वस्थस्य व्याधितस्य वा ॥

अर्थ – पाणी हा जीवसृष्टीचा प्राण होय. सारे विश्व जलमय आहे. माणूस रोगी असो की निरोगी, कोणाचेही जीवन जलावाचून शक्य नाही.

## गुरु वचन

### दुसऱ्यांचे उपकार विसरू नका

इसापनीतीतील एक छान गोष्ट आहे. एकदा एका जंगलामध्ये एक लांडगा राहत होता. तो अत्यंत खादाड आणि दुष्ट होता. त्याला एकदा खूप जोऱ्याची भूक लागली, त्याने जंगलातले अनेक प्राणी मारून खाल्ले. पण इथेच तो अडकला. एका प्राण्याला मारल्यानंतर त्याला खाताना त्याच्या घशात त्या प्राण्याचे हाड अडकले.

त्याने ते हाड काढायचा खूप प्रयत्न केला, परंतु त्याला यश मिळाले नाही. त्याच्या त्या प्रयत्नांनंतर त्याला खूप त्रास सुरू झाला. त्याला नेमके काय करावे हेच समजत नव्हते. त्याने सुरुवातीला भुरपुर पाणी पिले, परंतु त्याला यश मिळाले नाही. मग त्याने आपल्या इतर मित्रांना आपल्या घशातले हाड काढण्यास सांगितले. परंतु त्याच्या साऱ्या मित्रांनी त्याच्याकडे पाठ फिरवली.

शेवटी त्याला त्याच्या डोक्यावरून एक बगळा उडत जाताना दिसला. त्याने त्या बगळ्याला आपली व्यथा सांगितली. तो म्हणाला बगळ्या तू तुझ्या त्या लांब चोचीने जर माझ्या घशात अडकलेले हे हाड काढलेस तर मी तुला बक्षीस देईन, तुझे ते उपकार मी कधीही विसरणार नाही.

बगळ्याला त्याची दया आली. त्याने लांडग्याला मदत करण्याचे ठरवले. तो त्या लांडग्या जवळ आला आणि त्याने त्या लांडग्याच्या घशात आपली चोच घालून आपल्या चोचीने ते अडकलेले हाड काढले. यानंतर त्या बगळ्याने त्याला आपले बक्षीस मागितले, परंतु त्या धूर्त लांडग्याने त्या बगळ्याला चकमा देत तो तेथून फरार झाला.

यानंतर काही दिवसांनंतर पुन्हा एकदा त्या लांडग्याच्या घशात हाडाचा एक तुकडा अडकला, त्याला पुन्हा बगळा दिसला, परंतु बगळ्याने यावेळेस त्याला मुळीच मदत केली नाही कारण यापूर्वी त्याच्यावर केलेल्या उपकारांना तो लांडगा विसरला होता. म्हणून लक्षात ठेवा कधीही दुसऱ्यांनी केलेल्या उपकारांना विसरू नका.

## उपदेशकथा

### आळसावर उपाय

एक तरुण वेदाभ्यास केल्यानंतर लग्न करून संसारास लागला. त्याची बायको रोज पोटदुखीचं कारण सांगून दिवसभर झोपून राहात असे. हा बिचारा सर्व घरकाम करीत असे. नवऱ्यानं रांधलेला स्वयंपाक मात्र तिला आवडत असे. जेवण केल्यावर पुन्हा तिची पोटदुखी सुरू होत असे. तिचा पती मात्र दिवसेंदिवस काळजीने खंगत चालला. एकदा त्याचे गुरू भेटल्यावर त्याने ही सर्व हकीकत सांगितली. गुरूंना बाईच्या पोटदुखीचं कारण लक्षात आलं. ते म्हणाले, 'हा काढा तिला प्यायला दे. मात्र, तिने हे औषध नाही घेतलं तर या दंडुक्यानं दोन तडाखे दे. तिचं दुखणं पळून जाईल.' बाईनं औषध घेण्यास नकार दिला. तिच्या नवऱ्यानं दंडुक्याचा प्रयोग करावा लागेल, असं सांगताच तिनं औषध न घेता मी बरी होईन, असं सांगितलं व दोन दिवसांची मुदत मागून घेतली. तिचा रोग तात्काळ बरा झाला.

कथा उपदेश : आळसाच्या रोगावर रामबाण औषध सापडते. त्याचा चतुराईनं वापर करणारा वैद्य हवा.

## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | तिथि:द्वितीया १९:०१:२३ |
| २ जून २०२६ | नक्षत्र:मूल २२:०६:०४ |
| मंगळवार | योग:साध्य ०७:१५:३३ |
| विक्रम संवत्– २०८२ | करण:गर १९:०१:२३ |
| अधिक ज्येष्ठशके | करण:वणिज (अहोरात्र) |
| संवत्– १९४८ | सूर्य:वृषभ |
| संवत्सर –पराभवनाम | चन्द्र:धनु |
| अयन– उत्तरायणारंभ | हिजरी सन् – १४४७ |
| मास–अधिक ज्येष्ठ | मुस्लिम मास – जिल्हेज |
| ऋतु– सौर ग्रीष्म | तारीख – १६ |
| कृष्ण पक्ष | |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. ९६६

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 9 | | 4 | 8 | | | 5 |
| 4 | | 5 | | 3 | | 8 | | |
| 7 | 3 | | 2 | | | | 9 | |
| | | | 3 | 9 | | | 1 | 7 |
| 9 | | 3 | | | | 4 | | 2 |
| 2 | 5 | | | 8 | 7 | | | |
| | 1 | | | | 4 | | 5 | 3 |
| | | 7 | | 2 | | 6 | | 1 |
| 3 | | | 9 | 5 | | 7 | | |

### : सूडोकु :

**खेळाचे नियम :** प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

### सूडोकु क्र. ९६५ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 6 | 2 | 1 | 7 | 3 | 8 | 5 | 4 | 9 |
| 8 | 9 | 7 | 4 | 6 | 5 | 2 | 1 | 3 |
| 5 | 4 | 3 | 1 | 9 | 2 | 8 | 6 | 7 |
| 2 | 7 | 4 | 3 | 8 | 6 | 9 | 5 | 1 |
| 1 | 6 | 5 | 2 | 4 | 9 | 3 | 7 | 8 |
| 3 | 8 | 9 | 5 | 1 | 7 | 4 | 2 | 6 |
| 9 | 5 | 8 | 6 | 7 | 4 | 1 | 3 | 2 |
| 7 | 3 | 2 | 9 | 5 | 1 | 6 | 8 | 4 |
| 4 | 1 | 6 | 8 | 2 | 3 | 7 | 9 | 5 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- ०३५० – नेपोटियानसने रोममध्ये घुसून स्वत:ला सम्राट घोषित केले.
- १०९८ – पहिली क्रुसेड – आठ महिने चाललेल्या वेढ्यानंतर क्रुसेडरांनी अँटियोक शहर जिंकले.
- १५३९ – हेर्नान्दो दि सोटोने फ्लोरिडा स्पेनचा भाग असल्याचे जाहीर केले.
- १६६५ – जेम्स स्टुअर्टने नेदरलँडच्या आरमाराला हरवले.
- १८६४ – अमेरिकन गृहयुद्ध – कोल्ड हार्बरची लढाई.
- १८८९ – कॅनेडियन पॅसिफिक रेल्वेने कॅनडाचे दोन्ही तीर जोडले.

### राष्ट्रीय

- २००६ – विधानसभा निवडणूकीत दिलेले आवश्वासन पूर्ण करत तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम. करुणानिधी यांनी आपल्या ८४ व्या वाढदिवसाप्रसंगी दोन रुपये किलो तांदुळ देण्याच्या योजनेस सुरुवात केली.

### जन्म

- १८९० – प्रसिद्ध चित्रपट निर्माते, दिग्दर्शक, चित्रकार आणि शिल्पकार कलामहर्षी बाबूराव पेंटर यांचा जन्म.
- १८९० – सरहदी गांधी म्हणुन प्रसिद्ध असलेले खान अब्दुल गफ्फारखान यांचा जन्म.

### निधन

- १९७७ – आर्किबाल्ड विविअन हिल, ब्रिटिश जीवरसायनशास्त्रज्ञ व नोबेल पारितोषिक विजेते.
- २००० – डॉ. आर. एस. अय्यंगार, ज्येष्ठ शास्त्रज्ञ व महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग ॲप्लिकेशन सेंटरचे संचालक.
- २००७ – रत्नमाला, प्रसिद्ध तामिळ अभिनेत्री.

## : SMS :

Mareez Dr se: Heart badlne k baad mjhe dance or paisa acha lagne laga hai, Kiya mai jawan ho gaya hoon?
Dr: Nhi tumhe jo dil lagaya hai wo Khusre ka hai!

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३६.६ | २६ |
| अहमदनगर | ३६.७ | २४.९ |
| अकोला | ४१.७ | ३०.२ |
| अमरावती | ४१.२ | २९.२ |
| बीड | ४२.९ | ३१.७ |
| भंडारा | ४२.८ | ३०.५ |
| बुलढाणा | ३०.९ | २३.९ |
| चंद्रपूर | ४२.७ | ३२.७ |
| चेन्नई | ४६.५ | ३५.९ |
| नवी दिल्ली | ३३.८ | २४.४ |
| धुळे | ४०.६ | ३०.३ |
| गोंदिया | ४२ | २७.२ |
| जळगाव | ४१.१ | २८.४ |
| कोल्हापूर | ३७.४ | २५.९ |
| लातूर | ३७.४ | २६.२ |
| मुंबई | ४०.६ | ३६.५ |
| नागपूर | ४१.७ | २९ |
| नांदेड | ४०.८ | ३०.२ |
| नंदूरबार | ३८.८ | २६.८ |
| नाशिक | ३६.१ | २६.३ |
| पुणे | ३४.३ | २४.७ |
| पंढरपूर | ३९.४ | २६.८ |
| सातारा | ३७.१ | २४.८ |
| सांगली | ३८.६ | २६.१ |
| सोलापूर | ३९.२ | २९.२ |
| वर्धा | ४२.४ | २९.४ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग: पीवळा, शुभ दिशा:पश्चिम व्यवसायामध्ये अनुकूल अशी सफलता मिळेल. येणाऱ्या खर्चामुळे चिंतेत रहाल.

**तुळ :** शुभ रंग : केसरी, शुभ दिशा: उत्तर कौटुंबिक समस्या आणि स्थावर मालमत्ता या संबंधीतील समस्या दूर होतील.

**वृषभ :** शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा: उत्तर व्यावसायिक योजना गुप्त ठेवा. देण्या घेण्याच्या व्यवहारात सावधपणा ठेवा. मुलांच्या बाबतीत काळजी वाटेल.

**वृश्चिक :** शुभ रंग: निळा, शुभ दिशा: दक्षिण कौटुंबिक समस्यामध्ये लक्ष राहणार नाही. अनिश्चितेमुळे वैचारिक धाडसामध्ये कमतरता राहील.

**मिथुन :** शुभ रंग काळा, शुभ दिशा:पश्चिम रचनात्मक कामात यश मिळेल. आर्थिक योग उत्तम आहे.

**धनु :** शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा: दक्षिण मुलांच्या प्रगतीमुळे मन प्रसन्न राहील. आर्थिक आवक चांगली राहील. वाचनाची गोडी वाढेल.

**कर्क :** शुभ रंग:जांभळा, शुभ दिशा: पश्चिम बौद्धीक अडचणी दूर होतील. फायदेशीर प्रवास होण्याची शक्यता आहे.

**मकर :** शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा: पश्चिम नातेवाईकांशी असलेल्या संबंधात मर्यादा राखा. व्यापारात नवीन संधी मिळतील. आर्थिक उत्पन्नात वाढ होईल.


**सिंह :** शुभ रंग: लाल, शुभ दिशा : पूर्व वेळेचा चांगला उपयोग करून आपल्या आशा आकांक्षा पूर्ण करण्याच्या दृष्टीने कामकाजाला सुरूवात करा.

**कुंभ :** शुभ रंग: काळा: शुभ दिशा:पश्चिम वाद विवाद नोकरी करणाऱ्यांना मनासारखी बढती, बदली होण्याची शक्यता आहे.

**कन्या :** शुभ रंग : गुलाबी, शुभ दिशा:पूर्व भांडण, वादविवादामुळे मानसिक ताण वाढेल. आर्थिक स्थिती मध्यम राहील. पारिवारीक सहकार्याने कामात यश मिळेल.

**मीन :** शुभ रंग: लाल, शुभ दिशा: उत्तर आपले प्रयत्न आज सफल होतील. व्यापारात योग्यवेळी घेतलेला निर्णय फायदेशीर राहील. शिक्षणात यश मिळेल.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ९६६



### आडवे शब्द

१. अत्यंत प्रिय असा
४. इंद्रिय
७. राजगादी
१०. संगीतातील एक राग
१२. नंतर
१३. चीतपट
१५. भडीमार
१६. बातमीदार
१८. दुबळा, गरीब
१९. हिमालयातील पांडवकालीन सरोवर
२१. राखीपौर्णिमेच्या दुसऱ्या नावात आढळणारे 'संरक्षण'
२३. गावगाड्यातील ग्रामप्रमुख
२५. आशीर्वाद
२८. चटकन
३१. कहाणीतील गाव
३३. दृष्टी, दृष्ट
३४. हिस्सेदार
३६. बोरुबहाद्दरांची धारदार लेखणी, देव्हाऱ्यात असल्यास पूजेचा मान
३९. माझे
४१. हिंमत दाखवण्यासाठी यात जोर हवा!
४३. चुलता
४४. बांबू
४६. धुराने भरलेले, पुसट
४८. याच्यावर केलेल्या चटणीचा स्वादच वेगळा!
५१. कबूतर
५२. सीतापती
५४. सावधगिरी
५६. निराश झालेला
५८. लोकनाट्य
६०. नूतन
६१. अस्वल
६४. पार्वतीचे एक नाव
६५. महिरप
६६. विहिणीचे नाते जोडले गेलेली नणंद
६७. हवाई अड्डा
६८. अडचणी आणणारी गरज
६९. निकट
७०. गुरुदत्त–श्यामाचा गाजलेला चित्रपट
७२. महागडे लाकूड
७३. सगळ्यात सोपे झटपट पक्वान्न
७४. अंदाज, तर्क
७५. घाई, त्वरा
७६. खुळचट सवयी
७७. मुक्ती
७८. चऱ्हाट

### उभे शब्द

१. सतत, ठायी ठायी
२. प्रेयसी
३. मृत्यूदेवता
५. वरपांगी
६. जंगलातील आग
८. युद्ध
९. धमकी
११. देवाशी केलेला करार
१४. असंस्कारित
१७. उपस्थित
२०. डोळे
२२. निरसन, निराकरण
२३. शेल्याच्या जोडीचे
२४. स्वच्छंदी, लहर फिरेल तसे वागणारा
२६. धपाटा, थप्पड
२७. भळतीकडेच जाणे
२९. स्थूल व्यक्तींना वाकुल्या दाखणारा
३०. हात, हस्त
३१. कामाबरोबर हाही हवाच!
३२. रायगडावरील एक कडा
३४ भांडण
३५. पंकज
३८. पार दूरदेशी असे सांगताना यांची संख्या सात
४०. गोड
४२. नृत्यकलेचे दैवत
४३. फणसाची एक जात
४४. नजरफेक
४५. ओटा, चबुतरा
४७. मार्गस्थ
४९. उसनवारी
५०. नमस्कार
५१. मुरली
५३. हद्द, मर्यादा
५५. दिनांक
५७. दशानन
५८. फिकीर, काळजी
५९. शाळेतील गुरुजी
६२. टोळीचा प्रमुख
६३. पसंती–ज्याची त्याची
६४. बगीचा
६५. 'मी'पणाचा दर्प असलेला
६६. माणुसकी
६९. तरुण
७०. आयुर्वेदिक द्रव औषध
७१. पदर
७२. लुगडे, पात्तळ
७३. चालू कामातील अडथळा–बहुदा आणलेला
७४. विभाग, भाग

### जम्बो शब्दकोडे क्र. ९६५ चे उत्तर

आडवे उत्तर १.कूरूक्षेत्र ४.माझा छकुला ८.अभाव १२.राम १३.स्तवन १५.डावरा १६.वजीर १८.नवरा२०.पर्ण २१.मारका २२.सलमा २४.मत २६.कालनिर्णय २८.कला २९.गणपती ३२.बारकावा ३४.उणे ३५.वलय ३६.समान ३८.कमळ ३९.आकाश ४०.सज्जनगड ४२.रगड ४४.कसम ४६.हार ४७.आकलनीय ४९.डमरू ५०.मस ५२.गमी ५३.निकड ५४.यजमान ५६.झाडू ५७.बकाल ५८.रीम ५९.नवस ६०.गवगवा ६३.राज ६५.वानवा ६६.रूजवात ६७.कमाल ६९.जनगनमन ७२.लगदा ७३.वादा ७४.गन ७५.अरूणाचल प्रदेश ७९.नरवर ८०.जड ८१.तर

उभे उत्तर : १.कुरापत २.रूम ३.त्रस्त ४.मानव ५.छडा ६.कुवत ७.लारा ८.अवर्णनीय ९.भाजी १०.वरमाय ११.सरकार १४.वनमाला १७.रस १९.राम गणेश गडकरी २०.पल २३.लकवा २५.तन २६.कातील २७.करमणुक ३०.पवन ३१.धनगर ३२.बाळ ३३.काक ३४.ऊकार ३६.सज्ज ३७.मानहानी ४०. समसमान ४१. गनिमीकावा ४३.डमडम ४५.समज ४७.अनुराग ४८.लगबग ५१.पांडू हवालदार ५४.यमराज ५५.नवल ६१.वजनदार ६२.आनन ६५.जवागल ६७.कलश ६८.माग ६९.जवान ७०.नगर ७१.गरूड ७५.अज ७६.चर्म ७७.प्रत ७८.देर

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

# हातभट्टीची दारू कायमस्वरूपी हद्दपार होणे गरजेचे : राज्यमंत्री रामदास आठवले

## अनुसूचित जाती उपवर्गीकरण २०२७ च्या जनगणनेच्या आधारे झाले पाहिजे



पुणे (दै. संध्या)

केवळ राज्यातच नव्हे तर देशभरात सर्रास विक्री जाणारी हातभट्टीची दारू अत्यंत घातक असून ती कायमस्वरूपी हद्दपार करण्यासाठी पोलिसांनी कठोर पावले उचलावी, अशी सूचना केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी केली. पुणे आणि पिंपरी चिंचवड या ठिकाणी रसायनयुक्त विषारी दारू घेतल्यामुळे तब्बल 22 जणांचा मृत्यू झाला आहे. आठवले यांनी काही मृतांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. मुलांच्या कुटुंबीयांना राज्य सरकारकडून पाच लाख रुपये तर महापालिकेकडून एक लाख रुपये मदत देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे मृतांच्या वारसांना नोकरी मिळावी अशी कुटुंबीयांची मागणी असून त्यादृष्टीने महापालिका आयुक्त चर्चा केल्याचेही आठवले यांनी सांगितले. यानंतर पुण्यात आयोजित पत्रकार परिषदेत आठवले बोलत होते. यावेळी आरपीआयचे पुणे शहराध्यक्ष संजय सोनवणे, प्रदेश सचिव बाळासाहेब जानराव, उपमहापौर परशुराम वाडेकर, नगरसेवक निलेश आल्हट, महिपाल वाघमारे, शाम सदाफुले, मोहन जगताप, अशोक गायकवाड, सलीम सय्यद, बसवराज गायकवाड, उमेश कांबळे, संदीप धांडोरे, सोनू निकाळजे, हबीब सय्यद, सुनील गवळी आदी उपस्थित होते. मध्यपूर्वेतील युद्धजन्य परिस्थितीमुळे जगभरात आर्थिक संकट उभे राहिले आहे. देशात या संकटाची व्याप्ती कमी करण्यासाठी सरकारला नाईलाजाने इंधन दरात वाढ करावी लागली आहे. त्यामुळे सर्वच क्षेत्रात महागाई वाढली असून त्याची झळ सर्वसामान्य नागरिकांना पोहोचत आहे. मात्र, युद्ध समाप्ती दृष्टिक्षेपात असून त्यानंतर इंधनाचे दर निश्चितपणे कमी केले जातील. अर्थातच महागाईला आळा बसण्यास मदत होईल, अशी ग्वाही आठवले यांनी दिली. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे 'महागाई मॅन' असल्याचा लोकसभेतील विविरोधीपक्ष नेते राहुल गांधी यांचा आरोप पूर्णपणे बिनबुडाचा असल्याचा दावा आठवले यांनी केला. वास्तविक मोदी हे विकास मॅन आणि देशाची शान असल्याचे त्यांनी नमूद केले.

अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाला काही जातींचा पाठिंबा आहे तर काही जातींचा विरोध आहे. याबाबत आपल्या पक्षाची भूमिका स्पष्ट करताना आठवले म्हणाले की, सन 2027 मध्ये होणाऱ्या जनगणनेच्या आधारे 59 हा अनुसूचित जातींना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण देण्यात यावे, अशी आपली भूमिका आहे.

मराठा आरक्षण आंदोलन मनोज जरांगे पाटील यांनी आपले उपोषण मागे घेतल्याबद्दल आठवले यांनी त्यांचे आभार मानले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार यांच्यासह राज्य सरकार मराठा आरक्षणाच्या बाजूने आहे. केंद्र सरकारने मराठा समाजाला दहा टक्के इडब्ल्यूएस आरक्षण दिलेले आहे राज्यातही ते मिळावे या दृष्टीने राज्य सरकारने पावले उचलावी. कुणबी नोंदी असलेल्या मराठा समाज घटकांना इतर मागास प्रवर्गातून आरक्षण देण्यास हरकत नाही. मात्र, सरसकट मराठा समाजाला या प्रवर्गातून आरक्षण दिल्यास सर्वोच्च न्यायालयाकडून ते नाकारले जाईल, असे आठवले यांनी स्पष्ट केले.

### रिपब्लिकन पक्षाला सत्तेत वाटा मिळालाच पाहिजे

पुरेशा संख्याबळाअभावी रिपब्लिकन पक्षाने विधान परिषदेत उमेदवारीसाठी दावा केलेला नाही. मात्र, रिपब्लिकन पक्षाला विधान परिषदेची एक जागा देण्याचे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यापूर्वीच दिले आहे. त्यानुसार या निवडणुकीत पक्षाला एक जागा मिळेल अशी अपेक्षा होती. मात्र, ती मिळालेली नाही. आगामी काळात पाच जागांसाठी होणाऱ्या निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाला एक जागा मिळेल, अशी आशा असल्याचे आठवले यांनी सांगितले. त्याचप्रमाणे दोन शासकीय महामंडळाचे अध्यक्षपद देखील पक्षाला मिळावे अशी आपली मागणी असून त्यासाठी मुख्यमंत्र्यांशी चर्चा करणार असल्याचेही त्यांनी सांगितले. रिपब्लिकन पक्ष हा छोटा असला तरी देखील तो महायुतीचा घटक पक्ष आहे याची जाणीव मित्र पक्षांनी ठेवावी आणि रिपब्लिकन पक्षाला सत्तेत योग्य तो वाटा मिळावा, असेही आठवले यांनी सुनावले.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### पुण्यात राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये संजय काकडे व विक्रम काकडे यांचा पक्षप्रवेश


पुणे (दैनिक संध्या) : पुण्यातील जिजाई निवासस्थानी आज राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये संजय काकडे व विक्रम काकडे यांचा पक्षप्रवेश सोहळा पार पडला. युवा नेते तथा खासदार पार्थ अजितदादा पवार व जय अजितदादा पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पक्षप्रवेश संपन्न झाला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आमदार, विविध पदाधिकारी तसेच कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. पक्षाच्या विचारधारेवर विश्वास व्यक्त करत संजय काकडे व विक्रम काकडे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. या पक्षप्रवेशामुळे पुणे शहर व जिल्ह्यात पक्ष संघटनेला अधिक बळ मिळणार असल्याचा विश्वास उपस्थित नेत्यांनी व्यक्त केला. तसेच आगामी काळात पक्ष संघटना अधिक सक्षम करण्यासाठी सर्वांनी एकजुटीने कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला.

### कॉन्स्टेबल व मॅरेथॉनपटू अक्षय यादव यांना 'स्टार महाराष्ट्र गौरव पुरस्कार 2026' जाहीर



पुणे (दैनिक संध्या) : समाजसेवा, कर्तव्यनिष्ठा आणि क्रीडा क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल मुंबई पोलीस दलातील कॉन्स्टेबल तथा यशस्वी मॅरेथॉनपटू अक्षय अधिक यादव यांची 'स्टार महाराष्ट्र गौरव पुरस्कार २०२६' साठी निवड करण्यात आली आहे. अवघ्या २९ व्या वर्षी अक्षय यादव हे मुंबई पोलीस दलात कॉन्स्टेबल म्हणून कार्यरत असून त्यांची नियुक्ती वरळी पोलीस मुख्यालय येथे आहे. पोलीस सेवेत असताना त्यांनी आपल्या कर्तव्याचे प्रामाणिकपणे पालन करत नागरिकांच्या सुरक्षेसाठी उल्लेखनीय कार्य केले आहे. कर्तव्य बजावत असतानाच त्यांनी क्रीडा क्षेत्रातही आपला ठसा उमटवला आहे. मॅरेथॉन धावपटू म्हणून विविध स्पर्धांमध्ये सहभाग नोंदवत त्यांनी उत्कृष्ट कामगिरी केली असून अनेक युवकांसाठी ते प्रेरणास्थान ठरले आहेत. त्यांची जिद्द, शिस्त, मेहनत आणि समाजाप्रती असलेली बांधिलकी विशेष उल्लेखनीय मानली जाते. सार्वजनिक सेवेमधील योगदान तसेच क्रीडा क्षेत्रातील उल्लेखनीय यशाची दखल घेत त्यांना 'स्टार महाराष्ट्र गौरव पुरस्कार २०२६' प्रदान करून सन्मानित करण्यात येणार आहे. या यशाबद्दल अक्षय अधिक यादव यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत असून त्यांच्या उज्वल भविष्यासाठी शुभेच्छांचा वर्षाव केला जात आहे.

### प्रगत मेंदू शस्त्रक्रियेमुळे 67 वर्षीय महिलेची तीव्र चेहऱ्याच्या वेदनांपासून सुटका



पुणे (दैनिक संध्या) : गेल्या पाच वर्षांपासून चेहऱ्यात तीव्र वेदना सहन करणाऱ्या ६७ वर्षीय महिलेला मणिपाल हॉस्पिटल, खराडी, पुणे येथे करण्यात आलेल्या प्रगत मेंदू शस्त्रक्रियेमुळे अखेर मोठा दिलासा मिळाला आहे. संबंधित महिला ट्रायजेमिनल न्युराल्जिया या न्यूरोलॉजिकल आजाराने त्रस्त होती. या आजारामध्ये चेहऱ्यावर अचानक विजेचा झटका बसल्यासारख्या तीव्र आणि असह्य वेदना होतात. कालांतराने या वेदना इतक्या वाढल्या की खाणे, बोलणे, दात घासणे आणि चेहरा धुणे यांसारख्या दैनंदिन साध्या गोष्टीदेखील तिच्यासाठी अत्यंत कठीण बनल्या होत्या. दीर्घकाळ औषधोपचार सुरू असूनही तिची लक्षणे वाढतच गेली आणि त्यामुळे तिच्या दैनंदिन आयुष्याबरोबरच मानसिक स्वास्थ्यावरही मोठा परिणाम झाला होता. सविस्तर वैद्यकीय तपासणी आणि प्रगत न्यूरोइमेजिंगनंतर डॉक्टरांना असे आढळून आले की सुपीरियर सेरेबेलर आर्टरी नावाची रक्तवाहिनी ट्रायजेमिनल नर्व्हवर दबाव आणत होती आणि त्यामुळे तीव्र वेदनांचे झटके येत होते. त्यानंतर रुग्णाला मायक्रोव्हॅस्क्युलर डीकंप्रेशन (एमव्हीडी) ही विशेष शस्त्रक्रिया करण्याचा सल्ला देण्यात आला. ट्रायजेमिनल न्युराल्जियासाठी ही शस्त्रक्रिया अत्यंत प्रभावी आणि मान्यताप्राप्त उपचारपद्धती मानली जाते. या प्रकरणाविषयी माहिती देताना मणिपाल हॉस्पिटल, खराडी, पुणे येथील न्यूरोसर्जन डॉ. सचिन चिमटे पाटील म्हणाले, " ट्रायजेमिनल न्युराल्जिया हा सर्वाधिक वेदनादायक न्यूरोलॉजिकल आजारांपैकी एक मानला जातो. अनेक रुग्ण औषधोपचार हाच एकमेव पर्याय आहे असे समजून अनेक वर्षे शांतपणे वेदना सहन करत राहतात. मात्र काही निवडक रुग्णांमध्ये प्रगत मायक्रोसर्जिकल तंत्रज्ञानामुळे दीर्घकालीन आराम मिळू शकतो आणि जीवनमानात मोठी सुधारणा होऊ शकते. साधारणपणे पारंपरिक मायक्रोव्हॅस्क्युलर डीकंप्रेशन शस्त्रक्रियेमध्ये नर्व्ह आणि रक्तवाहिनी यांच्या मधे टेफ्लॉनचे छोटे साहित्य ठेवून दबाव कमी केला जातो. मात्र या प्रकरणात आम्ही 'ट्रान्सपोजिशन टेक्निक' या प्रगत तंत्राचा वापर केला. या तंत्रामध्ये दबाव निर्माण करणारी रक्तवाहिनी नर्व्हपासून अत्यंत काळजीपूर्वक वेगळी करून दुसऱ्या सुरक्षित ठिकाणी हलवली जाते. " ते पुढे म्हणाले , " यानंतर विशेष वैद्यकीय गोंदाच्या साहाय्याने ती रक्तवाहिनी सभोवतालच्या आवरणाला सुरक्षितपणे स्थिर करण्यात आली. त्यामुळे नर्व्ह आणि रक्तवाहिनी यांच्या मधे कोणतेही साहित्य न ठेवता वेदनेचे मूळ कारण दूर करण्यात मदत झाली. विशेषतः दैनंदिन कामांवर परिणाम होऊ लागल्यानंतर लवकर निदान आणि वेळेवर उपचार करणे अत्यंत महत्त्वाचे असते ."

# कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातील करिअरसाठी 'एमआयटी एडीटी' विद्यापीठाचा नवा उपक्रम

*कृत्रिम बुद्धिमत्ता व यंत्र शिक्षण आणि कृत्रिम बुद्धिमत्ता व डेटा विज्ञान अभ्यासक्रमांना प्रवेश सुरू; उद्योगाभिमुख शिक्षणावर भर*

पुणे (दै. संध्या)




एमआयटी आर्ट, डिझाईन अँड टेक्नॉलॉजी विद्यापीठाने (एमआयटी-एडीटी) 'स्कूल ऑफ आर्टिफिशियल इंटेलिजन्स' (एसओएआय) स्थापनेची घोषणा केली आहे. विद्यापीठाच्या राष्ट्रीय स्तरावरील उत्कृष्टतेच्या प्रवासातील हा एक महत्त्वपूर्ण टप्पा मानला जात आहे. उद्योग आणि समाजामध्ये परिवर्तन घडवून आणणारे नैतिक, सर्जनशील आणि तांत्रिकदृष्ट्या सक्षम कृत्रिम बुद्धिमत्ता तज्ज्ञ घडविणे हे या स्कूलचे प्रमुख उद्दिष्ट आहे. स्कूल ऑफ आर्टिफिशियल इंटेलिजन्स अंतर्गत बी.टेक (कृत्रिम बुद्धिमत्ता व यंत्र शिक्षण) आणि बी.टेक (कृत्रिम बुद्धिमत्ता व डेटा विज्ञान) हे चार वर्षांचे पदवी अभ्यासक्रम उपलब्ध करण्यात आले आहेत. कॉम्प्युटर सायन्स आणि इंजिनिअरिंगच्या मजबूत पायावर आधारित या अभ्यासक्रमांमध्ये विद्यार्थ्यांना कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातील विविध विशेष शाखांमध्ये प्राविण्य मिळविण्याची संधी उपलब्ध होणार आहे. डीप लर्निंग, कॉम्प्युटर व्हिजन, नॅचरल लँग्वेज प्रोसेसिंग, निर्मितीक्षम कृत्रिम बुद्धिमत्ता (Generative AI), डेटा ॲनालिटिक्स आणि इंटेलिजंट सिस्टिम्स डिझाईन यांसारख्या अत्याधुनिक क्षेत्रांमध्ये विद्यार्थ्यांना सखोल ज्ञान दिले जाणार आहे. एमआयटी-एडीटी विद्यापीठातर्फे आयोजित पत्रकार परिषदेत कुलगुरू प्रा. डॉ. राजेश एस., प्र-कुलगुरू डॉ. रामचंद्र पुजेरी आणि अधिष्ठाता डॉ. गणेश पाठक यांनी याबाबतची माहिती दिली. यावेळी प्रा. डॉ. राजेश एस. म्हणाले, "या स्कूलचे वैशिष्ट्य म्हणजे त्याची कृत्रिम बुद्धिमत्ता-केंद्रित शिक्षण पद्धती. पहिल्याच सत्रापासून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष उद्योगांमधील समस्यांवर आधारित प्रकल्प, वास्तववादी डेटा संच (डेटासेट्स) आणि आधुनिक कृत्रिम बुद्धिमत्ता साधनांसह काम करण्याची संधी मिळणार आहे. तसेच 'कृत्रिम बुद्धिमत्ता प्रॅक्टिस स्कूल' मॉडेलअंतर्गत विद्यार्थ्यांना उद्योगांमध्ये दीर्घकालीन इमर्शन प्रोग्रामद्वारे प्रत्यक्ष कृत्रिम बुद्धिमत्ता प्रकल्पांवर काम करण्याचा अनुभव दिला जाणार आहे." राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० (एनईपी २०२०) शी सुसंगत असा हा अभ्यासक्रम तयार करण्यात आला असून, हेल्थकेअर, फिनटेक, ॲग्रीटेक, निर्मितीक्षम कृत्रिम बुद्धिमत्ता आणि स्वायत्त कृत्रिम बुद्धिमत्ता (Agentic AI) यांसारख्या महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये विशेष अभ्यासाची सुविधा उपलब्ध असेल. क्लाउड कॉम्प्युटिंग, ब्लॉकचेन, क्वांटम कॉम्प्युटिंग आणि ह्युमन-कॉम्प्युटर इंटरॅक्शन यांसारख्या बहुआयामी विषयांमुळे विद्यार्थ्यांचे ज्ञान अधिक व्यापक होणार आहे. उद्योग क्षेत्राशी मजबूत संबंध हे 'एसओएआय' मॉडेलचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. अग्रगण्य तंत्रज्ञान कंपन्यांसोबत भागीदारी करून उद्योगतज्ज्ञांकडून सहशिक्षण, AWS Academy, Coursera आणि edX यांसारख्या जागतिक प्लॅटफॉर्म्ससोबत संयुक्त प्रमाणपत्र अभ्यासक्रम तसेच उद्योग-प्रायोजित कॅपस्टोन प्रकल्प राबविण्याची योजना विद्यापीठाने आखली आहे. प्रत्येक विद्यार्थ्याला शैक्षणिक मार्गदर्शकासोबत उद्योग मार्गदर्शकाचीही साथ मिळणार असून, शिक्षण आणि व्यावसायिक अनुभव यांमधील दरी कमी करण्यावर भर दिला जाणार आहे.

लोणी काळभोर येथील एमआयटी-एडीटी विद्यापीठाच्या विस्तीर्ण आणि अत्याधुनिक कॅम्पसमध्ये हे स्कूल कार्यरत राहणार आहे. सुमारे १५ लाख चौरस फूट परिसरात अत्याधुनिक कृत्रिम बुद्धिमत्ता प्रयोगशाळा, आयसीटी-सक्षम स्मार्ट क्लासरूम्स, GPU (ग्राफिक्स प्रोसेसिंग युनिट) आणि TPU (टेन्सर प्रोसेसिंग युनिट) आधारित संगणकीय सुविधा तसेच संशोधन आणि इनक्युबेशन स्पेसेस उपलब्ध असतील.

## पुणे स्थानिक प्राधिकारी मतदार संघाची अंतिम मतदार यादी जाहीर

पुणे (दै. संध्या)

■ ८६७ मतदारांचा समावेश

महाराष्ट्र विधान परिषदेच्या पुणे स्थानिक प्राधिकारी मतदार संघाच्या निवडणुकीसाठी अंतिम मतदार यादी शनिवारी (दि. ३१ मे) प्रसिद्ध करण्यात आली. या अंतिम यादीत एकूण ८६७ मतदारांचा समावेश असून त्यापैकी ४४१ पुरुष आणि ४२६ महिला मतदार आहेत, अशी माहिती पुणे स्थानिक प्राधिकारी मतदार संघाचे नोंदणी अधिकारी गजानन पाटील यांनी दिली.

निवडणुकीसाठी पुणे जिल्ह्यात ११ मतदान केंद्रे निश्चित करण्यात आली असून मतदारांना त्यांच्या संबंधित केंद्रांवर मतदान करता येणार आहे. मतदान केंद्रांमध्ये पुणे, पिंपरी-चिंचवड, मंचर, राजगुरुनगर, शिरूर, दौंड, बारामती, सासवड, भोर, वडगाव मावळ आणि हडपसर येथील शाळा व प्रशासकीय इमारतींचा समावेश करण्यात आला आहे.

या निवडणुकीत स्थानिक स्वराज्य संस्थांमधील पात्र सदस्यांना मतदानाचा अधिकार असणार आहे. त्यामध्ये पुणे महानगरपालिका, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, जिल्हा परिषद, नगरपरिषद, नगरपंचायत तसेच कॅन्टोन्मेंट बोर्ड क्षेत्रातील पात्र सदस्यांचा मतदार म्हणून समावेश करण्यात आला आहे.

अंतिम मतदार यादी जिल्हाधिकारी तथा मतदार नोंदणी अधिकारी कार्यालय, निवासी उपजिल्हाधिकारी तथा सहायक मतदार नोंदणी अधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद, पुणे आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, विविध नगरपालिका, नगरपंचायती तसेच सर्व कॅन्टोन्मेंट बोर्डांच्या निवडणूक विभाग कार्यालयांमध्ये नागरिकांच्या पाहणीसाठी उपलब्ध करून देण्यात आली आहे.

निवडणूक प्रक्रियेच्या पार्श्वभूमीवर अंतिम मतदार यादी प्रसिद्ध झाल्याने संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सदस्यांमध्ये उत्सुकता वाढली असून पुढील निवडणूक कार्यक्रमाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## पुरुषांचा विद्वेष करणे म्हणजेच स्त्रीवाद नव्हे

### रमाई साहित्य संमेलनाचे अध्यक्षपदावरून विद्रोही कवयित्री रमणी सोनवणे यांचे प्रतिपादन

पुणे (दै. संध्या)



पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये मुजोर असलेल्या सत्ता आणि संस्कृतीने स्त्रीला विविध नात्यांच्या आणि परंपरांच्या चौकटीत अडकवून टाकले असले तरी देखील केवळ विद्वेष करणे म्हणजे स्त्रीवाद नाही, असे प्रतिपादन विद्रोही कवयित्री आणि पहिल्या रमाई साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष रमणी सोनवणे यांनी केले.

महामाता रमाबाई भीमराव आंबेडकर राष्ट्रीय स्मारक यांच्या वतीने रमाबाई आंबेडकर यांच्या स्मृतिदिनाच्या आणि राष्ट्रीय स्मारकाच्या आठव्या वर्धापन दिनानिमित्त प्रथमच आयोजित करण्यात माता रमाई साहित्य संमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी संमेलनाध्यक्ष म्हणून रमणी सोनवणे बोलत होत्या. संमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष श्रीपाल सबनीस, रंगत संगत प्रतिष्ठानचे अध्यक्ष ॲड. प्रमोद आडकर, पुणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त ज्ञानेश्वर मोळक, साहित्य आणि संस्कृती क्षेत्रामध्ये कार्य करणारे सचिन इटकर, माजी नगरसेविका लता राजगुरू, संमेलनाचे मुख्य आयोजक विठ्ठल गायकवाड, ॲड नितीन घोडके, प्रशांत खिस्ती आदी मान्यवर उपस्थित होते.

भारतीय संविधानाने आपली बौद्धिक भूक भागवण्याचे कार्य केले. त्याचप्रमाणे एक स्त्री म्हणून समाजात समानतेचे स्थान देण्याचे कार्य केले. संविधानाच्या अंमलबजावणीपूर्वी समाजामध्ये पुरुष सत्ता संस्कृती मजूर होती. स्त्रीला नात्यांच्या आणि जबाबदारीच्या चौकटीत गुरफटून टाकण्यात आले होते. मात्र, केवळ पुरुषांना विरोध करणे म्हणजेच स्त्रीवाद नसून स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने हक्क आणि जबाबदाऱ्या प्रधान करणे हे समाजाच्या दृष्टीने महत्त्वाचे असल्याचे रमणी सोनवणे यांनी यावेळी नमूद केले.

विविध विचारांची साहित्य संमेलन आहे म्हणजे विचारांचे मंथन असून त्या माध्यमातून विचारांची देवाण-घेवाण होणे समाजासाठी पोषक असल्याचे मत श्रीपाल सबनीस यांनी यावेळी व्यक्त केले साहित्य संमेलना सारखे उपक्रम म्हणजे विचारांची बेरीज असून समाजासाठी पोषक असल्याचे त्यांनी नमूद केले.

आपले विचार व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य घेत असताना इतरांच्या श्रद्धा दुखावू नये, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचा विचार पुढे घेऊन जाणाऱ्या संमेलनाध्यक्षा रमणी सोनवणे या समाजासाठी आश्वासक असल्याचे मतही त्यांनी व्यक्त केले.

या एक दिवसीय रमाई साहित्य संमेलनात दिवसभर सामाजिक, सांस्कृतिक आणि वैचारिक कवी संमेलन, परिसंवाद आणि सांगितिक कार्यक्रम सादर करण्यात आले.

# आरक्षण उपवर्गीकरणाचा हट्ट मातंग नेत्यांनी सोडावा

■ उपवर्गीकरणामुळे समाजाचे अतोनात नुकसानच होणार : राहुल डंबाळे

■ 'लहुजी वस्ताद साळवे आयोग' पूर्णतः एकतर्फी आणि राजकीय हेतूने प्रेरित!

■ गेल्या २० वर्षांत कोणत्याही आयोगाने मातंग समाजाला अप्रगत ठरवलेले नाही.

■ सरकारी नोकरभरतीच नसताना उपवर्गीकरणाचा फटका विद्यार्थ्यांना का? समाजबांधवांनी विचार करावा.



पुणे (दै. संध्या)

"अनुसूचित जातीच्या (SC) आरक्षणातील उपवर्गीकरणामुळे दलित आणि वंचित घटकांमध्ये अंतर्गत वाद निर्माण होऊन समाजाचे अतोनात नुकसान होणार आहे. त्यामुळे मातंग समाजाच्या नेत्यांनी आरक्षणाच्या उपवर्गीकरणाचा आपला हट्ट तातडीने सोडून द्यावा," असे परखड आवाहन आरक्षण उपवर्गीकरण पुनर्विलोकन समितीचे संयोजक राहुल डंबाळे यांनी येथे केले आहे.

पुण्यात आयोजित बैठकीत ते बोलत होते. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर आरक्षणाच्या उपवर्गीकरणाबाबत देशभरात विविध मतप्रवाह समोर येत आहेत. या पार्श्वभूमीवर राहुल डंबाळे यांनी आपली आणि समितीची सविस्तर भूमिका स्पष्ट केली.

यावेळी बोलताना राहुल डंबाळे म्हणाले की, "आरक्षणाच्या उपवर्गीकरणासाठी सातत्याने 'क्रांतीगुरू लहुजी वस्ताद साळवे आयोगाचा' हवाला दिला जातो. परंतु, हा आयोग पूर्णतः एकतर्फी आणि राजकीय हेतूने प्रेरित होऊन, चुकीच्या माहितीच्या आधारे तयार करण्यात आला होता हे एव्हाना स्पष्ट झाले आहे. वस्तुस्थिती ही आहे की, गेल्या वीस वर्षांत देशातील किंवा राज्यातील कोणत्याही अधिकृत समितीने अथवा आयोगाने मातंग समाजाला 'अप्रगत' ठरवलेले नाही. असे असताना केवळ राजकीय स्वार्थासाठी हा चुकीचा अहवाल पुढे केला जात आहे."

ते पुढे म्हणाले की, "सध्याच्या काळात शासकीय क्षेत्रातील नोकरभरती जवळपास बंद आहे. मुळात नोकरभरतीच शिल्लक नसताना, केवळ आरक्षणाच्या उपवर्गीकरणाचा घाट घातल्यामुळे याचा अत्यंत गंभीर आणि विपरीत परिणाम शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या मातंग समाजातील गरीब व होतकरू विद्यार्थ्यांवर होणार आहे. शैक्षणिक प्रवेशाच्या वेळी या वर्गीकरणामुळे विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान होईल."

"आज जे पुढारी आरक्षणाच्या उपवर्गीकरणासाठी अडून बसले आहेत, ते केवळ नोकऱ्या आणि शिक्षणापुरतेच उपवर्गीकरण का मागत आहेत? ते विधानसभा, लोकसभा किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये 'राजकीय उपवर्गीकरणाची' (Political Sub-categorization) मागणी का करत नाहीत? तिथेही मातंग समाजाला लोकसंख्येच्या प्रमाणात राजकीय प्रतिनिधित्व मिळायला हवे, अशी मागणी हे नेते का करत नाहीत? याचा सखोल विचार आता सर्वसामान्य समाजबांधवांनी करणे अत्यंत आवश्यक आहे," असेही डंबाळे यांनी आवर्जून नमूद केले.

आरक्षणाचे उपवर्गीकरण करणे हे मूळ घटनात्मक आरक्षणाच्या तत्त्वाला धक्का लावणारे ठरू शकते. यामुळे उपेक्षित घटकांमध्ये ऐक्य राहण्याऐवजी आपापसात फूट पडेल. मातंग समाजाच्या खऱ्या प्रगतीसाठी दर्जेदार शिक्षण, रोजगार आणि विशेष आर्थिक पॅकेजची गरज आहे. त्यामुळे नेत्यांनी हा हट्ट मागे घेऊन समाजाची दिशाभूल थांबवावी, असे आवाहन त्यांनी शेवटी केले.

# समाज म्हणून इतिहासातील चुकांची पुनरावृत्ती टाळायला हवी

## ज्येष्ठ पत्रकार पुष्पेंद्र कुलश्रेष्ठ यांचे प्रतिपादन; ब्राह्मण सांस्कृतिक संघ आणि 'हर घर सावरकर' संस्थेतर्फे व्याख्यान

**पुणे (दै. संध्या) :**



"जो समाज इतिहासाकडून शिकत नाही आणि भूतकाळातील चुका पुन्हा करतो, त्याचे भवितव्य शंकास्पद राहते. त्यामुळे भारतीय समाज म्हणून आपण इतिहासाकडून बोध घेतला पाहिजे आणि चुकांची पुनरावृत्ती टाळली पाहिजे, असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार आणि प्रभावी वक्ते पुष्पेंद्र कुलश्रेष्ठ यांनी केले. याच मनोवृत्तीमुळे तत्कालीन समाज स्वातंत्र्यवीर सावरकर आणि सुभाषचंद्र बोस यांच्या बाजूने ठामपणे उभा राहिला नाही, याकडेही त्यांनी लक्ष वेधले. राम मंदीराच्या उभारणीमध्ये शहीद झालेल्या कारसेवकांचे नाव आयोध्येत व इतिहासात कोरले जावे, यासाठी आपण मोहीम हाती घेऊ आणि त्याची सुरुवात बाणेर सभेमधून होतेय, याचा आनंद वाटत असल्याचेही त्यांनी नमूद केले.


स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त ब्राह्मण सांस्कृतिक संघ आणि हर घर सावरकर या संस्थांच्या वतीने आयोजित व्याख्यानात कुलश्रेष्ठ बोलत होते. बाणेर येथील माऊली गार्डनमध्ये आयोजित कार्यक्रमावेळी हिंदू आध्यात्मिक सेवा संस्थेचे अध्यक्ष आणि प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक कृष्णकुमार गोयल, सावरकर विचार दर्शनचे संपादक आणि स्वातंत्र्यवीर सावरकरांचे नातू सात्यकी सावरकर, हर घर सावरकरचे गिरीश देशपांडे, ब्राह्मण सांस्कृतिक संघाचे उमेश फडके, उमा गाडगीळ, अस्मिता करंदीकर आदी मान्यवर उपस्थित होते. कुलश्रेष्ठ यांच्या हस्ते दीपप्रज्वलन आणि सावरकर प्रतिमापूजन करून कार्यक्रमाची सुरवात झाली.

कुलश्रेष्ठ यांनी आपल्या व्याख्यानात हिंदु-मुसलमान, संविधान, सेक्यूलर संकल्पना, बाबरी मशीद आणि राम मंदिर, वंदेमातरम् गीत अशा संवेदनशील मुद्यांविषयी मतप्रदर्शन केले. समाजात तथाकथित 'बडे आदमीं'चा सुळसुळाट झाला आहे आणि त्यांचे अनुकरण वाढत आहे. हे धोकादायक असून, त्यामुळे समाजापुढील खरे आदर्श मागे पडतात. स्वातंत्र्यदिनाविषयी ते म्हणाले, १५ ऑगस्ट १९४७ या दिवशी भारत स्वतंत्र झाला, असे म्हणणे योग्य नाही. त्या दिवशी फक्त सत्तेचे हस्तांतरण झाले, हे वास्तव आहे. राष्ट्रपिता म्हणवणारे फारतर या देशाचे पुत्र आहेत, पण ते देशाचे पिता कसे आणि कोणी ठरवले, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. अहिल्यादेवी होळकरांनी श्री काशी विश्वेश्वर मंदिरातील पूजेला पुन्हा सुरवात केली, त्यामुळे वहीवाट सुरू राहिली आणि आज त्या मंदिराचे वैभव आपण पाहात आहोत. एका छोट्या पण धैर्यशाली कृतीने अहिल्यादेवींनी संस्कृतीचे प्रवाहीपण अबाधित राखले आणि आदर्श निर्माण केला. सावरकर, सुभाषबाबू, सरदार पटेल यांचीही उदाहरणे अशा कृतीशीलतेसाठी सतत समोर असली पाहिजेत. ते पुढे म्हणाले, सावरकर त्यांच्या काळात शंभर वर्षे पुढचे काही सांगत होते, अशाच मनोवृत्तीमुळे ते समजून न घेतल्याने आजही सावरकरांचे नाव घेताना त्यांना कचरायला होते. मतदान करताना पक्ष, जात आणि फुकटेगिरी यापलीकडे जाऊन सूज्ञ विचार केला पाहिजे. अयोध्येतील श्रीराम मंदिर उभारणी आणि त्यापूर्वीची मोदींची मुत्सद्देगिरी आणि धोरणीपणा समजून घेण्याची गरज आहे. आजही जग युद्धग्रस्त असताना कृतीशील मौनाचा आदर्श मोदी यांनी निर्माण केला आहे. राजनैतिक पातळीवरचे निर्णय कालांतराने कृतीत उतरतात, हेही समजून घेत अवधी दिला पाहिजे. मुस्लिमांच्या लांगूलचालनासाठी वंदेमातरम् गीताच्या वगळलेल्या ओळी, नेमकेपणाने मोदी आणि अमित शहा यांच्या निर्णयांनी आज उच्च स्वरात गायिल्या ऐकवल्या जात आहेत, हे चांगले आहे. धर्माचा अर्थ ते कर्तव्य असा करतात, तेव्हाच सत्ताकारण वेगळ्या दिशा पकडते, असे कुलश्रेष्ठ म्हणाले.

सात्यकी सावरकर म्हणाले, "जिहादी इस्लामींचे गंभीर संकट आपल्या उंबरठ्यावर आहे. हिंदुत्वाची जपणूक हीच आपली ओळख आहे, हे दाखविण्याची वेळ आहे. देशाच्या संविधानाला आव्हान देणाऱ्या यंत्रणा अस्तित्वात असून, त्याविरोधात हिंदुंचे एकत्व गरजेचे आहे."

कृष्णकुमार गोयल म्हणाले, हिंदुत्व ही राष्ट्रीय अस्मिता असल्याचा उद्‌घोष सावरकरांनी केला. असाधारण धैर्य, असीम त्याग आणि जाज्वल्य राष्ट्रनिष्ठा हे सावरकरांचे विषेश होते. शमिका नरवणे यांनी आभार मानले, तर मिलिंद कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### निवंगुणे यांनी स्वीकारला काँग्रेस जिल्हाध्यक्ष पदाचा कार्यभार

पुणे (दैनिक संध्या) : पुणे जिल्हा काँग्रेस कमिटीचे नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष (दक्षिण विभाग) लहू अण्णा निवंगुणे यांनी आपल्या पदाचा कार्यभार स्वीकारला. काँग्रेसभवन येथे रविवारी प्रदेश युवक काँग्रेसचे अध्यक्ष शिवराज मोरे, जिल्हा युवक काँग्रेसचे अध्यक्ष उमेश पवार, निखिल कवीश्वर, आकाश मोरे, संभाराजे जगताप, साहेबराव फडतरे, विरधवल गाडे, वैभव बुरंगुले, प्रदीप मेहकरे, संकेत गवरी यांच्यासह काँग्रेस पार्टीचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी झालेल्या बैठकीत आगामी काळातील काँग्रेस पक्षाची भूमिका, संघटनात्मक बांधणी, जिल्ह्यातील राजकीय रणनीती तसेच विविध महत्त्वाच्या विषयांवर चर्चा करण्यात आली. या निवडीबद्दल आनंद व्यक्त करत लहू निवंगुणे म्हणाले, "काँग्रेस पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनी माझ्यासारख्या सर्वसामान्य, शेतकऱ्याच्या मुलाला जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी दिली, याबद्दल त्यांचे आभार मानतो. जिल्ह्यामध्ये ग्रामीण भागात सद्यस्थितीत काँग्रेसला कोणी मोठा नेता नसला किंवा पक्षाची ताकद थोडी कमी असली, तरी सर्वसामान्य कार्यकर्ता काँग्रेससोबत कायम आहे. या सर्वसामान्य कार्यकर्त्यांच्या जीवावर ग्रामीण भागात काँग्रेसला सक्षम करण्याचा माझा प्रयत्न राहणार आहे. २०२९ मध्ये राहुल गांधी यांना पंतप्रधान करण्यासाठी जीवाचे रान करून पक्ष वाढवणार आहोत." शिवराज मोरे म्हणाले, "गेल्या अनेक वर्षांपासून काँग्रेस पक्षाच्या संघटनेत कार्यकर्ता ते वरिष्ठ पदाधिकारी म्हणून निवंगुणे यांनी उत्तम कार्य केले आहे. सामान्य घरातून आलेल्या कार्यकर्त्याला जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी मिळाली असून, पुणे जिल्ह्यात काँग्रेस पक्षाला बळकट करण्यासाठी त्यांची निवड उपयुक्त ठरेल. याआधीही त्यांनी पक्षासाठी भरीव योगदान दिले आहे.

### तळलेल्या वाटाण्यात कृत्रिम रंगाचा वापर

पुणे (दैनिक संध्या) : भेसळखोरांकडून नागरिकांच्या जीवनाशी खेळ सूरू असून खाद्यपदार्थ अधिक आकर्षक दिसावेत यासाठी पदार्थांमध्ये कृत्रिम रंग बिनदिक्कतपणे मिसळला जात असल्याचे उघडकीस आले आहे. अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए, अन्न विभाग) नऱ्हे येथे एका फरसाणाच्या दुकानावर तपासणी केली असता तेथे तळलेल्या वाटाण्यांमध्ये कृत्रिम रंगाचा वापर होत असल्याचे आढळून आले आहे. तर काही कंपन्या विनापरवाना अन्नपदार्थ विक्री करत असल्याचे आढळून आले आहे. 'एफडीए' ने 7 हजार 480 रुपयांचा 68 किलोचा या तळलेल्या वाटाण्यांचा साठा जप्त केला आहे. तसेच, खेड व आंबेगाव तालुक्यात 5 ठिकाणी धडक कारवाई करत एकूण 19 लाख रुपयांचा विविध अन्नपदार्थांचा साठाही जप्त केला आहे. राज्याच्या 'एफडीए' च्या आयुक्त पदाचा कार्यभार तुकाराम मुंढे यांनी घेतल्यानंतर 'एफडीए' चे अधिकारी ॲक्शन मोड वर आले असून भेसळखोरांवर कारवाई करण्यास सुरवात झाली आहे. त्यानुसार पुणे जिल्ह्यात राबविण्यात आलेल्या विशेष मोहिमेत आंबेगाव व खेड तालुक्यात 5 ठिकाणी धडक कारवाई करण्यात आली, अशी माहिती पुणे विभागाचे सहआयुक्त दिगांबर भोगावडे यांनी दिली. यामध्ये आंबेगाव तालुक्यात मंचर येथे साईराज पान अँड टी हाऊस व समीक्षा कोल्ड्रिंक जनरल अँड किराणा स्टोअर यांच्या पाठीमागील छोट्या गोदामामध्ये दोन ठिकाणी 30 हजार 395 रुपयाचा गुटखा, पानमसाला व इतर तत्सम प्रतिबंधित पदार्थांची विक्री करत असल्याचे आढळून आले. संबंधितावर भारतीय न्याय संहिता तसेच अन्न सुरक्षा व मानके कायदा नुसार मंचर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### थकीत मानधनासाठी काम बंद आंदोलन

नारायणगाव (दैनिक संध्या) : महाराष्ट्र राज्य गट संसाधन केंद्र (पाणी व स्वच्छता) कंत्राटी कर्मचारी संघटनेच्यावतीने पंचायत समिती अंतर्गत कार्यरत असलेल्या गट संसाधन केंद्रातील (BRC) कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मानधनाच्या प्रश्नावर राज्य सरकारला निवेदन देण्यात आले असून, मागण्या मान्य न झाल्यामुळे जि.प.पुणे समोर राज्यव्यापी काम बंद आंदोलन करण्यात येत आहे. सदर निवेदन पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री ना. गुलाबराव पाटील यांना देण्यात आले असून, राज्यातील पंचायत समिती अंतर्गत पाणी व स्वच्छता विभागात कार्यरत गट समन्वयक व समूह समन्वयक कर्मचारी अनेक वर्षांपासून प्रामाणिकपणे सेवा बजावत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. ग्रामीण भागातील पाणी पुरवठा योजना, स्वच्छ भारत अभियान तसेच जल जीवन मिशन यांसारख्या महत्त्वाकांक्षी योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी हे कर्मचारी सातत्याने कार्यरत असल्याचे संघटनेने स्पष्ट केले आहे. मात्र मागील डिसेंबर २०२५ ते एप्रिल २०२६ या कालावधीतील तब्बल पाच महिन्यांचे मानधन अद्याप मिळाले नसल्याचा आरोप कर्मचाऱ्यांनी केला आहे जून महिना सुरू झाला असून एकूण सहा महिन्यांपासून मानधन मिळाले नसल्याने कर्मचाऱ्यांवर आर्थिक संकट ओढावले आहे. घरखर्च, मुलांचे शिक्षण, वैद्यकीय खर्च आणि दैनंदिन गरजा भागविणे कठीण झाले असल्याची व्यथा कर्मचाऱ्यांनी निवेदनातून मांडली आहे.

## जनगणनेत बुद्ध विहारांना वगळले, बौद्ध समाजात संतापाची लाट

**नागपूर (दै. संध्या) :**

भारत जनगणना-२०२७ अंतर्गत घरयादी गट मांडणीदर्शक नकाशा तयार करताना वापरण्यात येणाऱ्या जलस्त्रोत आणि भूचिन्हे (लँडमार्क) स्तंभात मंदिर, मशीद, चर्च, गुरुद्वारा आदी धार्मिक स्थळांचा समावेश करण्यात आला असताना बुद्ध विहारांना वगळण्यात आले आहे. त्यामुळे बौद्ध समाजाच्या उपासना स्थळांची अधिकृत नोंद होत नसल्याने बौद्ध धर्मीयांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. महाराष्ट्रातील हजारो बुद्ध विहारे शासनाच्या अभिलेखापासून वंचित राहण्याची शक्यता असल्याने हा प्रकार अन्यायकारक असल्याची भावना बौद्ध समाजात व्यक्त होत आहे. भारत जनगणना-२०२७ अंतर्गत घरयादी गट मांडणीदर्शक नकाशा तयार करताना वापरण्यात येणाऱ्या जलस्त्रोत आणि भूचिन्हे (लँडमार्क) स्तंभात बौद्ध समाजाच्या उपासना स्थळ असलेल्या बुद्ध विहारांचा समावेश करण्यात यावा, अशी मागणी भारतीय दलित पँथरच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात नागपूरच्या जिल्हाधिकाऱ्यांद्वारे राज्याचे मुख्य प्रधान जनगणना अधिकारी यांना निवेदन देण्यात आले. भारतीय दलित पँथरने आपल्या निवेदनात भारत सरकारने नॅशनल कमिशन फॉर मायनॉरिटी ॲक्ट-१९९२ अंतर्गत बौद्ध समुदायाला अल्पसंख्यांक म्हणून मान्यता दिल्याची आठवण करून दिली आहे. शीख, मुस्लिम आणि ख्रिश्चन समुदायांच्या धार्मिक स्थळांची नोंद घेतली जात असताना बुद्ध विहारांची नोंद टाळणे हे घटनाविरोधी ठरू शकते, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

## ओक्लेने सादर केली 'प्लेअर्स कलेक्शन' मोहीम

**पुणे (दै. संध्या) :**

■ जागतिक क्रीडा आयकॉन्स किलियन एम्बाप्पे आणि जेलिन ब्राउन यांचा समावेश

एक काळ असा होता जेव्हा खेळाडूने परिधान केलेल्या गोष्टींमध्ये फक्त त्यांच्या गणवेशाला (युनिफॉर्म) महत्त्व असायचे. तो काळ आता संपला आहे. आता खेळाची खरी सुरुवात झगमगाट आणि कोलाहलाच्या आधीच होते; तो एक असा क्षण असतो, जिथे सर्व गोष्टी एकाग्र होतात: म्हणजेच स्टेजवर येण्यापूर्वीची पूर्वतयारी. आजच्या क्रीडा संस्कृतीला आकार देणाऱ्या खेळाडूंसोबत मिळून तयार केलेल्या प्लेअर्स कलेक्शनच्या नवीन चॅप्टरद्वारे ओक्लेने दोन दिग्गज खेळाडूंचे सिग्नेचर आयवेअर सादर केले आहेत, ज्यामध्ये प्रत्येकाची स्वतःची





सह-निर्मित कलाकृती समाविष्ट आहे. ओक्ले प्लेअर्स कलेक्शन आता टीम ओक्लेचे खेळाडू जेलिन ब्राउन आणि किलियन एम्बाप्पे यांच्या नवीन सिग्नेचर सिरीजसह पुढे जात आहे. हे असे आयकॉन्स आहेत, जे फक्त खेळ खेळत नाहीत, तर खेळाचा स्तर उंचावून, नवीन इतिहास रचून आणि समुदाय निर्माण करून खेळाभोवतीच्या संस्कृतीला एक नवा आकार देतात.

जेलिन ब्राउनच्या आयवेअर कलेक्शनमध्ये विशेष कोको ब्राउन रंगसंगती सादर करण्यात आली आहे, जी वेगळी आणि सुजाण ओळख निर्माण करते. यातील मुख्य भागांवर ब्राउनचा वैयक्तिक लोगो कोरलेला आहे. ओक्ले हायलँड जेलिन ब्राउन सिग्नेचर सिरीजचा भाग असलेल्या या आयवेअरमध्ये प्रिझम™ रूबी लेन्सेस आहेत, जे उत्तम कव्हरेज देण्यासाठी आणि सूर्याच्या किरणांपासून उत्कृष्ट संरक्षण देण्यासाठी तयार करण्यात आले आहेत. जेलिन ब्राउनच्या मैदानावरील खेळाव्यतिरिक्तच्या लूकपासून प्रेरित असलेले हे मॉडेल वजनाने हलके आहे, तसेच यामध्ये थर्मोप्लास्टिक ओ-मॅटर™ फ्रेमचा वापर केला आहे. ही फ्रेम कालांतराने आपला आकार बदलत नाही किंवा वाकत नाही. "माझ्यासाठी कामगिरी, सर्जनशीलता आणि ओळख या सर्व गोष्टी एकमेकांशी जोडलेल्या आहेत," असे ब्राउन म्हणाले. "तुम्ही कशी तयारी करता, कसा विचार करता आणि स्वतःला कसे सादर करता, यावर सर्व अवलंबून असते." प्लेअर्स कलेक्शन फॅमिलीमधील पुढील नाव म्हणजे किलियन एम्बाप्पेचे सिग्नेचर आयवेअर, जे त्यांच्या निर्भीड आणि तडजोड न करणाऱ्या प्रगतीशील मानसिकतेतून साकारले गेले आहे. किलियन एम्बाप्पे सिग्नेचर सिरीज परमियनमध्ये आकर्षक, डीप-सेट लेन्स रचना असून प्रिझम™ रोड लेन्सेसने परिपूर्ण केली आहे. या फ्रेमच्या लेन्सवर एम्बाप्पेचा लोगो कोरलेला आहे, तर चष्म्याच्या दांडीवर (टेम्पल) बाँडीचे भौगोलिक अक्षांश-रेखांश (कोऑर्डिनेट्स) कोरलेले आहेत, जे त्यांच्या मूळ गावाचा आणि प्रवासाचा एक सूक्ष्म संदर्भ देतात. याचा परिणाम म्हणजे हे एक उद्दिष्टपूर्ण व्यक्तिमत्त्व व्यक्त करणारे स्टेटमेंट पीस बनले आहे.

## ४ लाखांहून अधिक भारतीयांची योगाकडे वाटचाल

**नवी दिल्ली (दै. संध्या) :**

**MDNIY, आयुष मंत्रालय आणि हॅबिल्डचा संयुक्त उपक्रम**

योगाला दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनवण्यासाठी मोरारजी देसाई राष्ट्रीय योग संस्था (MDNIY), आयुष मंत्रालय आणि हॅबिल्ड यांनी महत्त्वपूर्ण भागीदारी केली आहे. या सहयोगाअंतर्गत आंतरराष्ट्रीय योग दिन २०२६च्या पार्श्वभूमीवर देशव्यापी डिजिटल योग अभियान सुरू करण्यात आले असून, लाखो नागरिकांना नियमित योगाभ्यासासाठी प्रोत्साहित केले जात आहे.

MDNIY आणि भारतातील पहिले हॅबिट-बिल्डिंग प्लॅटफॉर्म असलेल्या हॅबिल्ड यांच्यात नुकताच सामंजस्य करार (MoU) झाला आहे. या कराराअंतर्गत सुरू करण्यात आलेल्या 'योगा ३६५' उपक्रमाला देश-विदेशातून मोठा प्रतिसाद मिळत आहे. मार्च २०२६ मध्ये सुरू झालेल्या या मोहिमेचा उद्देश नागरिकांना सलग १०० दिवस दररोज योगाभ्यास करण्यासाठी प्रेरित करणे हा आहे.

या उपक्रमात आतापर्यंत ४ लाखांहून अधिक सक्रिय सहभागी झाले असून, ते १३० पेक्षा जास्त देशांमधून तसेच भारतातील सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधून या अभियानात सहभागी झाले आहेत. २१ जून, आंतरराष्ट्रीय योग दिनापर्यंत हा आकडा आणखी वाढण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

या अभियानांतर्गत सहभागींसाठी सोपे आणि दैनंदिन जीवनात सहज समाविष्ट करता येतील असे योगाभ्यास सत्र उपलब्ध करून देण्यात आले आहेत. ही मार्गदर्शित सत्रे आयुष मंत्रालयाच्या यूट्यूब चॅनेलवर उपलब्ध असून, त्यांचे नेतृत्व हॅबिल्डचे सह-संस्थापक आणि योग प्रशिक्षक सौरभ बोथरा करत आहेत.

सौरभ बोथरा यांनी सांगितले की, "योग तेव्हाच खऱ्या अर्थाने परिवर्तन घडवतो, जेव्हा तो अधूनमधून केली जाणारी कृती न राहता रोजच्या जीवनातील शिस्त बनतो. आधुनिक जीवनशैलीमुळे सातत्य राखणे अनेकांसाठी आव्हानात्मक ठरते. MDNIY आणि आयुष मंत्रालयासोबतच्या या सहयोगातून आम्ही लोकांना योगाशी पुन्हा जोडण्याचा आणि त्याला दैनंदिन सवय बनवण्याचा सोपा मार्ग उपलब्ध करून देत आहोत. लाखो लोक दररोज काही मिनिटे योगाभ्यास करू लागले, तर त्याचा सकारात्मक परिणाम केवळ वैयक्तिक आरोग्यावरच नव्हे तर संपूर्ण समाजाच्या आरोग्यावर होईल."

MDNIY, आयुष मंत्रालय आणि हॅबिल्ड यांचा हा संयुक्त उपक्रम डिजिटल माध्यमांचा प्रभावी वापर करून योगाचा प्रसार वाढवण्याबरोबरच देशात प्रतिबंधात्मक आरोग्य संस्कृती मजबूत करण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे. आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या निमित्ताने सुरू असलेली ही मोहीम देशभरातील नागरिकांना निरोगी आणि संतुलित जीवनशैली स्वीकारण्यासाठी प्रेरित करत आहे.

## मातृभाषेबरोबरच इतर भारतीय भाषांचेही ज्ञान आत्मसात करा : मुख्यमंत्री

**नवी दिल्ली (दै. संध्या) :**

मातृभाषा आणि भारतीय भाषांमधून ज्ञान, संस्कृती व मूल्यांचा वारसा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचतो. देशाच्या सर्वांगीण विकासासाठी मातृभाषेतील शिक्षण, भारतीय भाषांचे संवर्धन आणि मूल्याधिष्ठित पत्रकारिता यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. मुंबई हिंदी पत्रकार संघाच्या वतीने आयोजित हिंदी पत्रकारितेच्या २००व्या वर्षपूर्ती सोहळ्यात मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी उत्तर प्रदेशचे उपमुख्यमंत्री ब्रजेश पाठक, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, आमदार अमित साटम, राजहंस सिंह, मुरजी पटेल, संजय उपाध्याय यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, "हिंदी पत्रकारितेचा इतिहास समृद्ध असून देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात जनजागृती घडवून आणण्यामध्ये तिचे मोठे योगदान राहिले आहे. 'उदन्त मार्तण्ड' या पहिल्या हिंदी वृत्तपत्रापासून सुरू झालेल्या प्रवासाने देशातील सामाजिक आणि राष्ट्रीय विचारप्रवाहाला दिशा दिली. स्वातंत्र्यलढ्यातील अनेक नेत्यांनी पत्रकारितेच्या माध्यमातून राष्ट्रभावना जागृत ठेवण्याचे कार्य केले." "ज्ञान, परंपरा आणि संस्कृतीच्या माध्यमातून दोन्ही राज्यांमध्ये शतकानुशतके दृढ संबंध राहिले आहेत. हिंदी आणि मराठी या दोन्ही भाषा संस्कृत परंपरेतून विकसित झालेल्या असून देवनागरी लिपीमुळे त्यांच्यात नैसर्गिक जवळीक आहे.

## जलदुर्गांची निर्मिती हे छत्रपती शिवाजी महाराजांचे विश्वविक्रमी कार्य

### इतिहास संशोधक प्रवीण भोसले : इतिहास प्रेमी मंडळ आणि भारतीय इतिहास संकलन समितीतर्फे व्याख्यानाचे आयोजन

**पुणे (दै. संध्या) :**





छत्रपती शिवाजी महाराज यांनी स्वराज्य स्थापनेच्या कार्यामध्ये समुद्रावर आरमाराची निर्मिती केली, तसेच त्यांनी पाच जलदुर्गांची निर्मिती केली. या जलदुर्गांची निर्मिती हे केवळ त्यांचे महान कार्य नव्हे तर जलदुर्गांची निर्मिती करणे हा आजच्या काळामध्ये विश्वविक्रमच आहे, असे ज्येष्ठ इतिहास संशोधक प्रवीण भोसले यांनी सांगितले.

इतिहास प्रेमी मंडळ आणि भारतीय इतिहास संकलन समितीतर्फे दुर्ग महर्षी गो. नी. दांडेकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त प्रवीण भोसले यांचे विश्वविक्रमी शिवछत्रपती या विषयावर सदाशिव पेठेतील भावे हायस्कूल येथे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. यावेळी इतिहास प्रेमी मंडळाचे अध्यक्ष मोहन शेटे आणि भारतीय इतिहास संकलन समितीचे सचिव संदीप परांजपे उपस्थित होते.

प्रवीण भोसले म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज यांनी महाराष्ट्राच्या किनारपट्टीवर कुलाबा, खांदेरी, सिंधुदुर्ग, सुवर्णदुर्ग आणि पद्मदुर्ग या पाच किल्ल्यांची निर्मिती केली. या पाच किल्ल्यांच्या निर्मितीमध्ये सिंधुदुर्ग हा सुमारे ४८ एकर क्षेत्रफळ असलेला सर्वाधिक मोठा जलदुर्ग आहे. जगामध्ये इतक्या मोठ्या क्षेत्रफळाचा दुसरा जलदुर्ग नाही.तसेच या सर्व किल्ल्यांची एकूण क्षेत्रफळ हे ८६ एकर आहे या किल्ल्यांची तटबंदी २६ हजार फूट म्हणजेच जवळपास आठ किलोमीटर इतकी लांबी असून या किल्ल्यांचे एकूण बांधकाम हे ६५ लाख घनफूट इतके आहे. अशा विविध प्रकारचे विश्वविक्रम छत्रपती शिवाजी महाराज यांनी जलदुर्ग निर्मिती कार्यामध्ये केले आहे.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्वराज्य निर्मितीचा इतिहास अभ्यासताना त्यांनी केलेल्या दुर्ग निर्मितीचा अभ्यास हा अधिक वैज्ञानिक दृष्टीने होणे गरजेचे आहे. शासकीय पातळीवर या सर्व दुर्गनिर्मितीचा मोजमाप नोंदला जाणे गरजेचे आहे. तरच युनेस्को आणि गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये महाराजांच्या दुर्ग निर्मितीच्या कार्याची नोंद घेतली जाऊ शकते. यासाठी मी केवळ एक वैयक्तिक पातळीवर माहिती देऊन त्याचा प्रभाव पडणार नाही. परंतु यासाठी महाराष्ट्र शासनाने पुढाकार घेतला पाहिजे,असे आवाहन प्रवीण भोसले यांनी यावेळी केले.

मोहन शेटे म्हणाले, गो. नी. दांडेकर यांचे जीवन हे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या किल्ल्यांशी एकरूप झाले होते. त्याचप्रमाणे आजच्या तरुणांनी गो. नी. दांडेकर यांची शिकवण आणि संस्कार यांच्याशी एकरूप झाले पाहिजे. आजच्या तरुण पिढीमध्ये महाराजांच्या किल्ल्यांविषयी आत्मीयता वाढली तरच आपण खऱ्या अर्थाने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या किल्ल्यांचे संरक्षण आणि संवर्धन करू शकतो, असेही त्यांनी सांगितले.

**या कार्यक्रमात हजारो विद्यार्थ्यांना दुर्ग दर्शन घडवणा-या ' भगवे ट्रेकर्स ' संस्थेचे पंजलर कुमार व त्यांच्या सहकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. समितीचे सचिव संदीप परांजपे यांनी आभार प्रदर्शन केले. प्रसाद मोरे यांनी सूत्रसंचालन केले. ओंकार नेर्लेकर यांच्या शिवस्तुती गायनाने कार्यक्रमाची सांगता झाली.**

## थोडक्यात पण महत्वाचे...




### फुगेवाडी दारूकांड; मृतांचा आकडा 15 वर, 10 रुग्णांची प्रकृती अजूनही चिंताजनक

पिंपरी (दैनिक संध्या) : फुगेवाडीतील विषारी दारूकांडाने पिंपरी-चिंचवड शहराला मोठा हादरा दिला असून, मृतांचा आकडा 15 वर पोहोचला आहे. रविवारी (दि. 31) मृत्यूचे सत्र काहीसे थांबल्याचे चित्र दिसत असले तरी विविध रुग्णालयांमध्ये उपचार घेत असलेले दहा जण अद्याप धोक्याबाहेर आलेले नाहीत. त्यामुळे वैद्यकीय यंत्रणा, प्रशासन आणि रुग्णांच्या कुटुंबियांची चिंता कायम आहे. महिला तीन दिवसांत मृतांचा आकडा सातत्याने वाढत राहिल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शनिवारी आणखी दोन जणांचा मृत्यू झाल्यानंतर बळींची संख्या 15 वर पोहोचली. त्यानंतर वैद्यकीय पथकांचे लक्ष पूर्णपणे उपचार सुरू असलेल्या रुग्णांकडे केंद्रित झाले आहे. विषारी दारूचा शरीरातील विविध अवयवांवर परिणाम झाल्याने काही रुग्णांवर अतिदक्षता विभागात विशेष उपचार सुरू आहेत. यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात (वायसीएम) सध्या पाच रुग्ण उपचार घेत आहेत. श्रीमंत कोळी (वय 60), प्रकाश राठोड (वय 65), जितू शदतपुरी (वय 31), सोनू तायडे (वय 30) आणि प्रफुल्ल अरिकस्वामी (वय 27) यांच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. या रुग्णांच्या प्रकृतीवर तज्ज्ञ डॉक्टरांचे पथक सातत्याने लक्ष ठेवून आहे. औंध येथील जिल्हा रुग्णालयात चंदन कुमार (वय 26), खाजप्पा शिंगे (वय 35) आणि पवन चव्हाण (वय 35) यांच्यावर उपचार सुरू आहेत. त्यांच्या प्रकृतीत स्थिरता असल्याचे सांगण्यात येत असले तरी डॉक्टरांकडून सतत निरीक्षण ठेवण्यात येत आहे. सुभाष डिग्गीकर (वय 66) यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू असून, अस्लम खान (वय 40) यांच्यावर ससून रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या सर्व रुग्णांच्या प्रकृतीबाबत नियमित आढावा घेतला जात आहे.

### फुगेवाडी दारूकांडानंतर पिंपरी-चिंचवड पोलिसांचे धडक धाडसत्र, 100 ठिकाणी छापे

पिंपरी (दैनिक संध्या) : फुगेवाडीतील विषारी दारूकांडानंतर पिंपरी-चिंचवड पोलिसांनी सलग तिसऱ्या दिवशीही अवैध दारू व्यवसायाविरोधातील धाडसत्र सुरू ठेवले. शनिवारी रात्री उशिरापर्यंत शहरातील विविध भागांतील 36 ठिकाणी छापे टाकून कारवाई करण्यात आली. गेल्या तीन दिवसांत हातभट्टी दारू, अवैध मद्यविक्री आणि ताडी व्यवसायाशी संबंधित जवळपास 100 अड्ड्यांवर कारवाई करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. फुगेवाडी परिसरातील विषारी दारूकांडात 15 जणांचा मृत्यू झाल्यानंतर पोलिसांच्या कार्यपद्धतीवर तीव्र प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले. या पार्श्वभूमीवर पोलिस आयुक्त विनय कुमार चोबे यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांची तातडीची बैठक घेऊन अवैध दारू व्यवसायाविरोधात कठोर भूमिका घेण्याचे निर्देश दिले. या वेळी शहरातील विविध भागांत सुरू असलेल्या अवैध धंद्यांबाबत पूर्वी देण्यात आलेल्या सूचनांची प्रभावी अंमलबजावणी न झाल्याबद्दल त्यांनी प्रभारी अधिकाऱ्यांवर तीव्र नाराजी व्यक्त केल्याची माहिती सूत्रांनी दिली.

### आकुर्डी प्रभाग 16 मध्ये रस्त्यांची दयनीय अवस्था; तातडीच्या डांबरीकरणाची मागणी



आकुर्डी (दैनिक संध्या) : प्रभाग क्रमांक 16 मधील गुरुद्वारा चौक, वाल्हेकरवाडी, राऊतनगर, एस. बी. पाटील शाळा सीमा भिंतीलगतचा रस्ता, धर्मराज चौक, इस्कॉन मंदिर, शिंदेवस्ती, लक्ष्मीनगर, रावेत आणि विकासनगर परिसरातील रस्ते खड्डेमय झाले असून, नुकत्याच झालेल्या अवकाळी पावसामुळे अनेक रस्त्यांची दयनीय अवस्था झाली आहे. यामुळे या रस्त्यांचे त्वरित डांबरीकरण करावे, अन्यथा प्रशासनाविरोधात उपोषण करण्यात येईल, असा इशारा नगरसेविका ऐश्वर्या तरस यांनी दिला आहे. या रस्त्यावरून प्रवास करताना वाहनधारक व नागरिकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागतो. या समस्यांचा पाढा नगर सदस्या या नात्याने प्रशासनासमोर अनेक वेळा मांडूनही या मागणीबाबत कोणतीही दखल अथवा ठोस कार्यवाही प्रशासनाकडून झाली नाही. समस्त नागरिक, वाहनचालक, प्रवासी यांच्या हिताचा विचार करून या रस्त्यांचे डांबरीकरण तात्काळ करण्यात यावे, अशी मागणी नगरसेविका तरस यांनी पिंपरी-चिंचवड महापालिकेचे सहशहर अभियंता अजय सूर्यवंशी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

# ताथवडे, पुनावळे, वाकड सेवा रस्त्यांचे काम प्राधान्याने मार्गी लागणार

■ आमदार शंकर जगताप : केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या बैठकीत कामाला गती देण्याचे अधिकाऱ्यांना निर्देश : ताथवडे-पुनावळे अंडरपास रुंदीकरणाला 'ग्रीन सिग्नल' ■



पिंपरी (दै. संध्या)

ताथवडे, पुनावळे आणि वाकड या परिसरातील तीन महत्त्वाच्या सेवा रस्त्यांची कामे प्राधान्याने पूर्ण करण्याचे सक्त आदेश केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी शनिवारी दिले. याचबरोबर, ताथवडे आणि पुनावळे येथील अंडरपासमधील वाढती वाहतूक कोंडी लक्षात घेऊन हे अंडरपास रुंद करण्याच्या सूचनाही त्यांनी प्रशासनाला दिल्या आहेत. या भागातील नागरिकांना दिलासा देण्यासाठी केंद्र सरकार सकारात्मक असून अधिकाऱ्यांनी तातडीने उपाययोजना कराव्यात, असे निर्देश गडकरी यांनी दिल्याची माहिती चिंचवड विधानसभेचे आमदार शंकर जगताप यांनी दिली. राष्ट्रीय महामार्गांवरील प्रलंबित कामांविषयी शनिवारी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी पुण्यामध्ये बैठकीचे आयोजन केले होते. या बैठकीत उपस्थित रहात आमदार शंकर जगताप यांनी राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४८ वरील (पुणे पश्चिम बायपास) वाहतूक कोंडी आणि पायाभूत सुविधांकडे आमदारांनी लक्ष वेधले.

आमदार शंकर जगताप याबाबत म्हणाले सयाजी अंडरपास, भुमकर चौक, ताथवडे अंडरपास, पुनावळे अंडरपास, पवना नदी क्रॉसिंग, किवळे जंक्शन आणि मामुर्डी अंडरपास या परिसरांमध्ये सध्याच्या भुयारी मार्गांची क्षमता अतिशय कमी आहे. परिणामी, सेवा रस्त्यांचे काम तातडीने पूर्णत्वाला नेणे गरजेचे आहे. हीच मागणी गडकरी साहेबांकडे मांडली आहे. सेवा रस्त्यांची गरज आणि नागरिकांच्या मागणीचे गांभीर्य लक्षात घेऊन तातडीने या रस्त्यांचे काम पूर्ण करण्याचे सक्त निर्देश गडकरी यांनी दिले आहेत.

पुनावळे, वाकड, किवळे आणि रावेत या प्रमुख जंक्शन्सवरून रोज लाखो वाहनांची आणि जड मालवाहतुकीची ये-जा सुरू असते. वाहतुकीचा ताण लक्षात घेता या ठिकाणी अतिरिक्त बॉक्स स्ट्रक्चर्स आणि नवीन अंडरपास बांधण्याबाबत देखील केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडून हिरवा कंदील मिळाला आहे.

> "ताथवडे, पुनावळे आणि वाकड परिसरातील अंतर्गत वाहतुकीची कोंडी फोडण्यासाठी सेवा रस्ते आणि अंडरपासचे रुंदीकरण अत्यंत आवश्यक आहे. या अत्यंत महत्त्वाच्या पायाभूत सुविधा प्रकल्पासाठी केंद्र सरकारकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला असून, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी अधिकाऱ्यांना तातडीने काम सुरू करण्याचे आदेश दिले आहेत. यामुळे या भागातील नागरिकांना आणि आयटी क्षेत्रातील नोकरदारांना मोठा दिलासा मिळेल."
>
> – शंकर जगताप, आमदार (चिंचवड विधानसभा)

## पिंपरी-मोशी भाजी बाजारात दर स्थिर; काही भाज्या महाग

पिंपरी (दै. संध्या)

लालबहादूर शास्त्री भाजी मंडईत रविवारी (दि. 31) गेल्या आठवड्याप्रमाणे फळभाज्यांचे दर स्थिर होते. कांदापातची आवक कमी झाल्यामुळे प्रति जुडीची 50 ते 60 रुपयांना विक्री झाली. तसेच, बिन्स, पावटा आणि घेवड्याचे दर तेजीत होते. तर गवार, शेवग्याचे दर कमी झाले होते. भाजी मंडईत पालेभाज्यांच्या दरात किंचित वाढ झाली होती. कोथिंबीर व मेथीची जुडी 25 रूपये दराने होती. तर, गवार आणि शेवगा 50- 60 रूपये किलोने मिळत होता. वांगी, फ्लॉवरचा किलोचा दर 40-50 रूपये होता. मिरची 50 रूपये, कांदे 100 रूपयांना 5 किलो, लसूण 100-150 रूपये आणि आल्याची 80-90 रूपये किलो दराने विक्री झाली. रविवारी पिंपरी भाजी मंडईत गवार 50, शेवगा 40, टोमॅटो 25, भेंडी 50, फ्लॉवर 30, कोबी 25, मिरची 50, गाजर 25, शिमला 40, लसूण 100-120, आले 70, वांगी 40, काकडी 30, कारले 40, कांदे 20-25, बटाटा 25-30, बिन्स 70, पावटा 70, लाल भोपळा 30, घोसाळी 50, दोडका 30, तोंडली 50, बीट 30, दुधी 30, घेवडा 80.

## आर्थिक निकष पाहून विक्रम काकडेंना उमेदवारी; विलास लांडेंचा घणाघात

पिंपरी (दै. संध्या)



पुणे स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधान परिषद उमेदवारीवरून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात (अजित पवार गट) नाराजी उफाळून आली आहे. भोसरीचे माजी आमदार विलास लांडे यांनी पक्षाच्या उमेदवारी निवडीच्या प्रक्रियेवर तीव्र नाराजी व्यक्त करत विक्रम काकडे यांना आर्थिक निकषांच्या आधारे उमेदवारी देण्यात आल्याचा आरोप केला आहे.

उमेदवारी जाहीर झाल्यानंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना लांडे म्हणाले की, "पक्षातील अनेक वर्षे प्रामाणिकपणे काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना डावलून आर्थिकदृष्ट्या सक्षम उमेदवाराला संधी देण्यात आली. हा निर्णय कार्यकर्त्यांच्या भावना दुखावणारा आहे." यावेळी त्यांनी पक्ष नेतृत्वावर अप्रत्यक्ष टीका करत, "आज अजितदादा असते तर त्यांनी पक्षासाठी आयुष्य घालवलेल्या कार्यकर्त्यांचा विचार केला असता. त्यांच्या पश्चात आम्ही हतबल झालो आहोत," अशी खंत व्यक्त केली. विक्रम काकडे यांच्या उमेदवारीवर उपरोधिक भाष्य करताना लांडे म्हणाले, "पक्षाने त्यांना संधी दिली आहे, त्यामुळे भविष्यात पक्षाची ताकद नक्कीच वाढेल," असा टोला त्यांनी लगावला.

विशेष म्हणजे, विलास लांडे यांचा आज वाढदिवस असून विधान परिषद उमेदवारीच्या निमित्ताने पक्षाकडून 'बर्थडे गिफ्ट' मिळेल, अशी त्यांना अपेक्षा होती. मात्र उमेदवारी जाहीर झाल्यानंतर त्यांचा अपेक्षाभंग झाल्याचे त्यांच्या समर्थकांकडून बोलले जात आहे. दरम्यान, या घडामोडींमुळे पिंपरी-चिंचवडच्या राजकीय वर्तुळात विविध चर्चांना उधाण आले असून राष्ट्रवादी काँग्रेसमधील अंतर्गत नाराजी पुन्हा एकदा समोर आली आहे.

## पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर नाममात्र दरात पाणीपुरवठा करावा

पिंपरी (दै. संध्या)

नगरसेविका श्रुती वाकडकर यांची मागणी




पिंपरी चिंचवड शहरात सध्या तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली असून अनेक भागांतील नागरिकांना पिण्याच्या व दैनंदिन वापराच्या पाण्यासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांना तातडीचा दिलासा मिळावा यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत नाममात्र दरात टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्यात यावा, अशी मागणी नगरसेविका तथा शिक्षण समिती सदस्या श्रुती राम वाकडकर यांनी महापालिका आयुक्तांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

शहराचा गेल्या काही वर्षांत मोठ्या प्रमाणात विस्तार झाला असून लोकसंख्येतही लक्षणीय वाढ झाली आहे. मात्र वाढत्या लोकसंख्येच्या तुलनेत पाणीपुरवठा व्यवस्थेवर मोठा ताण निर्माण झाला आहे. त्यामुळे अनेक गृहनिर्माण सोसायट्यांना खासगी टँकरद्वारे पाणी विकत घ्यावे लागत असून त्यासाठी दरमहा लाखो रुपयांचा अतिरिक्त खर्च सहन करावा लागत आहे. यामध्ये एक बाब विशेष लक्षात घेण्यासारखी आहे की, खासगी टँकर चालकांना मोठ्या प्रमाणात पाणी उपलब्ध होत असून ते संपूर्ण शहरात पाणीपुरवठा करत आहेत. अशा परिस्थितीत नागरिकांना पाणीपुरवठा करणे ही महानगरपालिकेची मूलभूत जबाबदारी असल्याने, महानगरपालिकेनेही आवश्यकतेनुसार भाडेतत्त्वावर टँकर उपलब्ध करून नागरिकांना खाजगी टँकरपेक्षा नाममात्र दरात पाणीपुरवठा करावा, अशी ठाम मागणी श्रुती वाकडकर यांनी केली आहे.

> शहरातील पाणीटंचाईचे संकट पूर्णपणे दूर होईपर्यंत महानगरपालिकेने विशेष उपाययोजना राबवून टंचाईग्रस्त भागांमध्ये सवलतीच्या दरात टँकरने पाणी उपलब्ध करून द्यावे. यामुळे सर्वसामान्य नागरिकांना मोठा दिलासा मिळेल, असेही त्यांनी निवेदनात नमूद केले आहे. महानगरपालिकेने या मागणीचा सकारात्मक विचार करून तातडीने कार्यवाही करावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

## पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या इलेक्ट्रिक वाहनांवर वाढता खर्च

पिंपरी (दै. संध्या)



पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने गेल्या तीन वर्षांपासून इलेक्ट्रिक वाहने वापरण्याची संख्या वाढली आहे. ती सर्व वाहने विकत, तसेच भाड्याने घेतली जात आहेत. त्यामुळे वायू व ध्वनी प्रदूषण होत कमी होत असून, खर्च काही कमी झालेला नाही. उलट, वाहनांवरील खर्च मोठ्या प्रमाणात वाढला आहे. त्यामुळे पर्यावरण संवर्धन, ग्लोबल वॉर्मिंग, इंधन बचतीच्या नावाखाली महापालिकेकडून उधळपट्टी सुरू असल्याचा आरोप होत आहे. महापालिकेकडून गेल्या तीन वर्षांपासून इलेक्ट्रिक वाहने वापरण्यात येत आहेत. त्यातून खर्च कमी होईल, असे अपेक्षित होते. मात्र, इलेक्ट्रिक वाहनांचा वापर वाढण्यासोबत खर्च दुप्पटीपेक्षा अधिकने वाढला आहे. महापालिकेने आत्तापर्यंत एकूण 58 इलेक्ट्रिक वाहने भाडे तत्वावर घेतली आहेत. चालकाविना एका इलेक्ट्रिक वाहनांचा महिन्याचा खर्च 43 हजार ते 53 हजार 600 रुपये इतका आहे. तर, चालकासह इलेक्ट्रिक वाहनाचे एका दिवसातील ठराविक किलोमीटर प्रवासाचे भाडे 1 हजार 949 रुपये आहे. त्या वाहनाचे एका महिन्याचे भाडे 1 लाखाच्या पुढे जाते. पर्यावरण संवर्धन, ग्लोबल वॉर्मिंग, इंधन बचतीच्या नावाखाली इलेक्ट्रिक वाहनांवर मोठा खर्च होत असून, महापालिका तिजोरीवर ताण वाढत आहे.

## 19 वर्षीय विद्यार्थ्याचे अभ्यासपूर्ण पुस्तक



लोणावळा (दै. संध्या) : विज्ञानातील सर्वात जुन्या आणि अनुत्तरित रहस्यांपैकी एक असलेल्या "अवकाश मिती" या अत्यंत जटिल विषयावर लोणावळ्यातील अवघ्या 19 वर्षांच्या तरुण विद्यार्थ्याने प्रकाश टाकला आहे. येथील अन्वय प्रलोभ शेवलीकर या एयरोस्पेस इंजिनिअरिंगच्या विद्यार्थ्याने अवकाशाला तीनच मिती का? या विषयावर अभ्यासपूर्ण पुस्तक लिहिले असून, त्याच्या या थक्क करणाऱ्या कामगिरीची थेट "दूरदर्शन"ने ही दखल घेतली आहे. विशेष म्हणजे, अन्वयचे हे दुसरे पुस्तक आहे. यापूर्वी तो दहावीत असतानाच त्याने कॉस्मिक होरायझन या विषयावर पहिले पुस्तक लिहिले होते. अवघ्या 19 व्या वर्षी इतक्या कठीण आणि रहस्यमय विषयावर लेखन करून जागतिक भौतिकीला भारतीय मुळांशी जोडण्याचे महत्त्वपूर्ण कार्य अन्वयने केले आहे. त्याच्या या अभूतपूर्व यशाबद्दल आणि लेखन कौशल्याबद्दल लोणावळ्यासह संपूर्ण जिल्ह्यातून व शैक्षणिक वर्तुळातून त्याचे कौतुक होत असून, त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव केला जात आहे.

## बनावट मृत्यू प्रमाणपत्र प्रकरणात गंभीर आरोप

पिंपरी (दै. संध्या)

तक्रारदाराच्या मनोरुग्ण आईला नोटीस दिल्याने वाद



परभणी जिल्हातील, सेलू तालुक्यातील गोमेवाकडी ग्रामपंचायतीमध्ये कथित बनावट मृत्यू प्रमाणपत्र प्रकरणामुळे नव्या वादाला तोंड फुटले असून, तक्रारदार तथागत ज्ञानोबा अवचार यांनी ग्रामपंचायत प्रशासनासह संबंधित अधिकाऱ्यांवर गंभीर आरोप केले आहेत. या प्रकरणाची निष्पक्ष आणि वरिष्ठ स्तरावर चौकशी करण्याची मागणी त्यांनी केली आहे. तथागत अवचार यांनी प्रसिद्ध केलेल्या व्हिडिओद्वारे ग्रामपंचायत स्तरावर बनावट नोंदी तयार करण्यात आल्याचा तसेच चौकशी प्रक्रियेदरम्यान त्यांना मानसिक त्रास दिला जात असल्याचा आरोप केला आहे. अवचार यांच्या म्हणण्यानुसार, गोमेवाकडी येथील तत्कालीन ग्रामसेवक प्रदीप जारवाल (कार्यकाळ २०१६) आणि ग्रामसेविका वनिता बंडगर (कार्यकाळ २०२३) यांनी संगनमताने 'चातुरा ज्ञानोबा अवचार' आणि 'शांता ज्ञानोबा अवचार' यांच्या नावाने कथित बनावट मृत्यू प्रमाणपत्रे तयार केली. या प्रमाणपत्रांचा वापर न्यायालयीन प्रक्रियेत झाल्याचा दावाही त्यांनी केला आहे. माहितीच्या अधिकारातून (RTI) प्राप्त कागदपत्रांचा दाखला देत अवचार यांनी सांगितले की, संयुक्त ग्रामपंचायत शिराळा यांनी दिलेल्या लेखी उत्तरात संबंधित व्यक्तींच्या मृत्यूची कोणतीही अधिकृत नोंद उपलब्ध नसल्याचे नमूद करण्यात आले आहे. संबंधित काळात गोमेवाकडी आणि शिराळा या संयुक्त ग्रामपंचायती असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. तसेच, प्रमाणपत्रावरील मृत्यू नोंदणीची तारीख १६ ऑक्टोबर २०१६ असल्याचे दिसून येते. हा दिवस रविवार असल्याने सुट्टीच्या दिवशी नोंदणी कशी करण्यात आली, असा प्रश्न अवचार यांनी उपस्थित केला आहे. याशिवाय, १९९० मधील मृत्यूची नोंद त्या काळात ग्रामपंचायत अस्तित्वात नसताना कशी झाली, याबाबतही त्यांनी शंका व्यक्त केली आहे.

अवचार यांनी आणखी एक गंभीर आरोप करताना सांगितले की, संबंधित ग्रामसेवक चौकशीसाठी उपस्थित राहत नसतानाही प्रकरण निकाली काढण्याचे प्रयत्न होत आहेत. त्याचवेळी, त्यांच्या मानसिक आजाराने ग्रस्त असलेल्या आईला चौकशीसाठी कार्यालयात हजर राहण्याची नोटीस देण्यात आल्याने कुटुंबावर मानसिक तणाव निर्माण झाला आहे. त्यांच्या आईचा या प्रकरणाशी कोणताही संबंध नसल्याचा दावा त्यांनी केला आहे. "माझ्याकडे सर्व आवश्यक कागदपत्रे आणि पुरावे उपलब्ध आहेत. तरीही माझ्यावर दबाव टाकण्याचा प्रयत्न सुरू आहे. यापूर्वीही माझ्याविरुद्ध खोटा गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची वरिष्ठ स्तरावर निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कारवाई करण्यात यावी," अशी मागणी तथागत अवचार यांनी केली.

दरम्यान, या आरोपांमुळे ग्रामपंचायत प्रशासन आणि संबंधित अधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीबाबत प्रश्न उपस्थित झाले असून, प्रकरणाची सखोल चौकशी करून वस्तुस्थिती समोर आणण्याची मागणी नागरिकांमधून होत आहे.

## मोशी स्पाईन रोडवर वाहतूक कोंडी गंभीर

मोशी (दै. संध्या) : पिंपरी-चिंचवड शहरातील स्पाईन रोडवरील स्वामी विवेकानंद भुयारी मार्ग ते चेरी चौक या दरम्यानच्या सेवा रस्त्यावर वाहतूक कोंडीची समस्या गंभीर बनली आहे. दररोजच्या वाहतूक कोंडीने नागरिक त्रस्त आहेत. या सेवा रस्त्याच्या बाजूला विविध व्यावसायिकांची दुकाने, रुग्णालये आहेत परंतु त्यांच्याकडे पार्किंगची व्यवस्था नसल्याने बहुतांश ग्राहक व पेशंटचे नातेवाईक रस्त्यात वाहने पार्क करून जात असल्याने मोठ्या प्रमाणावर नागरिकांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. या भागात महापालिकेच्या वतीने खाऊ गल्ली उभारण्यात आली आहे. तसेच पदपथांवर अतिक्रमण करण्यात आले आहे. यामुळे पादचाऱ्यांना देखील मुख्य रस्त्याने जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. सेवा रस्त्यावरील अतिक्रमणामुळे रस्ता अरुंद झाल्याने व अनधिकृत पार्किंगमुळे नागरिकांना दररोज सकाळी व सायंकाळी वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. परंतु संबंधित वाहतूक विभाग याकडे दुर्लक्ष करत असल्याने नागरिकांना नहाक त्रास सहन करावा लागत आहे. विशेषतः रुग्णवाहिका, वृद्ध नागरिक आणि शाळकरी मुलांसाठी हा रस्ता जीवघेणा ठरत आहे.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांना दुर्गा ब्रिगेड राष्ट्रीय पक्षातर्फे विनम्र अभिवादन

पिंपरी (दै. संध्या)

■ मंदिरे, घाट आणि सामाजिक कार्यांच्या माध्यमातून त्यांचे समाजासाठी अमूल्य योगदान; आदर्श राज्यकर्त्या म्हणून संपूर्ण देशासाठी प्रेरणास्थान



पुण्यश्लोक लोकमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त दुर्गा ब्रिगेड राष्ट्रीय पक्षातर्फे त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी राष्ट्रीय अध्यक्षा दुर्गा भोर यांच्या हस्ते पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

अहिल्यादेवी होळकर या न्यायप्रिय, लोककल्याणकारी आणि आदर्श राज्यकर्त्या म्हणून संपूर्ण देशासाठी प्रेरणास्थान आहेत. त्यांनी आपल्या राज्यकारभारातून सर्वसामान्य जनतेच्या हिताला प्राधान्य देत समाजसेवा, महिला सन्मान, न्याय आणि लोककल्याणाचा आदर्श निर्माण केला. अनेक मंदिरे, घाट, धर्मशाळा आणि सामाजिक कार्यांच्या माध्यमातून त्यांनी समाजासाठी अमूल्य योगदान दिले आहे. तसेच इंडस्ट्रीज असोसिएशनतर्फे अध्यक्ष श्री अभय भोर यांनीही यावेळी विनम्र अभिवादन करत माता अहिल्यादेवी यांचा आदर्श महिला भगिनींनी घ्यावा व उद्योग क्षेत्रातही नाविन्यपूर्ण कामगिरी करत पुढाकार घ्यावा, असे मत व्यक्त केले. महिलांनी केवळ सामाजिकच नव्हे तर औद्योगिक क्षेत्रातही सक्षम नेतृत्व निर्माण करून स्वतःची वेगळी ओळख निर्माण करावी, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी दुर्गा ब्रिगेड राष्ट्रीय पक्षाच्या वतीने सांगण्यात आले की, आजच्या महिलांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या विचारातून प्रेरणा घेऊन आत्मविश्वासाने समाजकार्य, नेतृत्व आणि महिला सक्षमीकरणासाठी पुढे यावे, हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.

या प्रसंगी राष्ट्रीय अध्यक्षा दुर्गा भोर, रईसा ताई पठाण, जयश्री साळुंखे, रेश्मा मुल्ला, अवंतिका भोर, माही शेख, स्वाती दुबळे, खदीर पठाण तसेच इतर

## थोडक्यात पण महत्वाचे...



### श्री भैरवनाथांचा शाही स्नानसोहळा उत्साहात

वाल्हे (दैनिक संध्या) : अधिकमासानिमित्त वाल्हे (ता. पुरंदर ) पंचक्रोशीचे ग्रामदैवत श्री भैरवनाथ देवाचा शाही स्नान सोहळा वाई( सातारा) येथील कृष्णा नदीच्या काठावर उत्साहात व भक्तिमय वातावरणात पार पडला. यावेळी नाथसाहेबाच चांगभलं च्या जयघोषात भाविकांनी या सोहळ्याचा आंनद लुटला.परंपरेनुसार दर तीन वर्षांनी येणाऱ्या अधिकमासात वाई येथील कृष्णा नदीवर वाल्हे पंचक्रोशीतील ग्रामदेवतांचा पायी पालखी सोहळा पवित्र स्नानासाठी जात असतो.यावेळी श्री भैरवनाथांसह दहा देवतांच्या पालख्या रविवारी पहाटे वाई येथील कवडे पठार येथे दाखल झाल्या होत्या. या दरम्यान तब्बल पाच तास ढोल ताशांच्या गजरात उत्सवमूर्तींची मिरवणूक काढून कृष्ण घाटावर देवतांना पारंपरिक शाही स्नान घालण्यात आले. याप्रसंगी पुणे जिल्हा बँकेचे अध्यक्ष प्रा.डॉ.दिगंबर दुर्गाडे जिल्हा परिषद सदस्या डॉ. प्राजक्ता दुर्गाडे श्री भैरवनाथ देवस्थान ट्रस्टचे उपाध्यक्ष दत्तात्रेय पवार भाजपचे सचिन लंबाते वाल्हे गावचे सरपंच अतुल गायकवाड उपसरपंच सागर भुजबळ वागदरवाडी सरपंच सुनील पवार सुकलवाडीचे संदेश पवार माजी सभापती गिरीश पवार,माजी सरपंच महादेव चव्हाण अमोल खवले गिरीश पवार तंटामुक्तीचे अध्यक्ष जयवंत भुजबळ प्रा.संतोष नवले माजी उपसरपंच सुर्यकांत भुजबळ धनगर समाजाचे नेते दादासाहेब मदने तसेच संतोष भुजबळ विकास महाराज पवार शंकर भुजबळ मंदिराचे पुजारी सचिन आगलावे पुरोहित सचिन देशपांडे आदींसह वाल्हे पंचक्रोशीतील बहुसंख्य ग्रामस्थ उपस्थित होते.

### अहिल्यादेवी होळकर यांच्या विचारांचा प्रसार आवश्यक : ह.भ.प. कबीर महाराज आत्तार



कोरेगावमुळ (दैनिक संध्या) : भारतभरामध्ये अनेक हिंदू मंदिरे व नदीघाट त्यांनी बांधले, अनेक मंदिरांचा जीर्णोद्धार केला. अनेक देवळांच्या आश्रयदात्या बनल्या. अनेक तीर्थक्षेत्री धर्मशाळा बांधून त्यांनी भाविकांची गैरसोय टाळली. मंदिरांसाठी काम करुनही त्यांनी धर्माच्या नावाखाली असलेल्या अनेक रुढ, अनिष्ट प्रथांना छेद दिला. अहिल्यादेवी होळकर यांच्या लोककल्याणकारी कार्याचा वारसा जपण्यासाठी आणि त्यांच्या विचारांचा प्रसार होण्यासाठी खरोखरच डिजेवर नाचून जयंती साजरी करण्यापेक्षा आपल्या महापुरुषांचा खरा इतिहास माझ्या सामान्य जनतेला समजावा म्हणून हा किर्तन सोहळा ठेवला हे अभिमानास्पद आहे असे मत ह.भ.प. कबीर महाराज आत्तार यांनी व्यक्त केले. कोरेगावमुळ (ता.हवेली) बोधे काकडे वस्ती या ठिकाणी आदर्श सेवा प्रतिष्ठान व 'राजे मल्हारराव होळकर युवा प्रतिष्ठान' आयोजित भव्य राजमाता अहिल्याबाई होळकर जयंती सोहळ्याच्या निमित्ताने राष्ट्रीय शिवशंभू व्याख्याते झी टॉकीज मनमंदिरा फेम ह.भ.प. कबीर महाराज आत्तार यांचे भव्य कीर्तन सोहळा संपन्न झाला. परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कीर्तन श्रवणाचा लाभ घेतला. यावेळी ह.भ.प. आनंद महाराज तांबे, ह.भ.प. गणेश महाराज फरताळे, ह.भ.प. अविनाश महाराज लेकुळे, ह.भ.प. तुषार महाराज चौधरी, ह.भ.प. गजानन महाराज सोमटकर, ह.भ.प. बलिराम महाराज शिंदे, सरपंच राधिका काकडे, यशवंत सहकारी साखर कारखान्याचे संचालक ताराचंद कोलते, संचालक संतोष कांचन, माजी सरपंच प्रमोद बोधे, माजी सरपंच विठ्ठल शितोळे, कुबेर पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष रमेश हरगुडे, पंचायत समितीचे सदस्य कृषीराज चौधरी, संजय बोधे, ग्रामपंचायत सदस्य दत्तात्रय काकडे, माजी सरपंच बाळासाहेब बोधे, संतोष बोधे, रामभाऊ बोधे, सोसायटीचे चेअरमन सुरेश काकडे, व्हाईस चेअरमन जितेंद्र पवार, अशोक कारंडे, बबन कोलते, अविनाश बोधे, लोकेश कानकाटे, राजाराम भंडारे, मुकिंदा काकडे, सुरज चौधरी, भानुदास जेधे, प्रतिभा कांचन, शुभम बोधे, सुरज बोधे, विशाल बोधे, तेजस बोधे, रमेश बोधे, समीर बोधे, स्वप्नील बोधे, किरण बोधे, संतोष कारंडे, जगदिश केसकर, महेश केसकर, संजय बोधे, हरिभाऊ बोधे, दत्ता केसकर, दशरथ देवकाते, अविनाश थोरात, दत्ता थोरात, आप्पा शिंदे, सचिन कड, चंद्रशेखर शितोळे, नितीन कड, दशरथ गायकवाड, मानसिंग कड, प्रविण शितोळे, समाधान अवचट, अमोल कोळपे, अनिकेत बोधे, मिनेश बोधे, आदी आदर्श सेवा प्रतिष्ठान व 'राजे मल्हारराव होळकर युवा प्रतिष्ठान' चे सर्व सभासद, महिला, ग्रामस्थ, आजी माजी पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### अहिल्याबाई होळकर यांना अभिवादन

चाकण (दैनिक संध्या) : चाकण नगरपरिषदेच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांना अभिवादन करण्यात आले. चाकण नगरपरिषदेचे मुख्याधिकारी डॉ. अंकुश जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली अहिल्याबाई होळकर यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी नगराध्यक्षा मनिषा गोरे, उपनगराध्यक्षा सुवर्णा राक्षे, शिवसेना विभाग प्रमुख शेखर पिंगळे व नगरसेवक मंगेश कांडगे यांच्या हस्ते अहिल्याबाई यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी सुनील गुजर, महेश शेवकरी, रूपाली कांडगे, जयश्री नायकवाडी, अनिल लोहकरे, ॲड. प्रकाश गोरे, हर्षद लेंडघर, स्वाती लेंडघर, सुनिता गोरे, प्रकाश राजनकर, स्वामी कानपिळे, पांडुरंग गोरे आदी उपस्थित होते. मंगेश कांडगे यांनी सांगितले की," अहिल्याबाई यांनी आपल्या असामान्य कर्तुत्वाने रयतेचे मन जिंकले होते. सर्वात शुद्ध व उदाहरण देण्याजोगी अहिल्याबाई होळकर यांची शासक पद्धत होती. अलीकडच्या काळातील चरित्रकार अहिल्यादेवींना तत्त्वज्ञानी राणी असे संबोधतात. अहिल्यादेवी ह्या एक अतिशय योग्य शासक व संघटक होत्या."

### सचीन वांगडेंची उचल बांगडी; विजयमाला पवारांकडे सूत्रे

उरुळी कांचन (दैनिक संध्या) : पुणे व पिंपरी चिंचवड येथे घडलेले विषारी दारू कांड भोवले उरुळी कांचनच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षकाला! उरुळी कांचन पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन वांगडेंची झाली उचलबांगडी; विजयमाला पवार यांच्याकडे पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल यांनी सोपवली उरुळी कांचनची जबाबदारी. गेल्या आठवड्यात पिंपरी-चिंचवड आणि पुणे शहर परिसरात खळबळ उडवून देणाऱ्या विषारी हातभट्टी दारूकांड प्रकरणाचे पडसाद आता ग्रामीण पोलीस दलात उमटू लागले आहेत. विषारी दारू माफियाशी थेट कनेक्शन असल्याच्या गंभीर आरोपावरून पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल यांनी उरुळी कांचन पोलीस ठाण्यावर मोठी कारवाई केली आहे.

# सौर ऊर्जा हा भविष्यातील उत्तम पर्याय

## सौर ऊर्जा निर्मिती साठी शासनाकडून विविध योजना

**राजगुरुनगर (दै. संध्या)**

विजेचे वाढते दर ,आणि वाढता वापर लक्षात घेता भविष्यात सौर ऊर्जा हा उत्तम आणि पर्यावरणपूरक पर्याय ठरू शकतो .त्यामुळे पारंपरिक ऊर्जा स्त्रोतांवर विसंबून न राहता केंद्र व राज्य शासनाच्यावतीने विविध सौर योजना आणल्या असून .या योजनांमुळे घरगुती, व्यावसायिक तसेच कृषी क्षेत्रात सौर ऊर्जेचा वापर मोठ्या प्रमाणात होऊन त्याचा लाभ होण्यास मदत होणार आहे

राजगुरुनगर महावितरण विभागाच्या सहकाऱ्याने खेड तालुक्याच्या विविध भागात कार्यान्वित होत असलेल्या सौर पॅनलद्वारे २५ मेगावॅट वीज उत्पादन होणार असून

नुकतेच तालुक्याच्या पांगरी येथे २५ एकर क्षेत्रावर उभारण्यात आलेला पाच मेगावॅट क्षमतेचा सौरऊर्जा प्रकल्प कार्यान्वित करण्यात आला.या प्रकल्पाचा लोकार्पण उपकार्यकारी अभियंता उत्तम मंचरे आणि राजगुरुनगर शहर अभियंता प्रमोद जाधव यांच्या उपस्थितीत झाले. पांगरी प्रकल्पातून निर्माण होणारी वीज

११ केव्ही वाहिनीद्वारे चांडोली येथील ३३ केव्ही सबस्टेशनमध्ये जोडण्यात येणार असून या अतिरिक्त ५ मेगावॅट विजेमुळे राजगुरुनगर शहरास अधिक सक्षम आणि अखंडित वीजपुरवठा मिळण्यास मदत होणार आहे.

सूर्यप्रकाशापासून वीज निर्मिती केली जाते. या पद्धतीमुळे वीजबिलात मोठी बचत होत असून प्रदूषणमुक्त ऊर्जा उपलब्ध होते. विशेषतः ग्रामीण भागात शेतकरी सौर पंपांचा वापर करून सिंचनासाठी लागणारी वीज सहज उपलब्ध करून घेत आहेत.

सौर ऊर्जा ही अक्षय ऊर्जा असल्याने भविष्यातील ऊर्जा गरजा पूर्ण करण्यासाठी ती अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे. घरांच्या छतांवर बसविण्यात येणाऱ्या सौर प्रकल्पांमुळे अतिरिक्त वीज निर्मिती करून ती वीज वितरण कंपनीला देण्याची सुविधाही उपलब्ध आहे.



पर्यावरण संवर्धन, आर्थिक बचत आणि ऊर्जेचे स्वावलंबन या तिन्ही बाबी साध्य होत असल्याने नागरिकांनी सौर ऊर्जेचा स्वीकार करावा, असे आवाहन करण्यात येत असून,शासनाच्या अनुदान योजनांचा लाभ घेऊन अधिकाधिक नागरिकांनी सौर ऊर्जा प्रकल्प उभारावेत, असेही आवाहन करण्यात आले आहे. तालुक्याच्या टेकवडे गावात शंभर टक्के तर पाईट , पांगरी, ,कडूस,(शेंडेवाडी ) कोरेगाव, कनेरसर, येथे सौर ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित होत असून येत्या महिन्याभरात पूर्णतः प्रकल्प चालू होऊन वीज पुरवठा अधिक सक्षम होईल,व पारंपरिक ऊर्जा स्रोत वरील अवलंबित्व कमी होऊन हरित ऊर्जा लां मदत होईल.

विजेचा वाढता वापर,आणि सर्वसामान्य नागरिकांना वाढीव विजेचे दर परवडणारे नसल्याने राज्य शासनाने महावितरणच्या सहाय्याने १०० युनिट पेक्षा कमी वापर असलेल्या दारिद्र्य रेषेखालील आणि आर्थिक दुर्बल घरगुती वीज ग्राहकांसाठी स्मार्ट योजना अमलात आणली असून खेड तालुक्यात १७४ लाभार्थ्यांनी या योजनेअंतर्गत नोंदणी केली आहे. तसेच केंद्र शासनाने प्रधानमंत्री सूर्य घर मोफत वीज योजना महावितरणच्या घरगुती ग्राहकांसाठी आणली असून छतावरील सौरऊर्जा पॅनेलद्वारे वीज निर्मिती करून घरगुती वापरापेक्षा जास्त झाल्यास वीज बिल शून्य येऊन सर्वसामान्य ग्राहकांना दिलासा मिळेल.

## आश्रमात जनजागृती सेवा संस्थेच्यावतीने हापूस आंबा वाटप

**खोणी (दै. संध्या)**

अधिक महिना कदाचित असाच एक काळ आहे, लोक अनेकदा त्याकडे धार्मिक विधी,व्रत,दान, किंवा अतिरिक्त पुजा कमावण्याचा महिना म्हणून पाहतात.अधिक मास मध्ये दानधर्म करणे हा त्यातीलच एक प्रकार आहे.यासंदर्भात प्रत्येक व्यक्तीची वेगळी संकल्पना,अर्थ, विचारसरणी, दानधर्म करण्याची पद्धती असू शकते.म्हणूनच अधिक महिन्याचे औचित्य साधून शनिवार दिनांक ३०मे२०२६रोजी जनजागृती सेवा संस्थेने खोणी गाव येथील अमेय पालक संघटना संचलित"घरकुल"मतिमंद मुलांच्या आश्रम शाळेत हापूस आंबा वाटप करुन त्यांचे तोंड गोड करण्याचा दानधर्म उपरोक्त संस्थेने केला.उपक्रम संकल्पना व विशेष सहकार्य उषा हॉस्पिलीटीचे



### अमेय पालक संघटनेचे कार्य कौतुकास्पद

संचालक, समाजसेवक, संस्थेचे जेष्ठ सल्लागार अरविंद सुर्वे यांचे लाभले.तसेच या कार्यक्रमाला समता साहित्य अकादमी महाराष्ट्राचे अध्यक्ष, राष्ट्रपती पदक सन्मानित दिलीप नारकर, सिटीझन वेल्फेअर असोसिएशनचे सचिव राजेंद्र नरसाळे,उमेद बहुउद्देशीय सामाजिक संस्थेचे अध्यक्ष सुहास सावंत, सेवा निवृत्त पोलिस अधिकारी दिलीप शिरसाट,सेवा निवृत्त शिक्षक श्रीराम वैद्य, समाजसेवक प्रदीप पाटील,शरद खानविलकर,सिध्दपा भोरखडे, रमेश जुईकर,आशाराम अतकरे, परशुराम ओल्टीकर, प्रदीप नेवे,केशव नाळे,दीपक जाधव,शिवानंद सकपाळ, रवींद्र कुलकर्णी,आसावरी काळे, कुमुद अहिरे यांचे विशेष सहकार्य लाभले. समाजाच्या सद्भावना हाच आमचा आधार आहे,आजीवन सांभाळ या जीवांचा हे व्रत आहे.ही घरकुल आश्रमाची प्रचिती आहे.अमेय पालक संघटना या मतीमंद मुलांचा सांभाळ करण्यास कटिबद्ध आहे.अमय पालक संघटनेचे कार्य कौतुकास्पद आहे.अमेय पालक संघटनेचे संस्थापक स्वयंसेवक अविनाश बर्वे यांनी घरकुल आश्रमाची संकल्पना व सर्व इतंभूत माहिती दिली. जनजागृती सेवा संस्थेच्या वतीने उपस्थितांनी सद्भावनेने भारलेल्या या नंदनवनात आपल्या जीवनातील हृदयक्षण मतिमंद मुलांसमवेत साजरे केले.अमेय पालक संघटनेचे अध्यक्ष बाळकृष्ण कुलकर्णी विश्वस्त प्रसाद शिंत्रे, सदानंद जोशी, रोहिणी जोशी, शुभांगी आपटे,सायमन अल्मेडा हे एक सेवक म्हणून आपली जबाबदारी पार पाडत आहेत.शेवटी घरकुल च्या शिक्षिका-प्रशासक अमिता चौधरी यांनी आभार मानले.

## चोरी बारा लाखांची; गुन्हा मात्र पावणेदोन लाखांचा दाखल

**बारामती (दै. संध्या)**

चोरी झाली बारा लाखांची आणि बारामती तालुका पोलिसांनी गुन्हा नोंदविताना पावणेदोन लाखांच्या चोरीचा गुन्हा नोंदविल्याची आश्चर्यकारक बाब समोर आली आहे. सोन्याच्या दागिन्यांच्या चोरीनंतर पोलिसांनी स्वताःच्या मनानेच त्या दागिन्यांची किंमत ठरवून फिर्यादीत तशा रकमा घातल्याची बाब समोर आली आहे. सोन्याचा आजचा बाजारभाव आणि पोलिसांनी फिर्यादीत नोंदविलेली रक्कम हास्यास्पद असून चोरीची तीव्रता कमी करण्याचा प्रयत्न यातून समोर आला आहे. बारामतीतील सारिका नितीन लोंढे (रा. श्री संकुल सोसायटी, तांदुळवाडी, बारामती) यांनी या बाबत फिर्याद दिली आहे. चोरट्यांनी 31 मे रोजी पहाटे अडीच वाजता राहत्या घराच्या खिडकीचे गज कापून बेडरुममधील सोने चांदीचे दागिने फिक्स्ड डिपॉझिटची पावती असा मुद्देमाल चोरुन नेला आहे. पोलिसांच्या फिर्यादीनुसार साडेतीन तोळ्याचे गंठण, पाऊण तोळ्याची सोन्याची ठुशी, चार ग्रॅमचा सोन्याचा वेल, साडेसात ग्रॅमच्या सोन्याच्या रिंगा, सोन्याची नथ असे दागिने चोरीला गेले. आजच्या सोन्याचा भाव दीड लाख रुपये दहा ग्रॅम असा असताना पोलिसांनी जवळपास 80 ग्रॅम वजनाच्या दागिन्यांची किंमत दाखविली आहे, पावणे दोन लाख रुपये चोरीला गेलेले दागिने विकले असते तर त्याचे किमान बारा लाख रुपये आजच्या बाजारभावा प्रमाणे मिळाले असते.

## महामार्गालगतची गटारे बुजवली नसल्याने व्यवसायिक त्रस्त

**चाकण (दै. संध्या)**

रस्ता रुंदीकरणात महामार्गालगत सांडपाण्याचा निचरा होण्यासाठी खोदण्यात आलेली गटारे व्यवस्थित बुजवली नसल्यामुळे व्यावसायिक त्रस्त झाले आहेत. गेल्या महिन्याभरापूर्वी येथील आंबेठाण चौकात सांडपाण्याचा निचरा होण्यासाठी गटारे खोदली आहेत. ही गटारे खोदल्यामुळे रस्त्यालगत असलेल्या व्यवसायिकांचे अतोनात नुकसान होत आहे. काही ठिकाणी ठेकेदाराच्या मनमानीमुळे पाण्याचा निचरा होण्यासाठी आणलेले पाईपही तसेच रस्त्यालगत धुळखात पडून आहेत. याचा



मनस्ताप रस्त्याने येणाऱ्या जाणाऱ्या सर्वांना सहन करावा लागत आहे. चाकणमध्ये गटारांची दुरावस्था झाली असून, गटारे दुरुस्तीकडे प्रशासन जाणूनबुजून दुर्लक्ष करत असल्याचा आरोप येथील व्यावसायिक किसन गोरे यांनी केला आहे. वाहतूक कोंडी व कचरा यामुळे चाकण परिसरात बकालपणा वाढत चालला असून, विकास कामांच्या नुसत्या गप्पा मारल्या जात आहेत. चुकीच्या ठिकाणी बांधण्यात आलेल्या उड्डाणपणामुळे चाकणकर नागरिक आज मरण यातना सहन करत आहेत. दररोज होत असलेल्या अपघातात एकाचा तरी बळी जातो, हे सर्वज्ञात आहे. पावसाळ्यापूर्वी गटारे, नाल्या, ओढ्यांची स्वच्छता करणे अपेक्षित आहे.

## 'आधुनिक होळकरशाही' पुस्तकाच्या मुखपृष्ठाचा प्रकाशन सोहळा संपन्न

**चौंडी (दै. संध्या)**

31 मे 2026 या दिवशी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा जयंती दिवस या दिवशी लेखक श्री.नवनाथ मनोहर वळकुंदे यांच्या "आधुनिक होळकरशाही" या पुस्तकाच्या मुखपृष्ठाचा प्रकाशन सोहळा अहिल्यादेवी होळकर यांच्या चौंडी या जन्मगावी मोठ्या थाटामाटात मा.श्री.एकनाथ शिंदे (उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य),सुनेत्रा वहिनी पवार (उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य),मा.प्रा.राम शिंदे (सभापती विधान परिषद), महाराष्ट्र राज्याचे माजी ग्रामविकास मंत्री अण्णा डांगे, जतचे लोकप्रिय आमदार गोपीचंद पडळकर,कृषिमंत्री दत्ता मामा भरणे, आमदार रामहरी रुपनवर,मा. खा. रामराव वडकुते,मा.आ.श्री. नारायण पाटील,आ.श्री.सचिन कांबळे, आ.श्री.बाबासाहेब देशमुख, मा.खा.श्री.विकास महात्मे, मा.आ.श्री.पोपटराव गावडे,



मा.आ.श्री.अनिल गोटे, मा.आ.श्री. प्रकाश शेंडगे,मा.आ.नानाभाऊ कोकरे, मा.आ.श्री.हरिभाऊ भले,मा.आ. उत्तमराव जानकर, मा.आ.अनंतकुमार पाटील,मा.आ. सुनीलकुमार कर्जतकर, मा.आ.मोनिकाताई राजळे,मा.आ. अमोल खताळ अशा अनेक मान्यवरांच्या हस्ते पुस्तकाचे मुखपृष्ठ प्रकाशन सोहळा पार पडला. त्यावेळी राज्याचे विधानपरिषद सभापती राम शिंदे यांनी पुस्तकाला भरभरून शुभेच्छा दिल्या.तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी देखील आधुनिक होळकरशाही या विषयाशी या ग्रंथास पुस्तकाचे लेखक श्री. नवनाथ वळकुंदे यांचे अभिनंदन केले व म्हणाले की अशा नवनवीन विषयावर लिहिणे खूप महत्त्वाचे आहे.आधुनिक होळकरशाहीचा नवीन माहिती संशोधकीय लिखाण वळकुंदे करत आहेत.तरी त्यांचे म्हणणे आहे की, मला पुस्तकाला अभिप्राय द्यावा तो मी या पुस्तकाला नक्कीच देणार असेही ते म्हणाले.

तसेच आधुनिक होळकर शाही चा इतिहास हा सामाजिक क्रांतीचा मोठा ऐतिहासिक टप्पा आहे आणि तो जनसामान्यांपर्यंत पोहोचला पाहिजे या पुस्तकाच्या रूपाने तो नक्कीच जनसामान्यांपर्यंत पोहोचेल असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. आदरणीय सुनेत्रा पवार यांनी नवीन विषयावरील पुस्तकाचे मनःपूर्वक स्वागत केले.

अशा प्रकारच्या लिखाणाची गरज सध्याच्या काळात आहे असे मत त्यांनी व्यक्त केले.तरी हजारोंच्या संख्येने काल जनता चौंडी या ठिकाणी दाखल होती त्यांच्या उपस्थितीत सर्व मान्यवरांनी आधुनिक होळकरशाही या पुस्तकाला भरभरून शुभेच्छा दिल्या व नवीन विषयावर प्रथमतः होत असलेल्या श्री. नवनाथ मनोहर वळकुंदे यांच्या लिखाणाचे सर्वांनी स्वागत केले.

### चाकण मार्केट यार्डात कांदा दरवाढ विरोधात आंदोलनाची दिशा ठरविण्यासाठी झालेल्या बैठकी दरम्यान

# आमदार यांच्या उपस्थितीत कार्यकर्ते-नेत्यांमध्ये वाद

**राजगुरुनगर (दै. संध्या)**



राज्यात कांद्याच्या दरात झालेल्या मोठ्या घसरणीमुळे कांदा उत्पादक शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. उत्पादन खर्च वाढत असताना बाजारात मिळणारा दर मात्र अत्यल्प असल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण आहे. या पार्श्वभूमीवर कांदा उत्पादकांना न्याय मिळवून देण्यासाठी तसेच पुढील आंदोलनाची दिशा ठरविण्यासाठी चाकण कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभागृहात शेतकरी संघटना ,व सर्व राजकीय पक्षाची एकत्रितरित्या बैठक आयोजित करण्यात आली होती. मात्र शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर एकत्रित भूमिका घेण्याऐवजी काही राजकीय नेते व शेतकरी संघटनांच्या पदाधिकाऱ्यांमध्येच शाब्दिक चकमक उडाल्याने बैठकीत तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. उपस्थित शेतकऱ्यांनी या प्रकाराबद्दल नाराजी व्यक्त केली. शेतकरी गंभीर आर्थिक संकटातून जात असताना राजकीय नेत्यांनी पक्षीय मतभेद बाजूला ठेवून एकत्र येणे आवश्यक असल्याचे मत अनेकांनी व्यक्त केले. कांद्याला हमीभाव मिळावा, बाजार हस्तक्षेप योजना प्रभावीपणे राबवावी, नाफेड व एनसीसीएफमार्फत मोठ्या प्रमाणावर खरेदी करावी तसेच शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत द्यावी, अशा मागण्या यावेळी करण्यात आल्या. चाकण कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभागृहात कांदा उत्पादकांना न्याय मिळवून देण्यासाठी तसेच पुढील आंदोलनाची दिशा ठरविण्यासाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेने सर्वपक्षीय बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस शिवसेना ठाकरे गटाचे नेते सचिन अहिर, आमदार बाबाजी काळे, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते प्रभाकर बांगर, आंबेगावचे नेते देवदत्त निकम, बाजार समितीचे सभापती विजयसिंह शिंदे, खेड


या बैठकीत झालेल्या वादामुळे शेतकरी वर्गात निराशेचे वातावरण निर्माण झाले असले तरी कांदा उत्पादकांच्या हितासाठी सर्व राजकीय पक्ष, शेतकरी संघटना आणि लोकप्रतिनिधींनी एकत्र येऊन लढा उभारण्याची गरज असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. दरम्यान, शासनाने तातडीने ठोस निर्णय न घेतल्यास कांदा दराच्या प्रश्नावर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा काही शेतकरी संघटनांनी दिला आहे. यावेळी शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे नेते सचिन अहिर म्हणाले शासनाने वेळीच कांद्याला हमीभाव देऊन कांदा परदेशी पाठविला असता तर ही परस्थिती निर्माण झाली नसती,शासनाच्या चुकीच्या कृतीमुळे कांद्याचे मोठ्या प्रमाणात आवक वाढल्याने भाव गडगडले.

पंचायत समितीच्या सभापती विद्या मोहिते, शिवसेनेचे तालुका प्रमुख रामदास धनवटे, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट महिला प्रदेशउपाध्यक्ष ॲड. राजमाला बुट्टे पाटी, तालुका अध्यक्ष हिरामण सातकर यांच्यासह खेड आंबेगाव, जुन्नर, शिरूर तालुक्यातील विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, शेतकरी संघटनांचे प्रतिनिधी, बाजार समितीचे संचालक आणि मोठ्या संख्येने कांदा उत्पादक शेतकरी उपस्थित होते.

राज्यभरात कांद्याच्या दरात झालेल्या मोठ्या घसरणीमुळे कांदा उत्पादक शेतकरी आर्थिक संकटात सापडले असताना त्यांच्या प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी चाकण येथे आंदोलन करण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या सर्वपक्षीय बैठकीतच राजकीय नेते आणि शेतकरी संघटनांच्या पदाधिकाऱ्यांमध्ये शाब्दिक खडाजंगी उडाल्याने वातावरण तापले. त्यामुळे शेतकऱ्यांच्या कांदा या ज्वलंत प्रश्नांवर एकमताने चर्चा होण्याऐवजी राजकीय आरोप-प्रत्यारोपांनाच अधिक वेळ गेल्याने उपस्थित शेतकऱ्यांमध्ये नाराजी व्यक्त करण्यात आली.

बैठकीच्या सुरुवातीला कांदा दरवाढीसाठी आंदोलन उभारणे, शासनावर दबाव निर्माण करणे आणि शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांबाबत चर्चा सुरू होती. मात्र काही वेळातच विविध पक्षांच्या नेत्यांमध्ये आरोप-प्रत्यारोपांना सुरुवात झाली. काही कार्यकर्त्यांनी काही नेत्यांचा या बैठकीत उदोउदो केल्याने बैठकीला वेगळे वळण लागले. मागील काळात कोणत्या पक्षाने शेतकऱ्यांसाठी काय केले आणि कोणत्या पक्षाच्या धोरणांमुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले, यावरून वाद रंगला. या वादाचे रूपांतर शाब्दिक खडाजंगीत झाले आणि काही काळ बैठकीत गोंधळाचे वातावरण निर्माण झाले.या सर्व घडामोडी वेळी खेडचे आमदार बाबाजी काळे यांनी शांत राहणे पसंत केले आणि त्यामुळेच पुढील वाद विवादही टळला असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले.

## थोडक्यात पण महत्वाचे...




### PM-SETU अंतर्गत देशातील पहिली धोरणात्मक गुंतवणूक योजना मंजूर

मुंबई (दैनिक संध्या) : प्रधान मंत्री स्किलिंग अँड एम्प्लॉयॅबिलिटी ट्रान्सफॉर्मेशन थ्रू अपग्रेडेड ITI (PM-SETU) योजनेअंतर्गत एक मोठा निर्णय घेण्यात आला आहे. राष्ट्रीय सुकाणू समिती (NSC) ने आंध्र प्रदेशमधील विशाखापट्टणम ITI क्लस्टरच्या धोरणात्मक गुंतवणूक योजना (SIP) ला मंजुरी दिली आहे. ही योजना आर्सेलरमित्तल निप्पॉन स्टील इंडिया (AM/NS India) आणि त्यांची शैक्षणिक भागीदार संस्था न्यू एज मेकर्स इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (NAMTECH) यांनी मिळून सादर केली होती. PM-SETU योजनेअंतर्गत मंजूर झालेली ही देशातील सर्वात पहिली धोरणात्मक गुंतवणूक योजना आहे. या मंजुरीमुळे या योजनेअंतर्गत औद्योगिक भागीदारी सुरू करणारे आंध्र प्रदेश हे देशातील पहिले राज्य ठरले आहे. कौशल भवन, नवी दिल्ली येथे भारत सरकारच्या कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालय (MSDE) द्वारे आयोजित करण्यात आलेल्या 3 ऱ्या राष्ट्रीय सुकाणू समिती बैठकीत ही मंजुरी देण्यात आली. राज्य सरकारे आणि आघाडीच्या औद्योगिक कंपन्यांमधील भक्कम भागीदारीच्या माध्यमातून सरकारी ITI चे रूपांतर उद्योगांद्वारे व्यवस्थापित आणि उत्तम निकाल देणाऱ्या संस्थांमध्ये करणे, हे PM-SETU योजनेचे उद्दिष्ट आहे. हे उद्दिष्ट पूर्ण करण्याच्या दिशेने पडलेले हे पहिले ठोस पाऊल आहे. या बैठकीचे अध्यक्षपद कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालयाच्या सचिव श्रीमती देवश्री मुखर्जी यांनी भूषवले, तर या बैठकीला प्रशिक्षण महासंचालनालयाचे (DGT) महासंचालक श्री दिलीप कुमार यांच्यासह राष्ट्रीय सुकाणू समितीचे सदस्य उपस्थित होते. या चर्चेत क्षमता निर्माण आयोग (CBC), राष्ट्रीय व्यावसायिक शिक्षण आणि प्रशिक्षण परिषद (NCVET), वाणिज्य आणि उद्योग मंत्रालय, अवजड उद्योग मंत्रालय, कामगार आणि रोजगार मंत्रालय, सहभागी राज्य सरकारे, तसेच हिंदुस्थान एरोनॉटिक्स लिमिटेड (HAL), हिरो मोटोकॉर्प, बजाज ऑटो, ITC लिमिटेड आणि आर्सेलरमित्तल निप्पॉन स्टील (AM/NS) इंडिया, NAMTECH यांसारखे उद्योग क्षेत्रातील आघाडीचे नेते आणि आशियाई विकास बँक (ADB) व जागतिक बँक यांसारखे विकास भागीदार उपस्थित होते.

### 'लक्ष्मी निवास'चे सितारे अक्षिता मुद्गल आणि राघव तिवारी यांनी चाहत्यांचे मानले आभार!




मुंबई (दैनिक संध्या) : झी टीव्हीवरील 'लक्ष्मी निवास' ही मालिका आपल्या वास्तवदर्शी कथाकथन, भावनिक क्षण आणि नाट्यमय वळणांमुळे प्रेक्षकांच्या मनात घर करत आहे. या मालिकेत सामान्य माणूस आणि त्याच्या कुटुंबाच्या स्वप्नांना, संघर्षांना आणि भावनांना सुंदरपणे उलगडले जात आहे. आकर्षक कथानकासोबतच वीर आणि राधिका यांच्या उमलत्या प्रेमकथेवर आधारित रोमँटिक गाणे 'तेरे इश्क में'लाही प्रेक्षकांकडून प्रचंड प्रेम मिळत आहे. प्रेक्षकांच्या प्रचंड प्रेमामुळे 'तेरे इश्क में' हे गाणे भारतीय दूरचित्रवाणीवरील सर्वाधिक लोकप्रिय रोमँटिक गाण्यांपैकी एक ठरले आहे. चाहत्यांनी सोशल मीडियावर केलेल्या फॅन एडिट्सपासून ते मनापासून दिलेल्या कॉमेंट्सपर्यंत, वीर आणि राधिका यांच्या केमिस्ट्री आणि त्यांच्या भावनिक प्रवासाला भरभरून दाद मिळत आहे. हे गाणे चेतन भरंगा यांनी गायले असून अंकित चेतन यांनी संगीत दिले आहे, तर हृदयस्पर्शी शब्द संदीप शरारे यांनी लिहिले आहेत. ह्या प्रचंड प्रतिसादाबद्दल आपला आनंद व्यक्त करताना राघव तिवारी म्हणाले, "खरे सांगायचे तर 'तेरे इश्क में'ला मिळालेले प्रेम आमच्यासाठी खूपच भावनिक आणि हृदयस्पर्शी ठरले आहे. गाणे तयार झाले तेव्हाच आम्हांला जाणवले होते की हे खास आहे कारण यात वीर आणि राधिका यांच्या भावना, निरागसता आणि त्यांच्यातील उमलती प्रेमकथा सुंदरपणे टिपली गेली आहे. पण प्रेक्षकांना ते इतके आवडले आणि ते सर्वाधिक चर्चेत असलेल्या रोमँटिक ट्रॅक्सपैकी एक बनले हे आमच्यासाठी अत्यंत खास आहे. वीर आणि राधिका यांच्या केमिस्ट्रीला आणि प्रवासाला इतके प्रेम दिल्याबद्दल मी मनापासून आभारी आहे. चाहत्यांनी केलेला प्रत्येक मेसेज, रील आणि एडिट आमच्यासाठी खूप महत्त्वाचा आहे. ही दाद आम्हांला रोज सर्वोत्तम देण्यासाठी प्रेरणा देते आणि मला खरोखर वाटतं की वीर आणि राधिका यांची कथा भारतीय दूरचित्रवाणीवरील सर्वाधिक आवडत्या प्रेमकथांपैकी एक ठरत राहील."

### प्रेक्षकांच्या बिनशर्त प्रेमाबद्दल आम्ही कृतज्ञ आहोत : सोनाक्षी बत्रा आणि फर्मान हैदर



मुंबई (दैनिक संध्या) : झी टीव्हीवरील 'जगद्धात्री' या मालिकेने आपल्या वेगळ्या कथानकामुळे प्रेक्षकांची मने जिंकली असून ही आज टेलिव्हिजनवरील सर्वाधिक आवडत्या मालिकांपैकी एक बनली आहे. यशाची आणखी एक पायरी गाठत ह्या मालिकेने आता यशस्वीरित्या 200 भाग पूर्ण केले आहेत आणि ही मालिका टीआरपी चार्टवरही चांगली कामगिरी करत आहे. ह्या मालिकेचे कथानक 'जगद्धात्री' (सोनाक्षी बत्रा) या साध्या आणि निरागस स्त्रीबद्दल आहे. घरात विशेषतः तिची आई आणि आता सासूकडून ती अनेकदा दुर्लक्षित आणि कमी लेखली जाते. जगद्धात्रीच्या व्यक्तिरेखेतील अनेक पैलू आणि तिचे दुहेरी आयुष्यच प्रेक्षकांना खऱ्या अर्थाने भावले आहे. घरात ती शांतपणे सर्व जबाबदाऱ्या पार पाडणारी साधी स्त्री असते, तर घराबाहेर ती निर्भय आणि बुद्धिमान अधिकारी म्हणून धाडसाने आणि आत्मविश्वासाने गुंतागुंतीच्या प्रकरणांचा पाठपुरावा करून त्यांची उकल करते. विशेषतः महिला प्रेक्षकांना तिची ही कथा आणि तिचे भावनिक संघर्ष जवळचे वाटले आहेत. कारण अनेक स्त्रिया त्यांच्या व्यावसायिक आयुष्यात सक्षम, कर्तबगार आणि आत्मविश्वासी असतानाही घरात त्यांना कमी लेखले जाण्याचा अनुभव घेतात. जगद्धात्रीच्या व्यक्तिरेखेतील हा ठळक विरोधाभास आणि मालिकेचे ताज्या दमाचे कथानक यांमुळे देशभरातील प्रेक्षकांच्या मनाला ही मालिका भिडली असून ह्या मालिकेला मोठ्या प्रमाणात प्रेम आणि कौतुक मिळत आहे. मालिकेने 200 भागांचा टप्पा पूर्ण केल्याबद्दल आनंद आणि कृतज्ञता व्यक्त करत मुख्य कलाकार सोनाक्षी बत्रा आणि फर्मान हैदर यांनी या खास क्षणाबद्दल आपल्या भावना व्यक्त केल्या. 'जगद्धात्री' या मालिकेत मुख्य भूमिका साकारणारी सोनाक्षी बत्रा म्हणाली, "'जगद्धात्री'चे 200 भाग पूर्ण करणे हा आमच्या संपूर्ण टीमसाठी एक सुंदर टप्पा आहे. पहिल्या दिवसापासून जसा उत्साह होता, तसाच उत्साह आजही सेटवर आहे. याचे मोठे श्रेय आमचे दिग्दर्शक, निर्माते आणि वाहिनीच्या क्रिएटिव्ह टीमला जाते. त्यांनी सतत आम्हांला त्यांचे समर्थन, दृष्टिकोन, समर्पण आणि सकारात्मकता दिली. कलाकारांपासून तांत्रिक टीमपर्यंत, मेकअप-हेअर आर्टिस्ट्स, स्पॉट दादांपर्यंत प्रत्येकजण पूर्ण आवडीने आणि टीमवर्कने काम करतात आणि म्हणूनच तर ही मालिका आज इथपर्यंत पोहोचली आहे. लेखकांनी कथानकातील नाट्यमय वळणे आणि प्रभावी संवाद इतके सुंदरपणे लिहिले आहेत की प्रेक्षक त्यासोबत सातत्याने जोडलेले राहतात. पण आम्हांला खरी ऊर्जा मिळते ती म्हणजे प्रेक्षकांचे प्रेम, आशीर्वाद आणि पाठिंब्यातून.

# ठाणे जिल्ह्यात अन्न व औषध प्रशासनाची मोठी कारवाई

## ११ लाखांचे आंबे आणि साडेचार लाखांचा गुटखा जप्त, ३७ जणांना अटक

भिवंडी (दै. संध्या)



अन्न व औषध प्रशासनाचे (FDA) राज्य आयुक्त तुकाराम मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणे जिल्ह्यात अन्न सुरक्षा नियमांची कडक अंमलबजावणी करण्यासाठी एक मोठी आणि सलग मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत ठाणे जिल्ह्यातील अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांनी एपीएमसी मार्केट (नवी मुंबई परिसर) आणि इतर विविध भागांमध्ये ३० आणि ३१ मे २०२६ रोजी अचानक धाडी टाकून अत्यंत मोठी कायदेशीर कारवाई केली आहे.

उन्हाळ्याच्या दिवसांत आंब्याची मागणी मोठ्या प्रमाणावर असते, याचाच गैरफायदा घेत काही व्यापारी आंबे कृत्रिमरित्या पिकवण्यासाठी चुकीच्या पद्धतींचा वापर करत असल्याचे समोर आले आहे. या धाड सत्रादरम्यान आंबे पिकवण्यासाठी इथिलिन (Ethylene) सदृश्य स्प्रेचा थेट वापर करणाऱ्या तीन मोठ्या प्रतिष्ठानांवर प्रशासनाने कारवाई केली आहे. या कारवाईत संबंधित ठिकाणांवरून तब्बल ३,४५३ किलो आंब्याचा साठा जप्त करण्यात आला असून, या जप्त केलेल्या आंब्यांची एकूण किंमत ११ लाख १२ हजार ८५० रुपये इतकी आहे.

अन्न सुरक्षा व मानके प्राधिकरणाच्या (FSSAI) नियमांनुसार, आंबे किंवा इतर फळे पिकवण्यासाठी थेट फळांवर इथिलिन स्प्रे मारण्यास सक्त मनाई आहे. व्यापाऱ्यांनी नियमानुसार सुरक्षित अशा इथिलिन गॅस चेंबरचाच वापर करणे बंधनकारक आहे. मात्र, तपासणी दरम्यान अनेक व्यापारी नियमांचे उल्लंघन करून थेट फळांवरच स्प्रे मारताना रंगेहात पकडले गेले. या जप्त केलेल्या आंब्यांचे नमुने पुढील तपासणीसाठी आणि विश्लेषणासाठी प्रयोगशाळेत पाठवण्यात आले आहेत. या प्रयोगशाळेचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर संबंधितांवर पुढील कडक कायदेशीर कारवाई केली जाणार आहे. या तपासणीत कॅल्शियम कार्बाइडसारख्या अत्यंत जीवघेण्या आणि घातक रसायनाचा वापर कुठेही आढळून आलेला नाही, परंतु इथिलिन स्प्रेचा चुकीचा वापर होत असल्याचे स्पष्ट झाले आहे.

यासोबतच, जागतिक तंबाखू विरोधी दिनाचे औचित्य साधून २९ मे ते ३१ मे २०२६ या कालावधीत गुटखा, पानमसाला आणि सुगंधित तंबाखू यांसारख्या आरोग्याला घातक व प्रतिबंधित अन्न पदार्थांच्या विरोधातही नवी मुंबईतील एपीएमसी मार्केट व ठाणे जिल्ह्यात व्यापक मोहीम राबविण्यात आली.

या कारवाईत एकूण ३६ प्रतिष्ठानांवर कायदेशीर बडगा उगारण्यात आला आहे. या प्रतिबंधित पदार्थांच्या कारवाई दरम्यान प्रशासनाने ४ लाख ७४ हजार ४०७ रुपये किमतीचा गुटखा, सुगंधित तंबाखू आणि पानमसाल्याचा साठा जप्त केला आहे. बेकायदेशीरपणे या पदार्थांची विक्री करणाऱ्या विक्रेत्यांविरोधात विविध पोलीस ठाण्यांमध्ये प्रथम खबरी अहवाल (FIR) दाखल करण्यात आला असून, याप्रकरणी आतापर्यंत ३७ व्यक्तींना अटक करण्यात आली आहे. तसेच नियमांचे गंभीर उल्लंघन करणाऱ्या एकूण ३१ प्रतिष्ठानांना प्रशासनाने तात्काळ सील ठोकले आहे.

अन्न व औषध प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे की, नागरिकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या अशा भेसळखोर आणि बेकायदेशीर व्यापाऱ्यांविरोधातील ही धाड सत्र मोहीम यापुढेही अशीच सातत्याने सुरू राहणार आहे. कोणत्याही परिस्थितीत नियमांचे उल्लंघन खपवून घेतले जाणार नाही, असा इशारा प्रशासनाने दिला आहे. त्यासोबतच समाजात अशा प्रतिबंधित पदार्थांची विक्री किंवा अन्नातील भेसळीबाबत नागरिकांना कोणतीही माहिती मिळाल्यास त्यांनी तात्काळ प्रशासनाला कळवावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

### नागरिकांसाठी आवाहन आणि तक्रार केंद्र

प्रतिबंधित आणि भेसळयुक्त अन्नपदार्थांचे १००% निर्मूलन करण्यासाठी जनतेने प्रशासनाला पूर्ण सहकार्य करावे. कोणत्याही प्रकारची तक्रार नोंदवण्यासाठी किंवा गैरप्रकाराची माहिती देण्यासाठी प्रशासनाने १८००२२२३६५ हा टोल फ्री क्रमांक उपलब्ध करून दिला आहे. तसेच नागरिक आपली तक्रार लेखी स्वरूपात 'सह आयुक्त (कोकण विभाग), अन्न व औषध प्रशासन कार्यालय, वरदान एमआयडीसी बिल्डिंग, तळमजला, वागळे इस्टेट, रोड नंबर १६, ठाणे (पश्चिम) - ४००६०४' येथे देखील नोंदवू शकतात, असे आवाहन कोकण विभागाच्या सहआयुक्त (अन्न) श्री.पराग नलावडे यांनी केले आहे.

## मुरबा गणपती मंदिराचा वर्धापनदिन भक्तिभावाने उत्साहात साजरा

उरण (दै. संध्या)

मोरावे गाव येथील समुद्रात असलेल्या गणपती मंदिराचा वर्धापनदिन सोमवारी (ता. १) मोठ्या उत्साहाने आणि भक्तिभावाने साजरा करण्यात आला. सकाळच्या वेळेत गणेशपूजन आणि अभिषेक करण्यात आला. यावेळी गव्हाण-कोपर येथील श्री गुरुकृपा भजन मंडळाच्या गायिका सुप्रिया घरत-ठाकूर यांनी गणेशावर आधारित सुमधुर भजने सादर केली. त्यांना त्यांच्या सहकारी वादकांनी उत्तम साथ दिली. मुरबा गणपती ट्रस्टींनी आंतरराष्ट्रीय कामगार नेते महेंद्रशेठ घरत यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधले होते; परंतु ते आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी जिनिव्हा येथे असल्याने सहभागी होऊ शकले नाहीत. त्यांच्या वतीने एम. जी. ग्रुपचे पदाधिकारी उपस्थित होते. महेंद्रशेठ घरत हे गणेशाचे निस्सीम भक्त असल्याने त्यांनी गणेशभक्तांचा समुद्रातील प्रवास सुखरूप व्हावा म्हणून १५ लाखांच्या दोन पॅसेंजर बोटी मुरबा गणपती देवस्थानला दान केल्या आहेत. त्यामुळे गणेशभक्त अतिशय आनंदाने पॅसेंजर बोटीतून प्रवास करून गणेशाचे दर्शन घेतात, फ्लेमिंगोंचा आनंद घेतात. सध्या कडक उन्हाळ्यामुळे सूर्य आग ओकत असतानाही छप्पर असणाऱ्या पॅसेंजर बोटींमुळे भक्तांचा प्रवास आनंदमयी झाला.

## राज्यात पशुवैद्यकीय सेवांचे सक्षमीकरण

भिवंडी (दै. संध्या)

■ १९६२ हेल्पलाइन आणि व्हॉट्सअॅप चॅटबॉटद्वारे शेतकऱ्यांना दारातच मिळणार आरोग्य सेवा

महाराष्ट्र राज्यातील पशुपालक आणि शेतकरी बांधवांना तात्काळ व गतिमान पशुवैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्यासाठी पशुसंवर्धन आयुक्तालयाने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. पशुसंवर्धन विभाग, भारत फायनान्शियल इंक्लुजन लिमिटेड आणि इंडसइंड बँक यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यात गेल्या पाच वर्षांपासून '१९६२' ही टोल-फ्री हेल्पलाइन सेवा यशस्वीपणे राबवली जात आहे. या हेल्पलाइनच्या अंतर्गत सुरू असलेल्या 'मोबाईल व्हेटर्नरी युनिट्स' म्हणजेच फिरत्या पशुवैद्यकीय वाहनांच्या माध्यमातून ग्रामीण व दुर्गम भागातील शेतकऱ्यांच्या दारातच मोफत आरोग्य सेवा पुरवली जात आहे. या योजनेचा फायदा घेत आतापर्यंत ८ लाखांहून अधिक जनावरांवर वेळेवर, सुलभ आणि विश्वसनीय उपचार करण्यात आले आहेत. या उपक्रमाला मिळालेल्या मोठ्या यशानंतर, पशुवैद्यकीय सेवा आणखी जलद आणि आधुनिक करण्यासाठी प्रशासनाने आता 'व्हॉट्सअॅप-आधारित चॅटबॉट सेवा' सुरू केली आहे. संपूर्ण महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना घरबसल्या रिअल-टाइम (तात्काळ) वैद्यकीय साहाय्य मिळावे आणि प्रशासनाशी थेट संवाद साधणे सोपे व्हावे, हा या डिजिटल उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. हा चॅटबॉट अतिशय सोप्या पद्धतीने डिझाइन करण्यात आला असून शेतकरी आपल्या मोबाईलवरून +९१ ९०६३१४२२९९ या क्रमांकावर व्हॉट्सअॅप मेसेज पाठवून किंवा प्रशासनाचा अधिकृत क्यूआर (QR) कोड स्कॅन करून या सेवेचा लाभ घेऊ शकतात. या सुविधेचा वापर करणे अत्यंत सोपे आहे. शेतकऱ्यांनी नमूद केलेल्या व्हॉट्सअॅप क्रमांकावर केवळ "Hi" असा मेसेज पाठवल्यास त्यांना जनावरांचे आजार, उपचार आणि लसीकरणाबद्दल सविस्तर माहिती उपलब्ध होते. तसेच, विविध पशुसंवर्धन विषयक सरकारी योजनांची माहितीही याद्वारे मिळवता येते. या चॅटबॉटचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे यावरून शेतकरी थेट पशुवैद्यकीय डॉक्टरांशी चॅट, ऑडिओ कॉल किंवा व्हिडिओ कॉल (टेलीकन्सल्टेशन) याद्वारे संपर्क साधून दूरस्थ सल्ला घेऊ शकतात.

या नवीन डिजिटल प्रणालीला सुरुवातीपासूनच शेतकऱ्यांचा चांगला प्रतिसाद मिळत असून, ऑक्टोबर २०२५ ते मे २०२६ या कालावधीत ६१५ शेतकऱ्यांनी या चॅटबॉटचा यशस्वी वापर केला आहे, तर २०१ पशुपालकांनी व्हिडिओ कॉलद्वारे डॉक्टरांचा थेट सल्ला घेतला आहे. या उपक्रमामुळे शेतकऱ्यांचा प्रवासाचा वेळ आणि खर्च वाचणार असून, आणीबाणीच्या प्रसंगात जनावरांना तात्काळ उपचार मिळून त्यांच्या उत्पादकतेत सुधारणा होण्यास मदत होणार आहे.

## शाह खंडेलवाल जैन अँड असोसिएट्सचा ६० वर्षांचा गौरवशाली प्रवास

पुणे (दै. संध्या)

■ यंदा मध्य पूर्वेत ऑफशोअर ऑपरेशन्सची सुरुवात



पुण्यातील प्रतिष्ठित चार्टर्ड अकाउंटंट फर्म शाह खंडेलवाल जैन अँड असोसिएट्स (SKJ) ने आपल्या स्थापनेची ६० वर्षे पूर्ण केल्याचा ऐतिहासिक टप्पा गाठला आहे. या निमित्ताने पुण्यातील एका आलिशान हॉटेलमध्ये दोन दिवस चाललेल्या 'रीकनेक्ट २०२६' या विशेष सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला ग्राहक, माजी विद्यार्थी (अलुम्नी) आणि हितचिंतकांसह १,००० हून अधिक मान्यवर उपस्थित होते. सन १९६६ मध्ये दूरदृष्टी लाभलेले स्वर्गीय सी. व्ही. खंडेलवाल यांनी या संस्थेची स्थापना केली. त्या काळात पुणे हे 'पेन्शनर्स पॅराडाईज' म्हणून ओळखले जात होते. गेल्या सहा दशकांत संस्थेने सातत्यपूर्ण प्रगती करत व्यावसायिक उत्कृष्टता, विश्वासार्हता आणि ग्राहककेंद्री सेवा यांमुळे स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. आज संस्थेचे मुख्यालय पुण्यात असून औरंगाबाद, इंदूर आणि बागलकोट येथे नेटवर्क कार्यालये कार्यरत आहेत. या विशेष प्रसंगी बोलताना संस्थेचे भागीदार आशीष खंडेलवाल म्हणाले, "आमचे काही ग्राहक गेली जवळपास सहा दशके आमच्याशी जोडलेले आहेत. ग्राहकांनी SKJ वर दाखविलेला विश्वासच आम्हाला सातत्याने उत्कृष्टतेकडे वाटचाल करण्यासाठी प्रेरणा देतो." संस्थेचे भागीदार नीलेश खंडेलवाल म्हणाले, "बदलत्या काळानुसार स्वतःमध्ये सातत्याने बदल घडवून आणल्यामुळेच SKJ आजही तितकीच सुसंगत आणि सक्षम आहे. ग्राहक सेवेत अधिक गुणवत्ता आणण्यासाठी आम्ही कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आणि आमचा दीर्घ अनुभव यांची सांगड घातली आहे. संस्थेची तिसरी पिढी नेतृत्वासाठी सज्ज असून जागतिक स्तरावर विस्तार करण्यावरही आमचा भर आहे."

सध्या संस्थेत २०० हून अधिक व्यावसायिक कार्यरत आहेत. आतापर्यंत १,००० हून अधिक चार्टर्ड अकाउंट्सनी येथे आर्टिकलशिप पूर्ण केली असून त्यापैकी अनेक जण आज देशातील आघाडीच्या कंपन्यांमध्ये वरिष्ठ पदांवर कार्यरत आहेत. ग्रामीण भागातून आलेल्या अनेक विद्यार्थ्यांनी येथे प्रशिक्षण घेतले असून त्यांपैकी काही आज नामांकित कंपन्यांचे मुख्य वित्तीय अधिकारी (CFO) आहेत.

## जेईई अॅडव्हान्स परीक्षेचा निकाल जाहीर

पुणे (दै. संध्या)



देशभरातील भारतीय तंत्रज्ञान संस्थेतील (आयआयटी) प्रवेशासाठी घेतलेल्या 'जेईई अॅडव्हान्स' परीक्षेचा निकाल आयआयटी रूरकी यांच्या वतीने रविवारी जाहीर करण्यात आला. देशभरातील ५६ हजार ८८० विद्यार्थी परीक्षेत पात्र ठरले आहेत. आयआयटी दिल्ली झोनमधील शुभम कुमार हा ३६० पैकी ३३० गुण मिळवीत पहिला आला आहे. तर आरोही देशपांडे ३६० पैकी २८० गुण मिळवीत मुलींमध्ये पहिली आली आहे. जेईई अॅडव्हान्स परीक्षेतील पेपर एक आणि पेपर दोनसाठी एकूण एक लाख ८७ हजार ३८९ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यातील एक लाख ७९ हजार ६९४ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. त्यातील ५६ हजार ८८० विद्यार्थी जेईई अॅडव्हान्स परीक्षेतून पात्र ठरले आहेत. त्यात १० हजार १०७ मुलींचा समावेश आहे.

देशभरातील पहिल्या दहा क्रमांकामध्ये (टॉप दहा) आयआयटी मुंबई झोनमधील बी जयकृष्ण श्रीनिवास याने ३६० पैकी ३१४ गुणांसह सहावा, तर कनिष्क जैन याने ३१३ गुण मिळवीत आठव्या क्रमांक पटकाविला आहे, अशी माहिती आयआयटी रूरकी तर्फे देण्यात आली आहे.

# तोशिबाकडून 'पॉवरग्रिड'ला १३२ किलोवोल्ट सिस्टीम सुपूर्द

## आपल्या स्वदेशी एम-जीआयएस पोर्टफोलिओचा विस्तार

हैदराबाद (दै. संध्या)




भारताच्या पहिल्या 220 केव्ही एम-जीआयएस सिस्टीमच्या सादरीकरणानंतर आपल्या स्वदेशी एम-जीआयएस पोर्टफोलिओचा आणखी विस्तार करत, तोशिबा ट्रान्समिशन अँड डिस्ट्रिब्युशन सिस्टीम्स (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड (टीटीडीआय) ने आज पॉवर ग्रीड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड (पॉवरग्रिड) कडे स्वदेशी विकसित 132 केव्ही एम-जीआयएस सिस्टीम यशस्वीपणे सुपूर्द केल्याची घोषणा केली.

132 केव्ही एम-जीआयएस सिस्टीमचा विकास आणि त्याची सुपूर्दता हा भारतातील स्वदेशी मोबाईल हाय-व्होल्टेज सोल्यूशन्स पोर्टफोलिओचा विस्तार करण्याच्या टीटीडीआयच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमधील आणखी एक महत्त्वाचा टप्पा आहे. उपकरणांच्या विशिष्ट गरजा पूर्ण करण्यासाठी पॉवरग्रिडला पुरवण्यात आलेली ही प्रणाली, ग्रीड आधुनिकीकरण, लवचिकता आणि स्वदेशीकरणाच्या दिशेने भारताच्या सुरू असलेल्या प्रवासाला देखील बळ देते.

या महत्त्वाच्या टप्प्यावर, टीटीडीआयचे चेअरमन आणि मॅनेजिंग डायरेक्टर श्री. हिरोशी फुरुता म्हणाले, "पॉवरग्रिडला स्वदेशी 132 केव्ही एम-जीआयएस सिस्टीम सुपूर्द करून आमच्या एम-जीआयएस पोर्टफोलिओचा आणखी विस्तार करताना आम्हाला अत्यंत आनंद होत आहे. काही महिन्यांपूर्वीच भारताच्या पहिल्या स्वदेशी 220 केव्ही एम-जीआयएस सिस्टीमच्या यशस्वी सुपूर्ततेनंतर लगेचच हा टप्पा गाठला गेला आहे. हे कॉम्पॅक्ट आणि अत्यंत सहज कोठेही नेण्याजोगी ही प्रणाली भारतातच विकसित आणि बनवली गेली आहे, जे सरकारच्या 'मेक इन इंडिया' मिशनप्रती आमची असलेली दृढ वचनबद्धता दर्शवते. ही प्रणाली तोशिबाचे तंत्रज्ञान आणि स्थानिक इंजिनिअरिंग क्षमतेचा प्रभावी वापर करून पॉवरग्रिडच्या अवघड तांत्रिक आणि कार्यात्मक गरजा पूर्ण करते. भारताचे (पारेषण) ट्रान्समिशन क्षेत्र झपाट्याने विकसित होत असताना, टीटीडीआय ग्रीडची उपलब्धता आणि लवचिकता वाढवणारे अशाच प्रकारचे गरजेनुसार तयार केलेले आणि उच्च- कार्यक्षम उपाय देत राहील."

पॉवरग्रिडच्या उत्पादनाचे तपशील आणि तांत्रिक, गुणवत्ता, कार्यात्मक व सुरक्षा विषयक गरजांचा अंतर्भाव करून, टीटीडीआयने तोशिबाचे इंजिनिअरिंग कौशल्य, तंत्रज्ञान आणि भारतातील स्थानिक उत्पादन क्षमतेचा प्रभावी वापर करत 132 केव्ही एम-जीआयएस प्रणाली विकसित केली आहे.

आव्हानात्मक परिस्थितीमध्येही अत्यंत विश्वासार्हतेने काम करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या या 132 केव्ही एम-जीआयएस प्रणालीमध्ये एक प्रमाणित "कनेक्ट–ऑपरेट–डिस्कनेक्ट–रिडिप्लॉय" (जोडा–वापरा–तोडा–पुन्हा जोडा) अशी संरचना आहे, जी संपूर्ण ग्रीडमधील गतिशीलता आणि कार्यात्मक लवचिकता लक्षणीयरीत्या वाढवते.

आपल्या आकाराने लहान आणि मॉड्युलर रचनेमुळे, ही सिस्टीम दाट गर्दीच्या ठिकाणी आणि विस्तारत जाणाऱ्या पारेषण परिसंस्थेमध्ये वेगाने वहन करण्यासाठी अत्यंत उपयुक्त आहे. ही सिस्टीम प्रमाणित ट्रान्सपोर्ट ट्रेलर्सवर सहज बसेल, यांत्रिक कंपन आणि वाहतुकीचा ताण सहन करेल, महत्त्वपूर्ण इलेक्ट्रिकल क्लिअरन्स राखेल आणि थेट सुरू असलेल्या प्रोजेक्ट साईट्सवर अखंडपणे जोडली जाईल अशा पद्धतीने बनवण्यात आली आहे.

यामुळेच ही 132 केव्ही एम-जीआयएस प्रणाली जलद गतीने काम करणाऱ्या मोबाईल पॉवर इन्फ्रास्ट्रक्चरची गरज असलेल्या उपयुक्तता सेवा, अपारंपरिक ऊर्जा विकासक, आपत्ती व्यवस्थापन पथके आणि पारेषण ऑपरेटर यांच्यासाठी अत्यंत विश्वासार्ह साधन ठरते.

भारताच्या पहिल्या 220 केव्ही एम-जीआयएस प्रणालीच्या आणि आता पॉवरग्रिडला 132 केव्ही मॉडेलच्या यशस्वी सुपूर्ततेनंतर, टीटीडीआय सध्या आपल्या स्वदेशी 400 केव्ही एम-जीआयएस प्रणालीच्या इंजिनिअरिंगच्या प्रगत टप्प्यात असून, या वर्षाच्या उत्तरार्धात तिची सुपूर्तता केली जाणार आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### सफाई कर्मचाऱ्यावरील हल्ल्याच्या निषेधार्थ अ‍ॅट्रॉसिटी गुन्हा दाखल करावा

पुणे (दैनिक संध्या) : मेहतर वाल्मिकी समाजातील सफाई कर्मचारी धीरज मोहन बैद यांच्यावर झालेल्या प्राणघातक हल्ल्याच्या निषेधार्थ पुणे शहर मेहतर वाल्मिकी महासंघाच्या वतीने हल्ला करणाऱ्या गुन्हेगारावर 307 कलम अंतर्गत अ‍ॅट्रॉसिटी गुन्हा दाखल करण्यात यावा या मागणीसाठी मेहतर वाल्मिकी समाजातील शिष्टमंडळ कोंढवा पोलीस स्टेशन मध्ये वरिष्ठ पोलीस निरीक्षक कुमार घाडगे व पोलीस उपनिरीक्षक रवींद्र गाडवे यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली. यावेळी मेहतर वाल्मिकी महासंघाचे पुणे शहर अध्यक्ष रवी परदेशी,पुणे शहर सचिव नरेश जाधव, माजी नगरसेवक सुधीर जामजोत, डॉ. अनुपम बेगी,कविराज संघेलीया, चंद्रकांत किसन चव्हाण, चेतन जेधे, विशाल चव्हाण, ऋषीराज जिनवाल, आदी उपस्थित होते.

### एसटीच्या 78व्या वर्धापनदिन शिरूरमध्ये उत्साहात साजरा

शिरूर (दैनिक संध्या) : ग्रामीण भागातील नागरिकांसाठी एसटी ही केवळ वाहतुकीचे साधन नसून जीवनवाहिनी आहे. प्रवासी वाहतूक वाढविण्यासाठी अधिकारी, कर्मचारी आणि नागरिकांनी एकत्रित प्रयत्न करणे आवश्यक असल्याची भावना महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) ७८व्या वर्धापनदिनानिमित्त शिरूर बसस्थानकात आयोजित कार्यक्रमात व्यक्त करण्यात आली. राज्यातील पहिली एसटी बस १ जून १९४८ रोजी पुणे–अहिल्यानगर मार्गावर धावली होती. त्यानिमित्त दरवर्षी १ जून हा दिवस एसटीचा वर्धापनदिन म्हणून साजरा केला जातो. यंदाही शिरूर बसस्थानकात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. वर्धापनदिनानिमित्त बसस्थानक परिसराची स्वच्छता करून आकर्षक सजावट करण्यात आली होती. रांगोळ्या, फुलांची आरास, तोरणे आणि फुलमाळांनी सजविलेल्या एसटी बसमुळे परिसरात उत्सवी वातावरण निर्माण झाले होते. ज्येष्ठ प्रवाशांच्या हस्ते केक कापून वर्धापनदिन साजरा करण्यात आला. यानंतर प्रवाशांना पेढे, बर्फी तसेच गुलाबपुष्पांचे वाटप करण्यात आले. यावेळी आगार व्यवस्थापक मनीषा गायकवाड यांनी शिरूर आगाराच्या कामकाजाची माहिती देताना सांगितले की, शिरूर बसस्थानकात २५० हून अधिक कर्मचारी कार्यरत असून दररोज १९३ बसगाड्या विविध मार्गांवर धावतात. तसेच सुमारे ३ हजार विद्यार्थी-विद्यार्थिनी एसटीच्या सवलतीच्या प्रवास योजनेचा लाभ घेत आहेत. अधिकाधिक नागरिकांनी सुरक्षित, किफायतशीर आणि विश्वासार्ह असलेल्या एसटी सेवेला प्राधान्य द्यावे, असे आवाहन त्यांनी केले. प्रा. सतीश धुमाळ यांनी एसटी ही सुरक्षित प्रवासाची हमी देणारी सेवा असून ग्रामीण भागाच्या सामाजिक आणि आर्थिक विकासात तिचे योगदान महत्त्वपूर्ण असल्याचे सांगितले. या कार्यक्रमास वाहतूक निरीक्षक एन. बी. हवालदार, सहाय्यक वाहतूक निरीक्षक आर. बी. लंके, वाहतूक नियंत्रक डी. जी. दहिफळे, भरत माने, माधव मुंडे, चंद्रकांत वेताळ, सुनील देवरे, समीर झगडे, बाबू भोसले, वाहन परीक्षक सुनील जगताप, गणेश खटके, बापू फलके, वैशाली दांडेकर, आदर्श गंगावणे, सुजाता साबळे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माधव मुंडे यांनी केले, तर समीर झगडे यांनी आभार मानले.

### हायप्रोफाइल नागरिक रडारवर! सायबर चोरट्यांचा 'सोर्स' कोण?

पुणे (दैनिक संध्या) : पोलिस आणि सर्वोच्च न्यायालयाची भीती दाखवून डेक्कन परिसरातील एका ८७ वर्षीय ज्येष्ठ डॉक्टरांची ४६ लाख रुपयांची फसवणूक झाल्याचा प्रकार सोमवारी (ता. १) उघडकीस आला. मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेचे अधिकारी असल्याचे भासवून सायबर चोरट्यांनी ही 'डिजिटल अरेस्ट' केली. शहरात दररोज अशा प्रकारे हायप्रोफाइल नागरिकांची गोपनीय माहिती मिळवून त्यांच्या बँक खात्यातील लाखो रुपये क्षणार्धात लंपास केले जात आहेत. मात्र या सायबर चोरट्यांपर्यंत पोहोचण्यात पोलिसांना अद्याप फारसे यश आलेले नाही. सायबर चोरट्यांचा मुख्य 'सोर्स' डार्क वेब आणि अनधिकृत डेटा ब्रोकर्स हा आहे. मॉल्स, सुपरमार्केट्स, विमा कंपन्या किंवा ऑनलाइन ऑफर्सच्या नावाखाली नागरिक स्वतःची वैयक्तिक माहिती सोपवतात. डार्क वेबवर नागरिकांचा चोरलेला डेटा (नाव, मोबाईल क्रमांक, पासवर्ड, बँक खात्याची माहिती) यांची खरेदी-विक्री होते. याशिवाय, सोशल मीडिया, मॅट्रिमोनिअल साईट्स, पोर्नोग्राफिक साईट्स आणि जॉब पोर्टल्सवरूनही नागरिकांची माहिती चोरट्यांच्या हाती लागते. डेटा ब्रोकर्स कंपन्या नागरिकांच्या डिजिटल हालचालींवर लक्ष ठेवतात.

# एसटीमुळेच ग्रामीण भागातील मुलं शिकली

## माजी आमदार संजय जगताप : सासवड आगारात एसटीचा ७८ वा वर्धापन दिन उत्साहात : पंतप्रधानांच्या वाढदिवसानिमित्त प्रवाशांसाठी 'वाचनालया'चे लोकार्पण

सासवड (दै. संध्या)

स्वातंत्र्यानंतर पहिली एसटी धावली आणि बघता बघता ती महाराष्ट्रातील ग्रामीण व निमशहरी नागरिकांच्या दळणवळणाचे मुख्य साधन बनली. ग्रामीण भागातील सर्वसामान्य घरातील मुले-मुली आज शिकून मोठ्या पदांवर आणि अधिकारी पदावर पोहोचली, यात एसटीचा खूप मोठा वाटा आहे. ही लोकसेवा अखंड आणि चिरकाल चालावी यासाठी आपण सर्वजण मिळून कटिबद्ध राहू., असे प्रतिपादन माजी आमदार संजय जगताप यांनी केले.



■ सासवड (ता. पुरंदर) : सासवड आगारात एसटी महामंडळाच्या ७८ व्या वर्धापन दिनानिमित्त एसटी बसचे पूजन करताना माजी आमदार संजय जगताप, आगार प्रमुख मोहिनी ढेरे, संतोष जगताप व इतर मान्यवर. ■

महाराष्ट्राची जीवनवाहिनी असलेल्या 'लालपरी'चा ७८ वा वर्धापन दिन आणि भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून सासवड एसटी आगारात सोमवारी १ जून रोजी विविध उत्साही उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी पंतप्रधान मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त प्रवाशांसाठी भाजपाचे नेते व माजी आमदार संजय जगताप यांच्या वतीने वाचनालयाचे, तसेच स्व. एकनाथकाका जगताप प्रतिष्ठानच्या वतीने 'हँगिंग वाचनालया'चे भावपूर्ण लोकार्पण माजी आमदार संजय जगताप यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी व्यासपीठावर आगार प्रमुख मोहिनी ढेरे, स्व. एकनाथकाका जगताप प्रतिष्ठानचे अध्यक्ष संतोष जगताप, सचिव हेमंत ताकवले, भाजपचे उपजिल्हाध्यक्ष संदीप देवकर, रोटरी क्लबचे माजी अध्यक्ष डॉ. प्रवीण जगताप, संभाजी गरुड, संतोष जगताप, आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान मान्यवरांच्या हस्ते केक कापून एसटीचा ७८ वा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. आगारातील कर्मचारी सुनील येळे, प्रवीण गायकवाड, अमित वाल्मिकी, सावता जगताप व प्रतिक्षा यादव यांनी प्रवाशांना साखर-पेढे देऊन त्यांचे आपुलकीने स्वागत केले. प्रवाशांना प्रवासादरम्यान आणि बसची वाट पाहत असताना वाचनाची गोडी लागावी, या उद्देशाने सुरू केलेल्या या अभिनव वाचनालय उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

कार्यक्रमाच्या उत्तरार्धात उपस्थितांच्या हस्ते एसटी बसचे पारंपरिक पूजन करण्यात आले. त्यानंतर सर्व मान्यवरांनी एसटी बसमध्ये बसून आगाराच्या परिसरात एक आनंददायी फेरफटका मारला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक आगार प्रमुख मोहिनी ढेरे यांनी केले, मनिषा खोपडे यांनी स्वागत केले, पोपट जैनक यांनी उत्कृष्ट सूत्रसंचालन केले, तर कैलास जगताप यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाला आगार कर्मचारी, चालक-वाहक आणि प्रवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**सार्वजनिक वाहतुकीचा वापर हेच देशहीत**

"भारताचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या आवाहनानुसार पर्यावरण संवर्धन, इंधन बचत आणि वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी नागरिकांनी जास्तीत जास्त सार्वजनिक वाहतुकीचा वापर करावा. सार्वजनिक वाहतुकीचा स्वीकार हा केवळ सोयीचा पर्याय नसून देशहितासाठीचे एक महत्त्वाचे योगदान आहे. त्यामुळे अधिकाधिक नागरिकांनी एसटी, रेल्वे व इतर सार्वजनिक वाहतूक सेवांचा लाभ घ्यावा.".

## जिल्ह्यात पाणीटंचाईच्या झळा तीव्र

पुणे (दै. संध्या)

पुणे विभागात दिवसेंदिवस वाढत्या उन्हाळ्यामुळे पाण्याचे दुर्भिक्ष जाणवत असून सुमारे सव्वा तीन लाख नागरिकांना २०० टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. यामध्ये २०८ गावे आणि ७७६ वाड्या वस्त्यांचा समावेश असून सर्वाधिक पाणी टंचाई आणि टँकर पुणे जिल्ह्यातच असल्याची माहिती पुणे विभागीय आयुक्तालयाकडून देण्यात आली. पुणे जिल्ह्यात सर्वाधिक १०४ टँकर कार्यरत आहेत. या टँकरद्वारे ९९ गावे आणि ४२६ वाड्यांतील १ लाख ७३ हजार ५२९ नागरिक व २० हजार ३०३ पशुधनाला पाणीपुरवठा करण्यात येत आहे विभागात पुण्यासह सातारा, सांगली, कोल्हापूर आणि सोलापूर या पाच जिल्ह्यात मार्च महिन्यापासून तापमानाचा पारा ४२ अंश सेल्सिअस पेक्षा कमी राहिलेला नाही. वाढत्या उन्हाच्या झळा, बेसुमार पाण्याचा वापर, बाष्पीभवन आणि झपाट्याने खालावणारी पाणी पातळी यामुळे धरणे कोरडे पडण्याच्या मार्गावर आहे. जिल्हा परिषदांकडून गाव, वाड्या वस्त्यांवर पेय जल योजनेची पुरेपूर अंमलबजावणी झाली नसल्याने अद्यापही या वाड्या वस्त्यांवर दरवर्षी टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे.

## ग्राहक हक्कांसाठी राज्यव्यापी मोहीम

नारायणगाव (दै. संध्या)

नारायणगाव येथे अखिल भारतीय ग्राहक पंचायतच्या वतीने ग्राहकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि एमआरपी व्यवस्थेतील त्रुटींविरोधात राज्यव्यापी जनजागृती व स्वाक्षरी अभियानाला प्रारंभ करण्यात आला. या अभियानादरम्यान नागरिकांना एमआरपीचे महत्त्व, किंमत निर्धारण प्रक्रिया आणि ग्राहकांचे हक्क याविषयी माहिती देण्यात आली. अभियानादरम्यान उपस्थित नागरिकांशी संवाद साधून




एमआरपी कशी ठरते?, एकाच वस्तूची किंमत वेगवेगळ्या ठिकाणी वेगळी का असते? आणि ग्राहकांना किंमत रचनेची माहिती मिळायला हवी का? अशा प्रश्नांच्या माध्यमातून ग्राहकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यात आली. नागरिकांना ग्राहक हक्क, किंमत, पारदर्शकता आणि एमआरपी व्यवस्थेतील त्रुटी याविषयी माहिती पत्रकांचे वितरण करण्यात आले.

प्रांत सहकोषाध्यक्ष ज्ञानेश्वर उंडे यांनी सांगितले की ,सध्याच्या एमआरपी व्यवस्थेत पारदर्शकतेचा अभाव असल्याने ग्राहकांची दिशाभूल होत आहे .वस्तूंचा उत्पादन खर्च, कर, वाहतूक खर्च आणि विक्रेत्यांचा नफा याबाबत स्पष्ट माहिती ग्राहकांना मिळावी, अशी मागणी करण्यात आली.

एमआरपी ग्राहक संरक्षणाचे साधन नसून अनेकदा ग्राहकांच्या आर्थिक शोषणाचे माध्यम बनत आहे. वस्तूचा उत्पादन खर्च, कर, वाहतूक खर्च आणि विक्री मार्जिन याची माहिती ग्राहकांपासून लपवली जाते .त्यामुळे एमआरपी व्यवस्थेत संपूर्ण पारदर्शकता आणि किंमत निर्धारणाची स्पष्ट माहिती देणे आणि ग्राहकांना वाजवी किंमत मिळवण्याची हमी देणे आवश्यक आहे.

## पश्चिम पट्ट्यात अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे मोठे नुकसान

बारामती (दै. संध्या)

काल झालेल्या अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे बारामती तालुक्यातील वडगाव निंबाळकर, कोराळे बुद्रुक, थोपटेवाडी, मासाळवाडी, होळ, सदोबाची वाडी, सस्तेवाडी इत्यादी गावांमध्ये केळी, डाळिंब, पेरू, वांगी, आंबा, कोथिंबीर, ऊस व चारा पिके यांचे मोठ्या प्रमाणामध्ये अतोनात नुकसान झाले. त्या संदर्भाने आज कृषी विज्ञान केंद्र बारामतीचे तज्ञ, कृषी विभाग व महसूल विभागाचे अधिकारी यांनी सदर गावांमध्ये प्रत्यक्ष जाऊन नुकसानीची पाहणी केली व शेतकऱ्यांशी संवाद साधला तसेच शासनामार्फत पंचनामाचे काम अधिकाऱ्यांमार्फत चालू केले.



वडगाव निंबाळकर येथील प्रगतिशील शेतकरी श्री. अभिषेक अनिल कुमार शहा यांची 10 एकर वरील केळीची बाग गारपीट व वादळी वाऱ्यामुळे भुईसपाट झाली आहे. युद्धामुळे मागील दोन महिने केळीचे दर 2 रुपये किलो झाले होते ते आता कोठे 34 रुपयापर्यंत गेले असतानाच निसर्गाच्या अवकृपेमुळे त्यांच्या तोंडाचा घास हिरावून घेतला तसेच 6 एकरावरील पेरूच्या बागेस देखील याचा तडाखा बसला असून फळांचे नुकसान झाले आहे सध्या लाल पेरू 150 रु प्रतिकिलो दर मिळत आहे त्याची क्वालिटी कमी झाल्याने त्यास व्यापारी घेणार नाही .

सस्तेवाडी येथील श्री. नितीन कदम यांचे एक एकरावरील ढोबळी मिरचीचे शेडनेट गारा व जोराच्या वाऱ्याने संपूर्णपणे कोलमडले असून पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. त्यांचा पहिला तोडा ६० रुपयाने गेला होता व त्यांना 40 टनापर्यंत उत्पादन अपेक्षित असताना सर्व नुकसान झाले. त्यांनी 40 ते 42 डिग्री सेल्सिअस तापमानात उत्कृष्ट पीक आणले होते मात्र ते आता मातीमोल झाले आहे.

## स्व. गुरुवर्य निवृत्ती नारायण मारणे (वस्ताद) पथ नामकरण सोहळा गुरुवारी

पुणे (दै. संध्या)

■ कुंजीर तालीम मित्रपरिवार आणि मारणे परिवाराच्यावतीने आयोजन

कुंजीर तालीम मित्रपरिवार आणि मारणे परिवाराच्या वतीने स्व. गुरुवर्य निवृत्ती नारायण मारणे (वस्ताद) पथ नामकरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. गुरुवार, दिनांक ४ जून २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता हा सोहळा छत्रपती शिवाजीनगर मध्ये कुशल वॉल स्ट्रीट शेजारी, नामदार गोपाळकृष्ण गोखले पथावरून आपटे रस्त्याला जोडणारा (फर्ग्युसन कॉलेज रस्ता) येथे होणार आहे, अशी माहिती आयोजक डॉ. रामदास निवृत्ती मारणे आणि शाम निवृत्ती मारणे यांनी दिली. नामफलकाचे उद्घाटन केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या शुभहस्ते होणार असून, ज्येष्ठ विचारवंत उल्हास पवार कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राहणार आहेत. कार्यक्रमात मोठ्या संख्येने कुस्ती क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. स्व. गुरुवर्य निवृत्ती नारायण मारणे (वस्ताद) हे मुळशी तालुक्यातील उरवडे आंबेगाव या एका छोट्या खेड्यातून व्यायामाच्या वेडाने कुस्तीच्या आवडीमुळे पुण्यात आले आणि त्यांचे चुलते बापूसाहेब मारणे यांनी त्यांना एकदा वाघाच्या बछड्याने वाघा सारखे असावे असे सांगितले तो शब्द त्यांच्या जिव्हारी लागला आणि त्यांनी त्या जिद्दीने व्यायामाला सुरुवात केली. बघता बघता त्यांनी अनेक मैदान मारली गावाकडील उरूस जत्रा येथील कुस्तीच्या फडावरती अनेक कुस्त्या चित्रपट केल्या त्यांचे नाव लवकिक झाले चांगले पैलवान देखील त्यांना लढत देण्यासाठी पुढे येत नव्हते. सन १९६१, १९६२ साली नागपूरला सलग ते महाराष्ट्र चॅम्पियन राहिले. त्यांच्यामुळे कुमठेकर रस्त्यावरील कुंजीर तालमीतले कित्येक मल्ल उदयास आले. त्यांचे नाव छत्रपती शिवाजी नगर येथील एका मार्गाला देण्यात येत असून ही बाब पुण्यासारख्या सांस्कृतिक शहरातील सर्व पैलवान आणि कुस्तीप्रेमींच्या करता अभिमानाची आहे.

# जेजुरी येथील समस्यांवर नागरिक आक्रमक

## भाविकांसाठी शासनाने चिंचेची बाग ताब्यात घ्यावी, जेजुरी गडावरील अतिक्रमणे काढावीत आदी प्रश्नावर चर्चा

जेजुरी (दै. संध्या)

जेजुरी पोलिस स्टेशन व नगरपरिषद आयोजित समन्वय बैठकीत जेजुरीत विकला जाणारा भेसळयुक्त भंडारा,व पेढे यावर कारवाई व्हावी, वाहनकर रद्द करावा, पार्किंगची व्यवस्था करावी,चिंचेची बाग प्रशासनाने ताब्यात घ्यावी , स्वच्छतागृहांचा अभाव, जेजुरीची बदनामी थांबवावी, जेजुरी गडावरील अतिक्रमणे त्वरित काढावीत, भाविकांना होणारी अरेरावी मारहाण यावर कारवाई व्हावी आदी प्रश्नाबाबत जेजुरीकर नागरिकांनी चर्चा केली. महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या खंडोबा देवाच्या जेजुरी नगरीत अलीकडील काळात भाविक व नागरिकांच्या झालेल्या वादाचे व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले होते. यातून जेजुरी शहराची बदनामी होत असल्याने यावर नागरिकांशी चर्चा होऊन उपाययोजना करण्यासाठी जेजुरी पोलिस स्टेशनच्या वतीने येथील मल्हार नाट्यगृहात समन्वय बैठीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत जेजुरी पोलिस स्टेशनचे अधिकारी,जेजुरी नगरपरिषदेचे मुख्याधीकारी,नगरसेवक, जेजुरी देवसंस्थानचे विश्वस्त ग्रामस्थ मंडळाचे पदाधिकारी,व्यापारी,पुजारी सेवक वर्ग,आदी उपस्थित होते. जेजुरी गडाच्या पायरी मार्गावर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झाले असून भाविकांना या मार्गावरून ये जा करणे अशक्य होऊ लागले आहे.ही अतिक्रमणे काढून टाकावीत,जेजुरी गडावर विकास आराखडा अंतर्गत दगडी रस्त्याचे काम सुरू असून या मार्गावरून वाहने सोडू नयेत,जेजुरी बस स्थानकापासून ते मुख्य बाजारपेठ,व पायरी मार्गावर कोठेच स्वच्छता गृह नसल्याने भाविकांची विशेषत महिला भाविकांची कुचंबणा होते,जेजुरी नगरपरिषद वाहनासाठी कर आकारते मात्र कोठेही पार्किंग व्यवस्था नाही,याकडे नगरपरिषद,देवसंस्थान दुर्लक्ष करते यावर सामाजिक कार्यकर्ते गिरीश झगडे यांनी लक्ष वेधले.पंधरा दिवसात यावर मार्ग निघाला नाही तर आपण आमरण उपोषण करणार असल्याचे गिरीश झगडे यांनी सांगितले.जेजुरी गडावर चारचाकी वाहनांना बंदी असताना,काही लोक दुचाकी वरून भाविकांना गडावर घेऊन जातात व त्यांच्याकडून पाचशे रुपये घेतात. असे प्रकार बंद करावेत,जेजुरी शहरात भाविकांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी, ऐतिहासिक चिंचेची बाग नगरपरिषदेने ताब्यात घेऊन त्या ठिकाणी भाविकांना सुविधा निर्माण कराव्यात,भेसळयुक्त भंडारा,तसेच भेसळयुक्त पेढे विकणाऱ्यांवर कडक कारवाई व्हावी, त्र्यंबकेश्वर प्रमाणे जेजुरी येथील वाहन प्रवेश कर रद्द करावा , कडेपठार डोंगर मार्गावर पाणी, स्वच्छता व्यवस्था निर्माण करावी याबाबत भाजपाच्या ज्येष्ठ कार्यकर्त्या अलका शिंदे, सामाजिक कार्यकर्ते हरिदास रत्नपारखी, संतोष खोमणे, स्वप्नील दरेकर यांनी प्रश्न उपस्थित केले.



■ जेजुरी पोलिस स्टेशन व नगरपरिषदेच्या वतीने विविध प्रश्नावर चर्चा करण्यासाठी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते ■

जेजुरीच्या आठवडे बाजारात कर आकारणी संदर्भात व्यवस्थित नियमावली करावी,बाजार मोरगाव रस्त्यावर मांडला जातो त्यामुळे वाहतुकीची कोंडी होते यावर कायमस्वरूपी उपाय योजना करावी याबाबत शांताराम खोमणे, बाळासाहेब माळवदकर यांनी मागणी केली.

खंडोबा देवाच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांच्या अनुषंगाने होणारा व्यवसाय ही जेजुरी शहराची अर्थव्यवस्था असून सर्वांनी भाविकांशी आदराने बोलावे, नगरपरिषद व देवसंस्थान यांच्या वतीने सुविधा उपलब्ध कराव्यात असे मत यावेळी प्रकाश खाडे यांनी व्यक्त केले. यावेळी मयूर माळवदकर, सदानंद बारभाई, संदीप जगताप, निलेश जगताप, विजयकुमार हरीचंद्र, लता लांघी आदींनी चर्चेत सहभाग घेतला.

जेजुरी पोलिस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दीपक वाकचौरे यांच्या पुढाकारातून या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्यांनी समन्वय व शांततेच्या मार्गातून उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले.

मुख्याधिकारी चारुदत्त इंगुले यांनी पार्किंग व्यवस्था व स्वच्छतागृहांची कामे लवकरच हाती घेण्यात येणार असल्याचे सांगितले.

या बैठकीस देवसंस्थान चे अध्यक्ष विश्वास पानसे, विश्वस्त पांडुरंग थोरवे, मंगेश घोणे, उपनगराध्यक्ष गणेश निकुडे, ग्रामस्थ मंडळाचे अध्यक्ष जालिंदर खोमणे तसेच नगरसेवक व मोठ्या संख्येने जेजुरीकर नागरिक उपस्थित होते.

